



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, गुरुवार २ जूलै २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०




## देव तारी त्याला कोण मारी ...

### 6 दिवस ढिगा-याखाली मृत्यूशी झुंज दिल्यानंतर बालकाला सुखरूप बाहेर काढण्यात यश

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** २४ जून रोजी व्हेनेझुएलामध्ये आलेल्या ७.२ आणि ७.५ रिश्टर स्केलच्या भूकंपाने प्रचंड हाहाकार माजवला आहे. आतापर्यंत १,७१९ लोकांचा मृत्यू झाला असून ६८ हजारांहून अधिक लोक बेपत्ता असल्याचे सांगण्यात येत आहे.व्हेनेझुएलाच्या उत्तर भागात बुधवारी झालेल्या दोन शक्तिशाली भूकंपाच्या धक्क्याने खळबळ माजली आहे. आतापर्यंत या आपत्तीत ९२० लोकांचा मृत्यू झाला आहे. तर ३००० हून अधिक जण जखमी झाले आहेत. एका अहवालानुसार, अद्याप जवळपास ७०,००० हून अधिक जण बेपत्ता असल्याचे सांगण्यात येत आहे. रस्त्यावर कोसळलेल्या बहुमजली इमारतीच्या ढिगा-याखाली अनेक जण दबले गेले आहेत. प्रशासन आणि त्यांच्या नातेवाईकांकडून शोध सुरू आहे. या आपत्तीदरम्यान एका ढिगा-याखाली अडकलेल्या १८ दिवसांच्या मुलाला देखील यशस्वीरित्या बाहेर काढण्यात यश आलं आहे. या बाळाच्या रडण्याच्या आईचा देखील वाचला आहे. या चमत्कारिक घटनेची सर्वत्र चर्चा होत आहे. ला गुआरा भागातच एक सात मजली इमारत देखील कोसळली. या घटनेवेळी जोस अल्बार्टो हे घरापासून लांब होते. या घटनेची माहिती मिळताच इमारतीच्या ढिगा-याखाली अडकलेल्या मुलगा, सून आणि नातवाला शोधायला आले. वाहन न मिळाल्याने चालतच घटनास्थळी पोहोचले. ते मोठ्या ओरडून कुटुंबातील सदस्यांना शोधत होते. शोधत असताना अचानक त्यांना मुलाचा आवाज आला. त्यांच्या कुटुंबातील सदस्य संपूर्ण २४ तास इमारतीच्या ढिगा-याखाली अडकून बसलं होतं. जोस यांनी बचाव पथकाच्या मदतीने कुटुंबातील सदस्यांचे प्राण वाचवले.

## राज्यात मान्सूनचे दमदार पुनरागमन

- ■ 6 जिल्ह्यांना 'रेड अलर्ट'
- ■ तर मुंबईला 'ऑरेंज अलर्ट'
- ■ पुढील पाच दिवस मुसळधार पावसाची शक्यता

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात यंदा मान्सून उशिरा दाखल झाल्यामुळे सर्वांनाच पावसाची प्रतीक्षा होती, मात्र जूनच्या अखेरीस पावसाने दमदार पुनरागमन केले आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, आगामी काही दिवसांत संपूर्ण राज्यात पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः कोकण पट्ट्यात बहुतांश ठिकाणी मेघगर्जनेसह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला असून, परिस्थितीचे गांभीर्य ओळखता राज्यातील सहा जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. पालघरमध्ये पावसामुळे उद्या (दि. २ जुलै) सर्व शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.



दुसरीकडे, राजधानी मुंबईलाही पावसाने चांगलेच झोडपून काढले असून पुढील पाच दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता पाहता शहरासाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. हंगामातील पहिल्याच जोरदार पावसामुळे मुंबईतील अनेक सखल भागांत पाणी साचून जनजीवन विस्कळीत झाल्याचे पाहायला मिळाले. आता सलग पाच दिवस मुसळधार पावसाचा अंदाज असल्याने, संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी मुंबईकरांनी कामानिमित्त घराबाहेर पडताना योग्य ती काळजी आणि विशेष खबरदारी घेणे अत्यंत गरजेचे आहे.हवामान विभागाने मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता पाहता विविध जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. या अंदाजानुसार, आज रत्नागिरी जिल्ह्याला रेड अलर्ट देण्यात आला आहे. तसेच, पालघर जिल्ह्याला २ जुलै, रायगड जिल्ह्याला ३ व ४ जुलै, तर ठाणे जिल्ह्याला ४ जुलै रोजी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. याव्यतिरिक्त, घाटमाथ्यावरही पावसाचा जोर अधिक राहील. त्यानुसार पुणे जिल्ह्यातील घाट परिसरासाठी २, ३ आणि ४ जुलै तर सातारा जिल्ह्यातील घाट परिसरासाठी ५ जुलै रोजी रेड अलर्ट जारी करण्यात आला असून या काळात नागरिकांनी विशेष खबरदारी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# ३० दिवस कोठडीत राहणा-या मुख्यमंत्री व मंत्र्याचे पद जाणार


## पावसाळी अधिवेशनात विधेयकावर संसदेत वादळी चर्चेची शक्यता

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** गंभीर गुन्ह्याखाली सलग ३० दिवस कोठडीत असलेल्या मंत्र्यांना पदावरून हटवण्याची तरतूद असलेले १३० वे घटनादुरुस्ती विधेयक संसदेच्या येत्या पावसाळी अधिवेशनात मांडले जाण्याची शक्यता आहे. या विधेयकाची छाननी करणा-या संयुक्त संसदीय समितीचा अहवाल येत्या १७ जुलै रोजी स्वीकारला जाण्याची शक्यता आहे. सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, गंभीर गुन्ह्यांत अटक होउन सलग ३० दिवस कोठडीत राहिल्यास थेट पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा इतर मंत्र्यांना पदावरून हटवण्याची तरतूद या विधेयकात आहे.

**विधेयक संसदेत मांडण्याची शक्यता-** संसदेचे पावसाळी अधिवेशन येत्या २० जुलैपासून सुरु होत आहे. या अधिवेशनात १३० वे घटनादुरुस्ती विधेयक चर्चेसाठी आणि मंजुरीसाठी मांडले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. संसदेत विधेयक मांडण्यापूर्वी संसदीय समितीने अहवाल स्वीकारणे ही एक कायदेशीर प्रक्रिया आहे, असे एक्सप्रेसच्या वृत्तात म्हटले आहे. या कायद्याचा राजकीय सूडबुद्धीने गैरवापर होउ नये, यासाठी यात काही अटी घातल्या जाण्याची शक्यता आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात हे विधेयक मांडले होते.

**छाननीसाठी ३१ सदस्यांची संसदीय समिती-** या विधेयकाच्या छाननीसाठी भाजपा खासदार अपराजिता सारंगी यांच्याअध्यक्षतेखाली ३१ सदस्यांची संसदीय समिती स्थापन करण्यात आली होती. पण, इंडिया आघाडीतील काँग्रेससह बहुतांश विरोधी पक्षांच्या सदस्यांनी या समितीच्या कामकाजावर बहिष्कार टाकला आहे. इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, सत्ताधारी विरोधी पक्षांच्या हरकतींकडे दुर्लक्ष करत असून, समितीचा रबर स्टॅम्पसारखा वापर करणार असल्याने प्रक्रियेत सहभागी होणे निरर्थक असल्याचे विरोधकांनी म्हटले होते. हे विधेयक लोकशाहीविरोधी असल्याचेही विरोधकांनी म्हटले आहे.

## विवाह प्रमाणपत्र म्हणजे लग्न मानता येणार नाही!



**अहमदाबाद /वृत्तसंस्था-** गुजरात उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, केवळ विवाह प्रमाणपत्र मिळाल्याने हिंदू विवाह मानला जाउ शकत नाही. विवाह तेव्हाच मानला जाईल, जेव्हा हिंदू विवाह कायद्यानुसार ठरलेले विधी आणि परंपरा पूर्ण केल्या असतील. ज्या समुदायांमध्ये सात फे-यांची परंपरा आहे, तिथे त्याशिवाय विवाह पूर्ण मानला जाणार नाही.न्यायमूर्ती इलेश जे. वोरा आणि न्यायमूर्ती आर.टी. वच्छानी यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, विवाह प्रमाणपत्र हे केवळ आधी झालेल्या विवाहाची नोंद असते. ते स्वतःहून कोणत्याही विवाहाला मान्यता देत नाही. हे प्रकरण ब्रिटनमध्ये राहणा-या एका व्यक्तीच्या अपिलाशी संबंधित आहे. त्याचा आरोप आहे की, अहमदाबादमधील एका महिलेने नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्याच्याकडून कागदपत्रांवर सह्या घेउन बनावट पद्धतीने विवाह प्रमाणपत्र बनवले.त्या दोघांमध्ये कधीही विवाह झाला नाही. सुनावणीत महिलेने कुटुंब न्यायालयात मान्य केले की विवाहाचा कोणताही विधी झाला नव्हता. तिने हे देखील स्वीकारले की, ते दोघे कधीही पती-पत्नी म्हणून एकत्र राहिले नाहीत.

## चोरीचे पैसे लपवण्यासाठी वॉशरूमचा वापर

**अयोध्या /वृत्तसंस्था-** अयोध्येतील श्रीराम मंदिरातील देणगी घोटाळ्याने देशाच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी आठ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्या चौकशीसाठी एसआयटीची स्थापना केली आहे. या चौकशीतून आता श्रीराम मंदिरातील देणगी घोटाळ्याबाबत अनेक धागेदोरे समोर येत आहेत. या चौकशीदरम्यान एका आरोपीने धक्कादायक माहिती दिली आहे. चोरी झाल्यानंतर त्याची रक्कम थोड्या वेळासाठी वॉशरूममध्ये लपवून ठेवली जायची आणि त्यानंतर ती बाहेर काढली जात असे अशी कबुली आरोपीने दिली आहे.देणगी घोटाळ्यातील सर्व आरोपींना पोलिस कोठडीत ठेवण्यात आले आहे. यापैकी एक आरोपी अविनाश शुक्ला याची मंगळवारी तब्बल दोन तास कसून चौकशी करण्यात



आली. ज्यामध्ये त्याने कोट्यवधी रुपयांच्या चोरीची कबुली देत मंदिराच्या सुरक्षा व्यवस्थेतील आणि दान मोजणी प्रक्रियेतील त्रुटींवर बोट ठेवले आहे. आरोपी अविनाश शुक्लाने चौकशीत मंदिर ट्रस्टचे विश्वस्त अनिल मिश्रा यांच्या भूमिकेचाही उल्लेख केला. देणगी मोजणी प्रक्रियेत ते महत्त्वाची जबाबदारी सांभाळत असल्याचे अविनाशे सांगितले.दानपेटीच्या मोजणी कक्षाच्या चाव्यांपैकी एक चावी टिन्नू यादवकडे असायची, तर दुसरी चावी बँक कर्मचा-यांकडे असायची. सर्व आरोपींनी संगनमताने आणि अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने हा कट रचला होता. एकजण पैसे चोरत असताना इतर आरोपी त्याच्याभोवती घोळका करून त्याला कव्हर द्यायचे. संपूर्ण परिसरातील सीसीटीव्ही कॅमे-यांचे लोकेशन माहिती असल्याने आरोपींनी कॅमे-यांची नजर चुकवून चोरी केली आणि सुरुवातीला रक्कम बाथरूममध्ये लपवून ठेवली. ट्रस्टच्या वरिष्ठ व्यक्तींशी जवळीक असल्याने कोणालाही त्यांच्यावर संशय आला नाही.

## राम मंदिरात महाकुंभवेळी देणग्यांची मोठी लूट

### मेहुण्या-पाहुण्यांनीच लाटले कोट्यवधी रुपये, मोठी माहिती आली समोर

अयोध्या येथील राम मंदिरातील देणगी चोरी प्रकरणी अजूनही तपास सुरू आहे. या प्रकरणी दररोज नवीन माहिती समोर येत आहे. कुंभमेळ्याव्यादरम्यान अयोध्येत भक्तांची मोठी गर्दी होती. दररोज लाखो भाविक देशभरातून मुंबईत येत होते, या काळात मंदिरात मोठी देणगी गोळा होत होती. यावेळीही देणगी चोरीला गेल्याचा संशय तपास अधिका-यांना आहे. मंदिरातील सर्वात मोठी चोरी २०२५ च्या कुंभमेळ्यादरम्यान झाली होती. कुंभमेळ्यादरम्यान भारत आणि परदेशातून लाखो भाविक अयोध्येत दाखल झाले, यामुळे मंदिराला मिळणा-या देणग्या आणि अर्पणांमध्ये मोठी वाढ झाली. आधीच लहानसहान चो-यांमध्ये सामील असलेल्या या आरोपींनी या संधीचा फायदा घेतला आणि संगनमत करून देणगीतील लाखो रुपयांचा अपहार केला. अटक केलेल्या आरोपींपैकी एक, लवकुश मिश्रा आणि त्याचा मेहुणा, अनुकल्प मिश्रा यांनी सर्वाधिक रोकड चोरली. त्यांनी चोरलेल्या पैशातून अर्धा डझनहून अधिक मालमत्ताही खरेदी केल्या, या मालमत्ता पोलिसांनी शोधून काढल्या आहेत.

**ब्लँकेटमध्ये लपवलेला खजिना-** मुख्य आरोपी अविनाश शुक्लाचा भाउ अभिषेक याच्या मालकीच्या योग केंद्रावर पोलिसांनी छापा टाकला असता, चार बाक्समधून मोठ्या प्रमाणात रोकड जप्त करण्यात आली. आरोपींनी नोटांचे बंडल चतुराईने ब्लँकेटखाली लपवले होते. यापैकी एका बाक्सवर 'राम राज्य कोश' असे शब्द लिहिलेले होते. अटक केलेला आरोपी टिन्नू यादव याच्या घरातूनही रोकड जप्त करण्यात आली.






## उपोषणकर्त्या विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची चिंता

**नवी दिल्ली :** दिल्लीतील जंतर मंतर येथे कॉक्रोच जनता पार्टीच्या (सीजेपी) आंदोलनाचा बुधवारी १२वा दिवस असून उपोषणकर्त्या विद्यार्थ्यांच्या प्रकृतीबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे. सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्याबरोबर ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशनच्या (एआयएसए) विद्यार्थ्यांबरोबरच पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक हेही उपोषण करत असून बुधवारी त्यांच्या उपोषणाचा चौथा दिवस होता. वांगचुक यांची प्रकृती स्थिर असली तरी त्यांना थकवा जाणवत असल्याची माहिती देण्यात आली.दरम्यान, इनेश हा विद्यार्थी गेल्या आठ दिवसांपासून उपोषण करत असून मंगळवारी रात्री त्याची प्रकृती बिघडल्यामुळे त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले, अशी माहिती अभिजीत दिपके यांनी दिली. इनेशच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याचे दिपके यांनी एक्सवर लिहिले. देशभरात विविध ठिकाणी प्रश्नपत्रिका फुटण्याच्या आणि विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडत असून सरकारला उत्तरदायी ठरवण्याची मागणी वाढत आहे, असे दिपके यांनी म्हटले आहे. उपोषणकर्त्या विद्यार्थ्यांमध्ये जेएनयू विद्यार्थी संघटनेचा सचिव दानिश याचाही समावेश आहे. त्याच्या रक्तातील साखरेची पातळी ६१पर्यंत खाली घसरल्याचे एआयएसएने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.









जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# बांधकाम कामगारांच्या विविध समस्यांबाबत बच्चू कडू यांचे कामगार मंत्र्यांना निवेदन

**अचलपूर/प्रतिनिधीः-** माजी राज्यमंत्री तथा विधान परिषद सदस्य बच्चू कडू यांनी राज्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना भेडसावत असलेल्या विविध समस्यांच्या निराकरणासाठी महाराष्ट्राचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांना सविस्तर निवेदन सादर केले आहे.



या निवेदनात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या काही धोरणांमुळे व प्रशासकीय प्रक्रियांमुळे पात्र कामगार आणि त्यांच्या वारसांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील कामगारांमध्ये नाराजी वाढत असून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात नोंदणीकृत बांधकाम कामगाराच्या मृत्यूनंतर वारसांना लाभ मिळण्यासाठी असलेली वयोमर्यादेची अट रद्द करावी, पहिल्या दोन अपत्यांपर्यंत प्रसूती योजनेचा लाभ पूर्ववत सुरू करावा तसेच आरोग्य सुविधांसाठी असलेली नूतनीकरणाची अट रद्द करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय कामगार नोंदणी व नूतनीकरणाचे ऑनलाइन अर्ज आठवडा किंवा पंधरवड्याच्या आत निकाली काढण्याचे नियोजन करावे, दिव्यांग अपत्य असलेल्या कुटुंबांना तिसऱ्या अपत्यासाठीही योजनांचा लाभ द्यावा आणि विविध योजनांसाठी आवश्यक कागदपत्रांची स्पष्ट माहिती पोर्टलवर उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

कामगारांना साहित्यसंच वाटप करताना होणारा आर्थिक व मानसिक त्रास टाळण्यासाठी साहित्यसंचाऐवजी पात्र कामगारांच्या खात्यात थेट अनुदान जमा करण्याची मागणीही बच्चू कडू यांनी केली आहे.

तसेच ग्रामीण भागातील कामगार नोंदणी व नूतनीकरणासाठी आवश्यक असलेल्या ९० दिवसांच्या कामाच्या प्रमाणपत्रावर ग्रामसेवकांना स्वाक्षरी करण्याचे अधिकार द्यावेत, मागील एक वर्षापासून प्रलंबित असलेले नोंदणी, नूतनीकरण व लाभाचे अर्ज तातडीने निकाली काढावेत आणि तपासणीतील विलंबामुळे मंजुरीपूर्वी मृत्यू झालेल्या कामगारांच्या वारसांनाही लाभासाठी पात्र ठरवावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

राज्यातील लाखो बांधकाम कामगारांना न्याय मिळावा आणि त्यांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ सुलभपणे मिळावा यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा बच्चू कडू यांनी व्यक्त केली आहे.

# हातात तलवार घेऊन फिरणाऱ्याला ठोकल्या बेड्या

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील छत्री तलाव रोड परिसरात हातात तलवार घेऊन फिरत नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या एका सराईत आरोपीला राजापेठ पोलिसांनी तात्काळ कारवाई करत अटक केली. आरोपीकडून घातक तलवार जप्त करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध शस्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुधवारी सकाळी राजापेठ पोलीस ठाण्याचे डीबी पथक नियमित गस्त घालत असताना छत्री तलाव रोडवरील उड्डाणपुलाखाली एक इसम हातात तलवार घेऊन संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. संबंधित व्यक्तीच्या वर्तनामुळे परिसरातील नागरिकांमध्ये घबराट पसरली होती. माहिती मिळताच डीबी पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत सापळा रचला. पोलिसांना पाहताच आरोपीने पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, सतर्क पथकाने त्याला वेढा घालून ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याची ओळख सचिन उर्फ सत्त्या कडुजी मरस्कोल्हे (वय ४३, रा. जेवड नगर, अमरावती) अशी पटली. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून सुमारे दोन हजार रुपये किमतीची २७ इंच लांबीची लोखंडी तलवार आढळून आली. राजापेठ पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियमाच्या कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीचीही पडताळणी करण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली.

# देवा तारी त्याला कोण मारी

मराठीत एक म्हण आहे. 'देव तारी त्याला कोण मारी?.. भारतीय जनता पक्षाच्या राजकारणात या म्हणीत किंचीत बदल झाला. 'देव च्या ऐवजी देवा'..एवढाच काय तो बदल दिसतो.. असो..

भारतीय जनता पक्षाचे अमरावती चे शहर अध्यक्ष डॉ नितीन धांडे यांना तडकाफडकी हटवून भाजपाचे माजी जिल्हा सरचिटणीस नितीन गुडधे यांना शहर अध्यक्षपदी नियुक्त करण्यात आले. कोणाच्याही ध्यानी मनी नसताना दोन दिवसांपुर्वी अचानक झालेली ही राजकिय घडामोड..मात्र त्यानंतर चोविस तासातच नितीन गुडधे यांच्या नियुक्ती वर प्रदेशाध्यक्ष रविन्द्र चव्हाण यांनी स्थगीती दिली. गुडधे यांच्या नियुक्तीचे आदेश प्रदेशाध्यक्ष यांचे आणि स्वतः केलेल्या नियुक्तीला स्थगिती देण्याचेही आदेश सुध्दा प्रदेशाध्यक्ष यांचेच.. अवघ्या चोविस तासात घडलेल्या या दोन नाट्यमय घडामोडी, काहीशा विचीत्र आहे. उत्सुकता ही आहे कि, गुडधे यांची नियुक्ती केली पण मग चोविस तासातच स्थगिती का दिली?एकतर हा निर्णय चुकला असं प्रदेशाध्यक्ष यांना पटले असणार किंवा भाजप मध्ये अंतर्गत दबावाच्या राजकारणातून या निर्णयावर स्थगिती आली असणार. चोविस तासातच अशा काय घडामोडी घडल्या कि गुडधे यांच्या नियुक्ती वर तातडीने स्थगिती देण्याचा निर्णय प्रदेशाध्यक्ष यांना घ्यावा लागला?पडद्यामागे नक्कीच काही तरी घडलं आहे हे नक्कीच. या निर्णयाने एक मात्र सिध्द केले कि, भाजपा प्रदेशाध्यक्षांचा निर्णय बदलण्याची राजकिय ताकद अमरावती जिल्ह्याच्या राजकारणात निर्माण झाली आहे. ही अदृष्य ताकद कोणाची? हे भाजपच्या वरीष्ठ नेत्यांनाच ठाऊक..




नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणुका ह्या नितीन धांडे यांच्या अध्यक्ष पदाच्या कार्यकाळात झाल्या. या निवडणुकीत भाजपाला अपेक्षेपेक्षा भरपुर जागा कमी मिळाल्या. गेल्यावेळी असलेल्या ४५ जागा सुध्दा भाजपा शाबूत राखू शकली नाही. २६ जागांवर भाजपा स्थिरावली. त्याचवेळी महायुतीतील सहकारी पक्ष असलेल्या युवा स्वाभिमान पक्षाचे १७ नगरसेवक निवडून आले. निवडणूकीच्या पहिल्या टप्प्यात युवास्वाभिमान आणि भाजपाची युती होती मात्र प्रचाराच्या दुसऱ्या टप्प्यात युतीमध्ये काडीमोड झाला. हा झाला एक भाग. नितीन धांडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजीत अभिष्टचिंतन कार्यक्रमात भाजपाच्या स्टार प्रचारक माजी खासदार नवनित राणा यांनी मंचावरून बोलताना नितीन धांडे यांना आमदार करा असे सुचविले. त्यावेळी स्थानिक स्वराज्य मतदारसंघाच्या निवडणुका व्हायच्या होत्या. मागील बारा वर्ष या मतदारसंघात प्रविण पोटे हे आमदार आहेत. यावेळी पोटे सुध्दा मंचावर उपस्थित होते. त्यामुळे स्थानिक स्वराज्य मतदारसंघातून विधानपरिषदेवर जाण्यासाठी नितीन धांडे उत्सुक होते हे लपलेलं सत्य उघड झालं. पण महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांच्या अभीष्टचिंतन पर भाषणातून बोलताना याविषयावर प्रकाश टाकला आणि सारवासारव केली. हा झाला दुसरा भाग.. त्यानंतर स्थानिक स्वराज्य मतदारसंघाच्या निवडणूका झाल्या. यात प्रविण पोटे भरघोस मते घेऊन निवडून आले. या निवडणुकीत वंचितच्या उमेदवाराला ३१ मते मिळालीत. वंचित चे तर एवढे मतदार नाहीत. मग वंचित ला एवढे मते कोणाची असा खोचक सवाल आमदार प्रविण पोटे यांनी उपस्थित केला. हा झाला तिसरा भाग.. या सर्व घडामोडीत विद्यमान शहर अध्यक्ष डॉ नितीन धांडे यांच्यावर महानगरपालिकेतील भाजपाच्या अपयशाचे खापर फोडण्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाही. धांडे यांच्या विरोधात दबक्या आवाजात भाजपाचे नेते बोलतही असतील. पण उघडपणे धांडे यांच्या विरोधात कोणी बोलताना दिसत नव्हतं. महानगरपालिकेत जे काही झालं त्याची पुनरावृत्ती आगामी जिल्हा परिषदेत होऊ नये म्हणून भाजपाने अमरावतीचे जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांच्या जागी आमदार प्रताप अडसड यांची नियुक्ती केली.

नितीन गुडधे यांची निवड चुकली किंवा नितीन धांडे यांना अवेळी हटविणे ही चुक झाली असे पटले असते तर भाजप प्रदेशाध्यक्षांनी त्यांनी घेतलेला निर्णय 'रद्द' केला असता. पण प्रदेशाध्यक्ष यांनी निर्णय रद्द न करता निर्णयावर 'स्थगिती' दिली.एकतर हा निर्णय प्रदेशाध्यक्ष रविन्द्र चव्हाण यांनी एकट्याने घेतला नसणार. पालकमंत्री या नात्याने चंद्रशेखर बावनकुळे यांना या निर्णयाची कल्पना निश्चित असेल. बावनकुळे यांना विश्वासात घेतल्याशिवाय हा निर्णय अशक्य होता. तर दुसरीकडे राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनाही या निर्णयाची कल्पना देण्यात आली असेलच यात दुमत नाही. यातच खरा खेळ आहे. याचाच अर्थ शहर अध्यक्ष पदावरून नितीन धांडे यांना हटविण्यावर भाजप मध्ये एकमत झाले आहे. मात्र, कोणाच्या तरी कृपेमुळे ते आज या पदावर कायम आहे. कदाचित नितीन गुडधे यांचा राजकारणातील अनुभव कमी वाटला असण्याची शक्यता असू शकते. चार वर्षांपुर्वी खासदार डॉ अनिल बोंडे यांनी जिल्हाध्यक्ष पदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर गुडधे यांना सरचिटणीसपदाची जबाबदारी दिली. तेव्हापासून गुडधे हे भाजपाच्या सक्रिय राजकारणात दिसतात. अमरावती मधील एका नामांकित शिक्षण संस्थेचे अध्यक्ष असलेले डॉ नितीन धांडे यांचे भाजपासह हिंदूत्ववादी संघटनांमध्ये वरिष्ठ स्तरावर चांगले संबध आहेत. भाजप आणि हिंदुत्ववादी संघटनांना मदत करण्यात ते नेहमी सहकार्याच्या भुमिकेत असतात. पण नेमकं कुठे काय बोललं पाहिजे? आणि कुठे काय नाही बोललं पाहिजे? याची जाणीव डॉ धांडे यांना नाही. नितीन धांडे यांच्या तुलनेत नितीन गुडधे यांचा भाजप मधील राजकारणाचा अनुभव निश्चितच कमी आहे. पण शहर अध्यक्ष पदाकरिता भाजपाने धांडे ऐवजी गुडधे यांना पसंती दिली हे सुध्दा तेवढंच सत्य आहे. भविष्यात भाजपाने पुन्हा गुडधे यांनाच या पदाची जबाबदारी दिली तर नवल वाटायला नको.

हा सर्व घटनाक्रम बघता नितीन धांडें ऐवजी अमरावती शहर अध्यक्ष पदाकरिता भाजपा नव्या चेहऱ्याच्या शोधात आहे एवढं मात्र खरंय. आता हा नवा चेहरा कोण? हे नांव देवाच्याच मनात आहे हे निश्चित.

# जनतेच्या सेवेसाठी सदैव धावणारे लोकनेते
# खासदार बळवंत वानखडे

अमरावती जिल्ह्याच्या राजकारणात जनतेशी थेट नाळ जोडणारे, सर्वसामान्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे आणि प्रत्येक गरजू व्यक्तीच्या मदतीसाठी तत्परतेने धावून जाणारे नाव म्हणजे अमरावती लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार बळवंतभाऊ वानखडे. २ जुलै रोजी त्यांचा वाढदिवस साजरा होत असून, या निमित्ताने त्यांच्या लोकाभिमुख कार्याचा गौरव करणे म्हणजे जनसेवेच्या एका प्रेरणादायी प्रवासाला सलाम करण्यासारखे आहे.

खासदार बळवंतभाऊ वानखडे यांची ओळख केवळ लोकप्रतिनिधी म्हणून नाही, तर सर्वसामान्य जनतेचा आधारवड म्हणून आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात साधेपणा, प्रामाणिकपणा, संवेदनशीलता आणि जनसेवेची तळमळ यांचा सुंदर संगम दिसून येतो. गरीब असो वा श्रीमंत, शेतकरी असो वा शेतमजूर, विद्यार्थी असो वा कामगार—प्रत्येकाशी समानतेने वागणे हीच त्यांच्या कार्यशैलीची खरी ओळख आहे.

रस्त्याने प्रवास करताना एखादा गरजू नागरिक दिसला, एखादा अपघातग्रस्त मदतीसाठी तडफडताना दिसला किंवा कोणाला तातडीची मदत आवश्यक असल्याचे लक्षात आले, तर आपल्या ताफ्याची पर्वा न करता गाडी थांबवून त्या व्यक्तीची विचारपूस करणे आणि गरज भासल्यास स्वतःच्या वाहनातून रुग्णालयात पोहोचविणे, ही त्यांची माणुसकी आजही अनेकांच्या स्मरणात आहे. लोकप्रतिनिधी म्हणून नव्हे, तर एक संवेदनशील माणूस म्हणून त्यांनी अनेकांना दिलासा दिला आहे.



अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी त्यांनी संसदेपासून रस्त्यापर्यंत सातत्याने आवाज उठविला आहे. शेती, पीकविमा, नैसर्गिक आपत्ती, सिंचन, शेतीमालाला योग्य भाव, शेतमजुरांचे प्रश्न आणि ग्रामीण भागातील मूलभूत सुविधा यांसाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाशी समन्वय साधत अनेक प्रलंबित कामांना गती देण्याचे कार्य त्यांनी केले आहे.

मेळघाटसारख्या दुर्गम आदिवासी भागातील नागरिकांच्या समस्या समजून घेण्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष गावागावात जाऊन संवाद साधला. आदिवासी बांधवांच्या आरोग्य, शिक्षण, रोजगार, पाणी, रस्ते आणि शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. केवळ आश्वासनांपुरते न थांबता प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी पाठपुरावा करणे, ही त्यांच्या कार्यपद्धतीची जमेची बाजू आहे.

आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यासाठीही त्यांनी विशेष लक्ष दिले आहे. आर्थिक अडचणीत असलेल्या रुग्णांना उपचारासाठी मदत, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी सोडविणे, विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, तसेच गरजूंना योग्य मार्गदर्शन करणे या माध्यमातून त्यांनी हजारो कुटुंबांना आधार दिला आहे.

एखाद्या नागरिकाला अन्याय होत असल्याचे समजताच त्या प्रश्नाच्या मुळापर्यंत जाऊन न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा करणे ही त्यांची कार्यशैली आहे. अनेक आंदोलने, निवेदने आणि लोकहिताच्या प्रश्नांवर त्यांनी ठाम भूमिका घेत सर्वसामान्यांच्या हक्कासाठी संघर्ष केला आहे. त्यामुळे जनतेच्या मनात त्यांच्याविषयी विश्वासाचे आणि आपुलकीचे नाते निर्माण झाले आहे.

खासदार बळवंतभाऊ वानखडे यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा मनमोकळा स्वभाव. कोणत्याही व्यक्तीशी सहज संवाद साधणे, त्यांच्या अडचणी संयमाने ऐकून घेणे आणि शक्य त्या प्रत्येक मार्गाने मदत करण्याचा प्रयत्न करणे, यामुळे ते जनतेचे खरे लोकप्रतिनिधी ठरले आहेत. त्यांच्या चेहऱ्यावरचा साधेपणा आणि कार्यातील प्रामाणिकपणा हेच त्यांच्या लोकप्रियतेचे खरे रहस्य आहे.

राजकारणाला समाजसेवेचे माध्यम मानणारे बळवंतभाऊ वानखडे हे आज अमरावती जिल्ह्यातील लाखो नागरिकांसाठी विश्वासाचे प्रतीक बनले आहेत. जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होणारा, संकटाच्या काळात खंबीरपणे उभा राहणारा आणि प्रत्येक गरजू व्यक्तीच्या मदतीसाठी तत्पर असणारा लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

२ जुलै या वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि समाजसेवेची अखंड ऊर्जा लाभो, हीच अमरावती जिल्ह्यातील जनतेची मनःपूर्वक सदिच्छा. जनतेच्या विश्वासाला न्याय देत त्यांनी अशीच निस्वार्थ सेवा करत राहावी, हीच त्यांच्या वाढदिवसानिमित्त सर्वांच्या वतीने शुभेच्छा.

**- डॉ.ओमप्रकाश झोड**

## १ व १० वरिल उर्वरित

### भावाला घरी आणण्यासाठी

यांच्या कपाळाला गंभीर दुखापत झाली. यानंतर अमित भोसले याने दगड फेकून त्यांना आणखी जखमी केले. तर सुरेशा उमेश राठोड हिने शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. अचानक झालेल्या या हल्ल्यात जखमी नमन रक्तबंबाळ अवस्थेत खाली कोसळले. त्यानंतर तिन्ही आरोपी घटनास्थळावरून पसार झाल्याचे सांगण्यात आले. घटनेची माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलिसांनी प्रकरणाची नोंद घेतली. फिर्यादीच्या तक्रारीवरून तिघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### प्रसूतीनंतर प्रकृती बिघडल्याने

१३ जून रोजी अचानक त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना डॉ. पंजाबराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी त्यांना नागपूर येथे रेफर केले. मात्र, नागपूर येथील रुग्णालयात १४ जून रोजी सायंकाळी सुमारे ५.४५ वाजता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. नागपूर येथून प्राप्त झालेल्या आकस्मिक मृत्यूच्या अहवालाच्या आधारे नांदगाव पेठ पोलिसांनी प्रकरणाची नोंद केली आहे. शवविच्छेदन अहवाल व तपास पूर्ण झाल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. सध्या या घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

### बडनेऱ्यात उड्डाणपुलासाठी

असल्याने काम सुरू असताना वाहतूक सुरू ठेवल्यास अपघात, मनुष्यहानी किंवा वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी अमरावती शहर पोलिसांच्या अधिसूचनेनुसार दि. ४ जुलै २०२६ रोजी रात्री ११.३० वाजल्यापासून ते दि. ५ जुलै २०२६ रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत अलमास गेट ते सावता मैदान बडनेरा दरम्यानचा मार्ग पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. वाहतुकीची गैरसोय टाळण्यासाठी पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आले आहेत. बडनेराहून अमरावतीकडे येणाऱ्या वाहनांसाठी अकोला ४ पॉईंट येथून सुपर एक्सप्रेस हायवे मार्गे मेघे कॉलेज चौक, कोंडेश्वर टी-पॉईंटमार्गे अमरावतीकडे जाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. अमरावतीहून बडनेऱ्याकडे जाणाऱ्या वाहनांनी जुना बायपास मार्गाचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने नागरिक, वाहनधारक आणि वाहनचालकांना या कालावधीत लागू करण्यात आलेल्या निर्बंधांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे. फूट ओव्हर ब्रिजचे काम पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना सुरक्षितपणे रस्ता ओलांडण्यासाठी मोठी सुविधा उपलब्ध होणार असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

### कृषी दिनी शेतकऱ्यांचा आसेगाव

पूर्णपणे ठप्प झाली. दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. 'सरसकट कर्जमाफी झालीच पाहिजे', 'पीक विमा आमचा हक्क आहे', 'शेतकरी विरोधी सरकारचा निषेध असो' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

यावेळी गोपाल भालेराव यांनी शासनावर टीका करत, कृषी दिनीच शेतकऱ्यांना रस्त्यावर उतरावे लागत असल्याची खंत व्यक्त केली. सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. काही काळानंतर पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेत रस्ता मोकळा केल्यानंतर वाहतूक पूर्ववत सुरू झाली.

या आंदोलनात रमन लंगोटे, इरफान सौदागर, आकाश खेलदार, ऋषिकेश रडके, विजय जंवजाळ, अभिजित भोजने, अजय राऊत, मनोहर भेटाळू, सुधीर कावरे, प्रफुल्ल गाजरे, नंदू पारीसे, शुभम काळे, जावेद पठाण, शाम पारीसे, राजू ततरपाडे, अजय भालेराव यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

### पतीच्या विश्वासघाताने उद्ध्वस्त

त्याच्याशी संबंध ठेवण्यास दबाव टाकला. परिस्थितीपुढे हतबल झालेल्या महिलेवर वारंवार अत्याचार करण्यात आल्याचा आरोप तिने केला आहे. इतकेच नव्हे तर आरोपीसोबत राहण्यास नकार दिल्यानंतर तिला मारहाण करून मानसिक व शारीरिक त्रास देण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. अखेर सततच्या त्रासाला कंटाळून पीडितेने धाडसाने पोलिसांकडे धाव घेतली. तिच्या जबाबाच्या आधारे रहीमापूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, महिलांच्या सन्मान आणि सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. वैवाहिक नात्यातील विश्वास आणि जबाबदारीला तडा देणाऱ्या या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू असून, तपासातून आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पुढील तपास रहीमापूर पोलीस करीत आहेत.

### आ.गजानन लवटे यांचा वाढदिवस

निवासी मुकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छाही देण्यात आल्या.

याशिवाय विविध सामाजिक उपक्रमांद्वारे सर्वसामान्य नागरिकांमध्ये सेवाभाव, सामाजिक उत्तरदायित्व आणि लोकहिताची भावना अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. वाढदिवस केवळ शुभेच्छांपुरता मर्यादित न ठेवता समाजोपयोगी कार्यातून साजरा करण्याचा संदेश या उपक्रमांमधून देण्यात आला.

यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर, शिवसेना विधानसभा संघटक बबनराव विल्हेकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेंद्र दिपटे, गुणवंत पाटील गावंडे, मोहन पाटील बायस्कर, नगरसेविका मंगला तराळे, नगरसेविका स्नेहा देशमुख, सागर गिरे, सुभाषराव राऊत, दिपक बगाडे, निलेश होले, किशोर टाले, भास्कर धोटे, नंदू पखाले, राजू तराळे, शिवाजी देशमुख, गोपाल अग्रवाल, सतिश जामनिक, मंगेश धुराटे, आशिष लायडे, शुभम विल्हेकर, मंगेश पारडे, दर्शन गवई, संदीप हरणे, अंकुश खाडे, यश लवटे, अनिकेत खाडे, प्रविण बायस्कर, संतोष हागे, मंगेश पारडे, संकेत डालके तसेच असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

### विवाहित महिलेची गळफास घेऊन

कुणीही नसताना निकीताने गळफास घेतल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

दरम्यान उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन झाल्यानंतर मृतक निकीताच्या नातेवाईकांनी घातपाताचा आरोप करीत गोंधळ घातला व मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला. यावेळी काहीवेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होता. अखेर सायंकाळी उशिरा मृतदेह कुटुंबातील सदस्यांनी अंत्यसंस्कारासाठी ताब्यात घेतला होता. याप्रकरणी खल्लार पोलिसांनी घटनेची नोंद केली असून आत्महत्येचे नेमके कारण अद्याप कळू शकले नाही.

### ट्युशनवरून परतणाऱ्या

तिच्याशी जबरदस्तीने संवाद साधण्याचा प्रयत्न केला. 'तुझ्यावर माझे सतत लक्ष आहे' असे सांगत तिच्यावर मानसिक दबाव टाकण्यात आला. त्यानंतर मुलीने त्याच्याशी बोलणे टाळल्यास तिचे फोटो आणि व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित करण्याची धमकी दिली. एवढेच नव्हे तर आपल्याला विरोध केल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशीही भीती दाखविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. घटनेनंतर मुलीने कुटुंबीयांना माहिती दिल्यानंतर प्रकरण पोलिसांपर्यंत पोहोचले. पीडितेच्या जबाबाच्या आधारे नांदगाव खंडेश्वर पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमे तसेच बाल लैंगिक अपराध संरक्षण (पोक्सो) कायद्याच्या कलम ८ व १२ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# अन्नदात्याला आर्थिक आधार

शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. राज्याची ग्रामीण अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर शेती व त्यासंबधित पुरक व्यवसायावर अवलंबून आहे. अतिवृष्टी, अनियमित पाऊस, महापुर, दुष्काळ, नैसर्गिक संकटे आणि गारपीट यामुळे शेती उत्पादनावर मोठा परिणाम होत असल्याने, परिणामी शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते आणि अनेकवेळा शेतकऱ्यांना घेण्यात आलेल्या कर्जाची वेळेत परतफेड करणे कठीण होते. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' जाहीर केली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांवरील कर्जाचा भार कमी करणे आणि त्यांना आर्थिक स्थैर्य मिळवून देणे हा आहे.

यापूर्वी शासनाने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना (२०१७), महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना (२०१९) आणि प्रोत्साहनपर लाभ योजना (२०२२) अशा विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मदत केली आहे. मात्र, कर्जमुक्तीनंतरही काही शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. त्यामुळे केवळ कर्जमाफी न करता शेतकऱ्यांना कायमस्वरूपी आर्थिक सक्षम करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांची गरज शासनाने व्यक्त केली आहे.

या योजनेंतर्गत दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीक कर्ज थकीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच, वेळेवर कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. या योजनेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे शेतकऱ्यांना वारंवार कर्जबाजारी होण्यापासून रोखण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करण्यात येणार आहेत. यामध्ये शेती क्षेत्र अधिक सक्षम करणे, बँकिंग व्यवस्था मजबूत करणे आणि




शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपाय करणे यावर भर देण्यात आला आहे.

कर्जमुक्ती, एकवेळ समझोता (OTS) व प्रोत्साहनपर लाभ मिळण्यासाठी निकष निश्चित करण्यात आले आहेत. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी जे शेतकरी पात्र असणार नाहीत याबाबतच्या अटी व शर्ती ठरविण्यात आलेल्या आहेत. योजनेची अंमलबजावणी प्रक्रिया संपूर्णपणे ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहेत. यासाठी शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण करण्यात येणार असून, कर्जमाफीची रक्कम थेट त्यांच्या बँकखात्यात जमा करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत कर्जखातेदार शेतकऱ्यांच्या याद्या शासनाच्या कर्जमुक्ती पोर्टलवर अपलोड करण्याचे काम युध्दपातळीवर सुरु आहे.

या योजनेचा आढावा घेणे, निकषात बदल करण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे. तसेच राज्यातील शेतकऱ्यांना कृषी कर्जपुरवठा करणे हे सहकार विभागाचे प्रमुख कार्य असल्याने सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या स्तरावर कृषी कर्जासाठी सहकार आधार सामुग्री संचयिका (सहकार स्टॅक) स्थापित करण्यात आले आहे.

शेतकरी हा राज्याच्या विकासाचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे कर्जाचा ताण कमी करून त्याला नव्या उमेदीने शेती करण्याची संधी देणे हे या योजनेचे मोठे उद्दिष्ट आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने सुरू करण्यात आलेली ही योजना शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकते.

**– विभागीय माहिती कार्यालय,** अमरावती

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, २ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## उपजिल्हा रुग्णालय कारंजा चौकशी अहवालावर पडदा ?
## गंभीर ठपके, तरीही कारवाईचा अभाव ; अखेर वैद्यकीय अधीक्षकांचा बदल

■ प्रतिनिधी | कारंजा ■

**उपजिल्हा रुग्णालय, कारंजा (लाड) येथील सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी, प्रशासकीय अनागोंदी आणि डॉक्टरांच्या ड्युटी नियोजनातील गंभीर दोषांबाबत नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीने अत्यंत कठोर निरीक्षणे नोंदवत तत्कालीन वैद्यकीय अधीक्षकांचा प्रभार बदलण्यासह अनेक महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या होत्या. मात्र, चौकशी अहवाल सादर झाल्यानंतरही बराच काळ कोणतीही ठोस प्रशासकीय कारवाई न झाल्याने हा अहवाल जाणीवपूर्वक दडपला जात असल्याची चर्चा शहरात रंगली होती. दरम्यान, दि. ३० जून रोजी रुग्णालयाचा कार्यभार वैद्यकीय अधीक्षक भाऊसाहेब लहाने यांच्याकडे सोपविण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.**




मनसेचे प्रभारी शहराध्यक्ष कपिल अजय महाजन यांनी १३ मे २०२६ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ यांनी चौकशी समितीची नियुक्ती केली होती. समितीने १ जून २०२६ रोजी रुग्णालयात प्रत्यक्ष पाहणी करून अनेक धक्कादायक बाबी उघड केल्या.

चौकशीदरम्यान मेस्को (MESCO) सुरक्षा एजन्सीने समितीला आवश्यक कागदपत्रे, सुरक्षा रक्षकांची ड्युटी लिस्ट, हजेरीपत्रक व लेखी जबाब देण्यास नकार दिला. वरिष्ठांच्या सूचनेचा हवाला देत चौकशीत सहकार्य न केल्याची गंभीर नोंद समितीने केली. शासकीय चौकशी प्रक्रियेलाच आव्हान देणारी ही बाब असल्याचे समितीने स्पष्ट केले.

समितीच्या अहवालात रुग्णालय प्रशासनाकडे सुरक्षा रक्षकांची नियमित ड्युटी यादी उपलब्ध नसणे, जुन्या इमारतीतील नऊ सीसीटीव्ही कॅमेरे दीर्घकाळ बंद असणे, डॉक्टरांच्या ड्युटी नियोजनातील त्रुटी तसेच तत्कालीन वैद्यकीय अधीक्षकांचे रुग्णालय प्रशासनावर प्रभावी नियंत्रण नसल्याचा ठपका ठेवण्यात आला. त्यामुळे रुग्णालयाचा प्रभार अन्य सक्षम अधिकाऱ्याकडे सोपविण्याची स्पष्ट शिफारस करण्यात आली होती.

याशिवाय मेस्को सुरक्षा एजन्सीला कारणे दाखवा नोटीस देणे, सुरक्षा रक्षक व साईट सुपरवायझरची बदली करणे, सात दिवसांत सर्व सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करणे आणि बायोमेट्रिक उपस्थितीची स्वतंत्र पडताळणी करण्याच्याही सूचना अहवालात करण्यात आल्या होत्या.

विशेष म्हणजे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांनी ९ जून २०२६ रोजी हा चौकशी अहवाल पुढील कार्यवाहीसाठी उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ यांच्याकडे सादर केला होता. मात्र त्यानंतर बराच काळ अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. चौकशी अहवाल असूनही संबंधितांवर कारवाई का होत नाही, दोषी अधिकाऱ्यांना अभय दिले जात आहे का, असे प्रश्न उपस्थित होत होते.

अखेर दि. ३० जून रोजी उपजिल्हा रुग्णालयाचा कार्यभार वैद्यकीय अधीक्षक भाऊसाहेब लहाने यांच्याकडे सोपविण्यात आल्याने चौकशी समितीच्या प्रमुख शिफारशीची अंशतः अंमलबजावणी झाल्याचे मानले जात आहे. मात्र, सुरक्षा एजन्सीवर कारवाई, सीसीटीव्ही यंत्रणा, जबाबदारी निश्चिती आणि इतर शिफारशींची पूर्ण अंमलबजावणी झाली आहे का, याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने नागरिकांची उत्सुकता कायम आहे.

चौकशी अहवालातील सर्व शिफारशींची पारदर्शक आणि वेळेत अंमलबजावणी करून दोषींवर जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी आता अधिक जोर धरू लागली आहे. अन्यथा चौकशी समित्यांचे अहवाल केवळ औपचारिकता ठरतील, अशी भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.

## याकुब खान हत्याकांड : मुख्य आरोपी वसीम उर्फ 'चावडया'ला ४ दिवसांची पोलीस कोठडी

### सहआरोपींचा शोध वेगाने ; हल्ल्यामागील कारणांचा तपास सुरू

■ प्रतिनिधी | अकोला ■

जुन्या शहरातील गाजलेल्या याकुब खान युनुस खान हत्याकांडातील मुख्य आरोपी वसीम अहेमद उर्फ 'चावडया' याला न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तपासासाठी आरोपीची कसून चौकशी करणे आवश्यक असल्याचा युक्तिवाद ग्राह्य धरत प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी ४ जुलैपर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली. या प्रकरणातील फरार सहआरोपी तसेच अन्य कोणाचा सहभाग आहे का, याचाही तपास आता वेगाने सुरू करण्यात आला आहे.



रामदासपेठ पोलीस ठाण्यात दाखल फिर्यादीनुसार, फिर्यादी इस्माईल खान याकुब खान यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, त्यांचे वडील याकुब खान युनुस खान हे दुपारच्या सुमारास रेल्वे स्टेशनकडून अग्रसेन चौकाच्या दिशेने इलेक्ट्रिक दुचाकीवरून जात होते. त्यावेळी जिजाऊ हॉलसमोरील रस्त्यावर आरोपी वसीम अहेमद उर्फ चावडया हा एका साथीदारासह विरुद्ध दिशेने मोटारसायकलवर आला. आरोपीने याकुब खान यांच्या दुचाकीला धडक दिली. धडकेनंतर त्याच्या मागे बसलेला साथीदार घटनास्थळावरून पसार झाला. धडकेमुळे याकुब खान रस्त्यावर पडताच आरोपी वसीमने जवळील धारदार शस्त्र काढून त्यांच्या छातीवर, पोटावर आणि डाव्या मांडीवर सपासप वार केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. गंभीर जखमी अवस्थेत आरोपी पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना नागरिकांनी प्रसंगावधान राखत त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.

जखमी याकुब खान यांना प्रथम शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर अधिक उपचारासाठी आयकॉन हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे सुरुवातीला जीवघेणा हल्ल्याचा दाखल असलेल्या गुन्ह्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१) अंतर्गत खुनाचे कलम वाढविण्यात आले. या प्रकरणी रामदासपेठ पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९(१), ३(५) तसेच नंतर १०३(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी वसीम अहेमद उर्फ चावडया गुलाम अयुब (रा. नवाबपुरा, जुने शहर, अकोला) याला अटक करून न्यायालयासमोर हजर करण्यात आले. पोलीस निरीक्षक शिरीष खंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक संदीप बालोद यांनी सरकारी वकील श्री. साहू यांच्या सहाय्याने न्यायालयात पोलीस कोठडीची मागणी केली. तपासाच्या दृष्टीने आरोपीची सखोल चौकशी आवश्यक असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर न्यायालयाने ४ जुलैपर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली.

दरम्यान, हल्ल्यात सहभागी झालेला फरार साथीदार कोण आहे, या गुन्ह्यामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, हल्ल्याचे नेमके कारण काय होते आणि कटपूर्वक हा हल्ला करण्यात आला होता का, या सर्व बाबींचा तपास रामदासपेठ पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पथक संयुक्तपणे करीत आहेत. फरार आरोपींच्या शोधासाठी विविध ठिकाणी शोधमोहीम सुरू असून या हत्याकांडातील आणखी धागेदोरे उलगडण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

## रेल्वे मधील मोबाईल चोरट्यांकडून १८ मोबाईल जप्त



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

पोलीस स्टेशन मालेगाव जिल्हा वाशिम येथे आज दिनांक ३० जुन रोजी गुप्त बातमीदार यांचे कडून माहिती मिळाली की एक इसम हा कमी किमती मध्ये मोबाईल विकत आहे, त्याचे कडे कोणतेही बील नाही अशा माहितीनुसार ग्राम मेडशी तालुका मालेगाव जिल्हा वाशिम येथे जाऊन नमुद ईसमास ताब्यात घेण्यात आले व त्यास त्याचे नाव विचारले असता त्यांनी त्याचे नाव किशनलाल शंकरलाल तापडिया वय ४० वर्षे रा चाटोरी ता.पालम जि.परभणीअसे सांगितले.

त्याची बॅग ची झडती घेतली असता वेगवेगळया कंपनीचे एकुण १८ मोबाईल एकुण किंमत २,५३,५०० रुपयाचे मिळुन आले आहे. सदर मोबाईल बाबत विचारपूस केली असता सर्व मोबाईल हे त्याने रेल्वे मधून प्रवाशांचे चोरले आहे असे सांगितले.

सदर मोबाईल ची अधिक चौकशी केल्यावर एक मोबाईल चोरीचा भुसावळ रेल्वे उेंइ पोलीस स्टेशन ला गुन्हा नोंद असल्याची माहिती मिळाली असून भुसावळ उेंइ पोलिसांना कळविण्यात आले आहे. नमूद आरोपी विरोधात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२४ प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

कारवाई पथक -पो नि. राजेश खेरडे यांचे मार्गदर्शनात झ्ग राजेश यलगुलवार, पोहेका. सुनिल पवार, शिवाजी काळे, पोका. वैभव झरकर,अमोल पवार. चालक पोहेकॉ. मनोज नेतनस्कर यांनी केली आहे.

## बैठकीत नव्या जिल्हा कार्यकारिणीच्या स्थापनेवर होणार चर्चा

### माजी आमदार डॉ. राजन साळवी आज अकोला दौऱ्यावर; शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक

■ प्रतिनिधी | अकोला ■

शिवसेनेचे माजी आमदार तथा अकोला लोकसभा संपर्क प्रमुख डॉ. राजन साळवी गुरुवारी (२ जुलै) अकोला जिल्हा दौऱ्यावर येत असून, त्यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना अकोला जिल्हा कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. आगामी काळातील पक्षबांधणी, संघटनात्मक मजबुती आणि नवीन जिल्हा कार्यकारिणीच्या स्थापनेच्या अनुषंगाने या बैठकीत सविस्तर चर्चा होणार आहे.

ही बैठक गुरुवारी सकाळी ११ वाजता कृषक भवन, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ परिसर, मूर्तिजापूर रोड, अकोला येथे होणार आहे. जिल्ह्यातील पक्ष संघटनेला अधिक बळकटी देण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध विषयांवर या बैठकीत मार्गदर्शन व नियोजन केले जाणार असल्याची माहिती आहे. बैठकीला शिवसेनेचे आजी-माजी जिल्हाप्रमुख, महानगरप्रमुख, उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, शहरप्रमुख यांच्यासह महिला आघाडी, युवासेना आणि सर्व संलग्न आघाड्यांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. जिल्हा पातळीवर सक्रियपणे पक्षाचे काम करण्यास इच्छुक असलेल्या आजी-माजी पदाधिकाऱ्यांनीही बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. डॉ. राजन साळवी यांच्या दौऱ्याची आणि बैठकीची माहिती शिवसेना जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अनिल मालगे यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

## बुद्धिबळ खेळाडू विदित लबडे आंतरराष्टीय चेस फिडे रेटिंगमध्ये

**अकोला :** स्थानिक पोद्दार इंटरनॅशनल स्कुल चा विद्यार्थी व ब्रिलियंट चेस अकादमीचा खेळाडु विदित सुनील लबडे याने आपल्या उत्कृष्ट बुद्धिबळ खेळाचे प्रदर्शन करीत त्याने आंतरराष्टीय बुद्धिबळ फिडे रॅपिड रेटिंग १५२० प्राप्त केले. त्याने पहिल्याच खेळात आंतरराष्टीय फिडे मानांकित खेळाडुना हरवुन ही रेटिंग मिळवली.

## आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर पालखी मार्गावरील उघड्या मांसविक्रीवर बंदीची मागणी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

आषाढी एकादशीच्या पवित्र वारी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पालखी मार्गावरील तसेच वाशीम जिल्ह्यातील मुख्य रस्त्यांवरील उघड्यावर होणारी मांस विक्री तातडीने बंद करण्यात यावी, अशी मागणी नगरपरिषद वाशिमचे नगरसेवक गणेश प्रकाश खंडाळकर यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पंढरपूरची आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक असून दरवर्षी लाखो वारकरी संतांच्या पालख्यांसह पायी पंढरपूरकडे प्रस्थान करतात. वारकरी संप्रदायात सात्विक आहाराला विशेष महत्त्व असून, पालखी मार्गावर मुख्य रस्त्यांच्या कडेला उघड्यावर मटण, चिकन व मासे विक्री होत असल्याने अनेक वारकऱ्यांच्या धार्मिक भावना दुखावल्या जात असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

यासंदर्भात प्रशासनाने आषाढी वारीच्या कालावधीत जिल्ह्यातील मुख्य पालखी मार्ग, गावांचे व शहरांचे प्रमुख प्रवेशमार्ग तसेच मुख्य रस्त्यांवरील उघड्या मांस विक्रीवर तात्पुरती बंदी घालावी, सर्व मांस विक्रेत्यांना अधिकृत मटण मार्केट किंवा बंदिस्त जागेतूनच व्यवसाय करण्याचे निर्देश द्यावेत आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

वारकरी संप्रदायाची श्रद्धा, पालखी सोहळ्याचे पावित्र्य आणि धार्मिक वातावरण अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने योग्य ते आदेश जारी करावेत, अशी अपेक्षा नगरसेवक गणेश प्रकाश खंडाळकर यांनी व्यक्त केली आहे.

या निवेदनाची प्रत नगरपरिषद वाशिमचे नगराध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक यांनाही योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे.

## कृषी क्रांतीच्या प्रणेत्याला तालुक्याचा सलाम

### माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा ११३ वा जन्मोत्सव उत्साहात



■ प्रतिनिधी | मानोरा ■

महाराष्ट्राला हरित क्रांतीच्या वाटेवर नेणारे, राज्याचे दीर्घकाळ मुख्यमंत्री राहिलेले व 'कृषी औद्योगिक क्रांतीचे प्रणेते' म्हणून ओळखले जाणारे स्व. वसंतराव नाईक यांचा ११३ वा जन्मोत्सव मानोरा शहरासह संपूर्ण तालुक्यात मोठ्या उत्साहात व कृतज्ञतेने साजरा करण्यात आला. विठोली येथील प्राथमिक शाळेत ज्यांचे बालपण गेले, त्या या महान सुपुत्राला तालुकावासियांनी अभिवादन केले. पूर्वीच्या मंगरूळनाथ तालुक्यातील विठोली येथील जि.प. प्राथमिक शाळेत वसंतराव नाईक यांनी काही वर्षे प्राथमिक शिक्षण घेतले होते. त्यामुळे मानोरा तालुक्याचे त्यांच्याशी एक भावनिक नाते जोडले गेले आहे. शेतकऱ्यांच्या मुलाने मुख्यमंत्री होऊन शेती व शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले, याचा तालुक्याला अभिमान आहे.

## एंजेल मर्सी कॉलेजवर विद्यार्थ्यांच्या शोषणाचा आरोप

■ प्रतिनिधी | अकोला ■

कान्हेरी सरप येथील एंजेल मर्सी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांचे आर्थिक, शैक्षणिक आणि मानसिक शोषण होत असल्याचा गंभीर आरोप 'सम्यक विद्यार्थी आंदोलन' या विद्यार्थी संघटनेने केला आहे. या प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी संघटनेने समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

### चौकशीची मागणी, सम्यक विद्यार्थी तर्फे आंदोलनाचा इशारा



संघटनेच्या निवेदनानुसार, महाविद्यालयात शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून विद्यार्थ्यांकडून नियमबाह्य अतिरिक्त शुल्क वसूल केले जात आहे. या शुल्काची अधिकृत पावती दिली जात नसल्याची तक्रारही करण्यात आली आहे. तसेच शिष्यवृत्ती व प्रवेश प्रक्रियेत मनमानी केली जात असून, शुल्क न भरल्यास विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरू दिला जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याशिवाय विद्यार्थ्यांची मूळ शैक्षणिक कागदपत्रे अडवून ठेवून त्यांच्यावर मानसिक दबाव टाकला जात असल्याचा दावा संघटनेने केला आहे. या प्रकारामुळे विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत असून त्यांच्या शिक्षणाच्या हक्कावर गदा येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सम्यक विद्यार्थी आंदोलनाने महाविद्यालयाच्या संपूर्ण कारभाराची सखोल चौकशी करून दोषी व्यवस्थापन व संबंधित अधिकाऱ्यांवर प्रशासकीय तसेच कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. नियमबाह्य पद्धतीने वसूल केलेले अतिरिक्त शुल्क विद्यार्थ्यांना परत करण्यात यावे, तसेच विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे कोणत्याही अटीशिवाय तातडीने परत देण्यात यावीत, अशीही मागणी करण्यात आली आहे. याप्रकरणी महाविद्यालय प्रशासनाची बाजू जाणून घेण्यासाठी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची त्वरित दखल घेऊन योग्य ती कारवाई न केल्यास विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे. निवेदन देताना जिल्हाध्यक्ष इंजि. धीरज इंगळे, अक्षय डोंगरे, अंकित इंगळे, अंकुश धुरंधर, रोहन शिवधारकर, सोहम धर्माधिकारी यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## अखेर विद्यार्थ्यांची तहान भागली! खेट्री उर्दू शाळेतील दोन्ही हातपंप सुरू

### युवासेनेचे सर्कल प्रमुख सय्यद समीर यांच्या पाठपुराव्याला यश

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समितीअंतर्गत खेट्री येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेतील अनेक महिन्यांपासून बंद पडलेले दोन्ही हातपंप अखेर दुरुस्त करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी होत असलेली परवड, पालकांचा वाढता संताप आणि सातत्याने होत असलेल्या पाठपुराव्यानंतर अखेर संबंधित विभागाला जाग आली. विशेष म्हणजे, या गंभीर समस्येवर दैनिक 'जनमाध्यम'ने १ जुलैच्या अंकात वृत्त प्रकाशित करताच प्रशासनाने तातडीने हालचाल करत त्याच दिवशी दोन्ही हातपंप दुरुस्त करून सुरू केले.

गेल्या अनेक महिन्यांपासून शाळेतील दोन्ही हातपंप बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी इतरत्र भटकावे लागत होते. उन्हाळा आणि पावसाळ्याच्या उंबरठ्यावरही विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधेपासून वंचित राहावे लागत असल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजी होती. अनेकदा संबंधित विभागाकडे तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने हा प्रश्न अधिकच गंभीर बनला होता. या पार्श्वभूमीवर पालकांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे युवासेनेचे सर्कल प्रमुख सय्यद समीर यांच्याकडे धाव घेतली. पालकांच्या तक्रारीची गांभीर्याने दखल घेत सय्यद समीर यांनी ३० जून रोजी थेट पातूर पंचायत समिती कार्यालय गाठून गटविकास अधिकाऱ्यांची भेट घेतली. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित हा प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी त्यांनी केली. गटविकास अधिकाऱ्यांनी संबंधित यंत्रणेला तात्काळ आवश्यक सूचना दिल्यानंतर हातपंप दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले. त्यानंतर १ जुलै रोजी दोन्ही हातपंप कार्यान्वित करण्यात आले. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध झाले असून त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.




पाण्याविना उर्दू शाळा ; विद्यार्थ्यांची भटकंती
खेट्रीतील जिल्हा परिषद शाळेचे दोन्ही हातपंप सहा महिन्यांपासून बंद
आंदोलनाचा इशारा

या कार्यवाहीमुळे विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असून, प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी पुढाकार घेतल्याबद्दल युवासेनेचे सर्कल प्रमुख सय्यद समीर यांचे आभार मानले. तसेच विद्यार्थ्यांच्या मूलभूत सुविधांच्या प्रश्नांकडे प्रशासनाने यापुढेही संवेदनशीलतेने लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

**'जनमाध्यम' च्या वृत्ताचा प्रभाव**

खेट्री येथील उर्दू शाळेतील बंद हातपंपांमुळे विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी होणाऱ्या हालअपेष्टांबाबत दैनिक 'जनमाध्यम'ने १ जुलै रोजी वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्ताची तातडीने दखल घेत प्रशासनाने त्याच दिवशी दोन्ही हातपंपांची दुरुस्ती पूर्ण करून विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून दिली.

त्यामुळे 'जनमाध्यम'च्या वृत्ताचा सकारात्मक परिणाम झाल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

# सचिन अहिरांची उपसभापतिपदी बिनविरोध निवड

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना ठाकरे गटाला धक्का देत आमदार सचिन अहिर यांनी शिंदेंच्या शिवसेनेकडून विधान परिषद उपसभापतिपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यानंतर, आज त्यांची उपसभापतिपदी निवड झाली. सत्ताधारी पक्षाकडून सचिन अहिर यांचा प्रस्ताव तर महाविकास आघाडीकडून ज. मो. अभ्यंकर यांचा प्रस्ताव निवडणुकीसाठी आला आहे. मात्र, सभागृहाची इच्छा आहे सर्वानुमते निवड व्हावी. त्यामुळे आम्ही आमचा प्रस्ताव मागे घेत आहोत, असे शिवसेना आमदार अनिल परब यांनी म्हटले. त्यानंतर, सचिन अहिर यांची उपसभापतिपदी बिनविरोध निवड झाली असून मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

ज. मो. अभ्यंकर यांचा प्रस्ताव आम्ही मागे घेत आहोत असे म्हणत राष्ट्रवादीकडून संजय खोडके यांनी सचिन अहिर यांच्या निवडीचा प्रस्ताव मांडला, विक्रम काळे यांनी अनुमोदन दिले. भाजपकडून प्रवीण दरेकर यांनी प्रस्ताव मांडला, त्याला धैर्यशील कदम यांनी अनुमोदन दिले, शिवसेनेकडून मनीषा कायंदे यांनी प्रस्ताव मांडला त्याला रवींद्र फाटक यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर, बहुमताने हा प्रस्ताव मंजूर झाला आणि आमदार सचिन अहिर यांची विधान परिषद उपसभापति पदासाठी निवड जाहीर करण्यात आली.सचिन अहिर यांच्या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात



आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या राजकीय प्रवासाची माहिती देत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे कौतुक केले.

**अहिर शब्दाचा अर्थ उलगडला-** उपसभापतिपदी सचिन अहिर यांची एकमताने निवड झाली आहे. विरोधी पक्षाचे देखील आभार मानतो. त्यांनी देखील सभागृहाचा मान राखून प्रस्ताव मागे घेतला. १९९९ साली मी आणि सचिन अहिर सोबत निवडून आलो होतो. अहिर या शब्दाचा अर्थ गोपालक आणि निर्भीड असा आहे. मला त्यांच्याबाबत अनुभव आहे, ते निर्भीडपणे काम करणारे व्यक्ती आहेत, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सचिन अहिर यांचे कौतुक करत अहिर शब्दाचा अर्थ देखील सांगितला.

**योग्य वेळी योग्य निर्णय घेण्यात ते हुशार-** उपसभापतिपदाच्या खुर्चीवर बसल्यावर प्रत्येकाला न्याय द्यायचा असतो. सचिन अहिर ते काम करतील. आतापर्यंत उपसभापती म्हणून ज्यांनी काम केलं त्या नीलम गो-हे यांचे देखील अभिनंदन करतो. प्रसंगी कठोर भूमिका घेणा-या त्या आहेत. मधल्या काळात संघर्षाचा काळ होता, त्यावेळी देखील त्यांनी चांगले काम केले. सचिन अहिर यांची कारकीर्द म्हणजे चळवळीतून तयार झालेला कार्यकर्ता अशी ओळख आहे. मिल मजदूर संघाचे कार्यकर्ते म्हणून त्यांनी काम केले आहे. १९९९ साली विधानसभेत आमदार झाले. त्यानंतर ३ वेळा निवडून आले. २००९ साली राज्यमंत्री म्हणून त्यांनी काम केले. समर्पक उत्तर देणारा मंत्री म्हणून सचिन भाउंची ओळख होती. महत्त्वाचा प्रश्न आला की काय अपेक्षा आहे, असे देखील म्हणायचे, अशी आठवणही देवेंद्र फडणवीसांनी करून दिली. सचिन अहिर यांची दहीहंडी विशेष चर्चेत असायची. सामाजिक क्षेत्रात चांगले काम आहे. योग्यवेळी योग्य निर्णय घेण्यात ते हुशार आहेत. ज्यावेळी सभागृहात ते आले त्यावेळी ते धनुष्यबाण चिन्हावर आले. त्यामुळे बदल असा काही घडला नाही, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**अहिरांना सचिन तेंडुलकरची उपमा-** प्रत्येकाच्या काम करण्याच्या पद्धती असतात, वेगळे गुण असतात. आपल्या टीममध्ये ऑल राउंड विक्रम करणारे खेळाडू असताना कधी कधी वेगळे निर्णय घ्यावे लागतात. नावात सचिन आहे, त्यांना योग्यवेळी निर्णय घेता येतो. एक सचिन नाव मोठं करून निवृत्त झाला आहे, दुसरा आता पॅड घालून मैदानात नवीन इनिंग खेळतोय, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी सचिन अहिर यांना माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरची उपमा दिली. तसेच, शायरीतून त्यांचे स्वागतही केले. तुफान में जो शांत रहे उसे समुंदर कहते है, जो सबके दिल पर राज करते है उसे सिकंदर कहते है..अशी शायरी एकनाथ शिंदेंनी यावेळी बोलून दाखवली.

## वारक-यांच्या 'चरण सेवेला' प्रारंभ

**मुंबई/प्रतिनिधी :** आषाढी वारीदरम्यान पंढरपूरकडे पायी जाणा-या लाखो वारक-यांना मोफत आरोग्यसेवा आणि चरण सेवेचा लाभ मिळावा, यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील 'चरण सेवा' उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे. राज्यातील ११ जिल्ह्यांतील पालखी मार्गावरील सुमारे ४०० मुक्कामस्थळी हा उपक्रम राबविण्यात येणार असून, १२ हजारांहून अधिक डाक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय विद्यार्थी आणि स्वयंसेवक वारक-यांच्या सेवेसाठी सज्ज राहणार आहेत. वारक-यांच्या पायांवरील ताण कमी करण्यासाठी सुमारे ३ हजार लिटर औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायांची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच




आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयात संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच गरजेनुसार रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे. याशिवाय, पालखी मार्गावर ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळ्यातील आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैली आणि प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन वारकरी व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे. कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले की, गतवर्षी 'चरण सेवा' उपक्रमाला वारक-यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमातून १ लाख ७५ हजारांहून अधिक वारक-यांना थेट चरण सेवा, वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या, तर १० लाखांपेक्षा अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यात आला. 'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची' या संकल्पनेवर आधारित 'चरणसेवा' उपक्रमातून वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सेवेची जोड देण्यात आली असून, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने सर्व वारकरी, दिंडी प्रमुख आणि पालखी मार्गावरील नागरिकांना या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

## माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना राज्यपालांचे अभिवादन

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी लोकभवन येथे वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले.यावेळी राज्यपालांचे सहसचिव एस. राममूर्ती, राज्यपालांचे परिवार प्रबंधक डा निशिकांत देशपांडे तसेच लोकभवनातील कर्मचारी व अधिकारी तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

## जीएसटी' मध्ये महाराष्ट्र ही देशाची राजधानी- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :**देशात सर्वात जास्त वस्तू व सेवा कर संकलन करण्यामध्ये महाराष्ट्र हे देशामध्ये अव्वल आहे. वस्तू व सेवा कर संकलनाच्या मोबदल्यात केंद्र शासनाकडून सर्वाधिक लाभ मिळविणारे राज्यही महाराष्ट्र आहे. त्यामुळे जीएसटी व्यवस्थेमध्ये महाराष्ट्र ही देशाची राजधानी आहे, कसे गौरवद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. तसेच देशामध्ये कर चोरी रोखण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित यंत्रणा उभारणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याचेही त्यांनी सांगितले.रवींद्र नाट्य मंदिर सभागृहात ९ व्या वस्तू व सेवा कर दिवस समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, महापौर रितू तावडे, केंद्रीय वस्तू व सेवा कर विभागाचे मुख्य आयुक्त प्राची स्वरूप, पुणे



विभागाचे मुख्य आयुक्त नीरज कंसल, राज्य सेवा व वस्तू कर आयुक्त आशिष शर्मा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, वित्तीय सुधारणा अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी उपस्थित होते.'एक देश, एक कर आणि एक बाजार' अशी व्यवस्था निर्माण करणारा जीएसटी कर ही ऐतिहासिक सुधारणा असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जीएसटीमुळे भारत ही प्रामाणिकपणे अप्रत्यक्ष कर भरणा-या करदात्यांची सोसायटी बनली आहे. जीएसटी हा जगामध्ये सर्वात मोठ्या वित्तीय सुधारणांपैकी एक आहे. देशातील बरेच अप्रत्यक्ष कर एकत्र करून जीएसटी लागू करण्यात आला. देशामध्ये अनेक दिवस जीएसटीवर राज्यांची सहमती घेण्याचे कार्य सुरू होते. याबाबत केवळ चर्चाच सुरू होत्या. अनेक अप्रत्यक्ष करांचा भरणा, या करांची चोरी रोखण्यासाठी प्रशासन व व्यापारी दोन्ही दबावात असायचे. अशा परिस्थितीत देशामध्ये व्यापार आणि उद्योगांची वाढ होत नव्हती. मात्र प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वात जीएसटी लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सुरुवातीच्या काळात राज्यांना जीएसटीतून मिळणा-या उत्पन्नाबाबत संदिग्धता होती. मात्र केंद्र शासनाने राज्याचे करातील उत्पन्न कमी आल्यास उत्पन्नातील कमी भरून काढण्याची हमी दिली. तसेच पुढील पाच वर्षे १४ टक्के वाढीव दराने जीएसटीतील परतावा देण्यास मान्यता दिली. हा यामधील अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा मानला जातो. भारत एवढ्यावरच थांबला नाही, तर ही व्यवस्था अधिक सक्षम आणि मजबूत करण्यासाठी केंद्र शासनाने '२. ओ ' टप्पा सुरू केला आहे. या व्यवस्थेमध्ये जीएसटी कौन्सिलची महत्त्वाची भूमिका आहे.

## विदर्भातील विकास अनुशेष पुन्हा निर्माण होउ देणार नाही-राज्यमंत्री आशिष जयस्वाल

**मुंबई/प्रतिनिधी :** विदर्भाच्या विकासाचा अनुशेष पुन्हा निर्माण होउ नये, यासाठी शासन कटिबद्ध असून विधानसभेत दिलेल्या प्रत्येक आश्वासनाच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवले जाईल, अशी माहिती राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी विधानसभेत दिली.सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेवरील मुद्द्यांना उत्तर देताना राज्यमंत्री जयस्वाल म्हणाले की, वैधानिक विकास महामंडळ स्थापन होईपर्यंत विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रात नवीन विकास अनुशेष निर्माण होणार नाही, याची शासन दक्षता घेण्यात येईल. विभागनिहाय अर्थसंकल्पीय तरतुदींसह प्रत्यक्ष खर्चाची आकडेवारी नियमितपणे सभागृहासमोर सादर करण्याचे निर्देश दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.ते म्हणाले की, वैधानिक विकास महामंडळ हे केवळ विदर्भासाठी नसून विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागांना न्याय देण्यासाठी आहे. महाराष्ट्राचा समतोल विकास करणे ही शासनाची जबाबदारी असून कोणताही भाग विकासापासून वंचित राहणार नाही.विदर्भ आणि मराठवाड्यातील शासकीय नोक-यांमधील अनुशेषाची माहिती संकलित करून तो दूर करण्यासाठी उपाययोजना केल्या जातील. नक्षलग्रस्त भागांतील रिक्त पदे दीर्घकाळ रिक्त राहू दिली जाणार नाहीत. आवश्यक असल्यास नक्षल भत्ता देण्याबाबत तसेच नव्याने भरती झालेल्या कर्मचा-यांना प्राधान्याने विदर्भात नियुक्ती देण्याबाबत विचार केला जाईल. राज्यातील सर्व भागांत रिक्त पदांचे प्रमाण समतोल राहील, याची दक्षता घेतली जाईल, असे त्यांनी सांगितले.धान उत्पादक शेतक-यांच्या बोनसबाबत शासनाची भूमिका सकारात्मक असून निर्णय अद्याप प्रलंबित आहे. तसेच मानव विकास अभियानाऐवजी १७७ आकांक्षित तालुक्यांसाठी नवीन विकास कार्यक्रम राबविण्यात येणार असून त्यात विदर्भातील अधिक तालुक्यांचा समावेश केला जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.विदर्भातील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी उद्योगमंत्र्यांसोबत तसेच आवश्यक असल्यास मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत बैठक घेउन नवीन उद्योग व गुंतवणूक आणण्यासाठी प्रयत्न केले जातील.

# नैसर्गिक व तंत्रज्ञानाधारित शेतीत महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करेल-राज्यपाल

### ■ राज्यस्तरीय कृषी पुरस्कार 2023-24 चे वितरण ■ डॉ. संजय ज्ञानदेव पाटील व यज्ञेश वसंत सावे डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्काराचे मानकरी

**मुंबई/प्रतिनिधी :** दिवंगत वसंतराव नाईक यांनी शेतकरी आणि कृषी क्षेत्राच्या विकासासाठी दूरदृष्टीने अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले. सत्तरच्या दशकात महाराष्ट्र भीषण दुष्काळाचा सामना करत असताना त्यांनी कृषी क्षेत्राला नवी दिशा दिली. राज्यात कृषी विद्यापीठांच्या स्थापनेत त्यांचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. वरळी येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे कृषी विभागातर्फे माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त १ जुलै या कृषि दिनानिमित्त आयोजित कृषि पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषि मंत्री दत्तात्रय भरणे,जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, आयुक्त सुरज मांढरे यासह राज्यातील कृषि पुरस्कार विजेते उपस्थित होते. डा.पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार २०२३ कोल्हापुर विभाग मधून मु.पो.तळसंदे, ता.हातकणंगले, येथील डा.संजय ज्ञानदेव पाटील यांना तर २०२४ चा ठाणे विभागातून जि.पालघर, ता. तलासरी, मु.पो.ब्राम्हणगाव (झाई बोरीगाव) येथील यज्ञेश वसंत सावे यांना तीन लाखांचे पारितोषिक व सन्मानपत्र वितरण करण्यात आले. कृषि विभागात प्रातिनिधीक स्वरूपात लॅपटापचे वितरण करण्यात आले.







### कृषी ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची आणि अर्थव्यवस्थेची जीवनवाहिनी

राज्यपाल वर्मा म्हणाले की, भारताची संस्कृती, परंपरा आणि समृद्धीचा पाया शेतकरी आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अनेकदा शेतक-यांचे कल्याण ही केंद्र सरकारची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे स्पष्ट केले आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, पीक विमा योजना आणि किसान क्रेडिट कार्ड यांसारख्या योजनांमुळे शेतक-यांना आर्थिक सुरक्षा मिळत असून पशुपालक आणि मत्स्यव्यवसायिकांनाही कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध होत आहे.'बीज ते बाजार' ही संकल्पना शेतक-यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य बाजारपेठ आणि योग्य भाव मिळवून देण्यासाठी प्रभावी ठरत आहे. राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले की, ड्रोन तंत्रज्ञान, मृदा आरोग्य पत्रिका आणि नैसर्गिक खतांचा वापर यासारख्या उपक्रमांमुळे कृषी उत्पादकतेत वाढ होत आहे. राज्य शासनाने शेती अधिक शाश्वत, तंत्रज्ञानाधारित, हवामान अनुकूल आणि बाजारपेठाभिमुख करण्यासाठी अनेक परिवर्तनशील उपक्रम हाती घेतले आहेत. मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत शेततळी, शेततळ्यांचे अस्तरीकरण आणि विविध जलसाठा संरचनांची मोठ्या प्रमाणावर उभारणी करण्यात आली आहे. हजारो शेततळी पूर्ण झाली असून लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट आर्थिक सहाय्य जमा करण्यात आले आहे. या उपक्रमांमुळे हवामान बदलाच्या आव्हानांना तोंड देणे आणि शाश्वत शेतीला चालना देणे शक्य झाले आहे. महाराष्ट्र नैसर्गिक शेतीच्या क्षेत्रात देशासाठी आदर्श ठरू शकतो. नैसर्गिक शेतीमुळे पर्यावरणाचे संरक्षण होईल, तसेच शेतक-यांचे उत्पन्न आणि समृद्धीही वाढेल. यासोबतच देशी गोवंशाचे संवर्धन आणि संरक्षण यावरही विशेष भर देण्याची गरज आहे. गोआधारित जैविक घटक नैसर्गिक शेतीचा

### पुढील पिढीला दुष्काळाची झळ बसू देणार नाही-मुख्यमंत्री

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील शेती अधिक सक्षम, शाश्वत आणि फायदेशीर करण्यासाठी जलसंधारण, सौर कृषी पंप, दिवसा मोफत वीज, कृषी यांत्रिकीकरण, प्रमाणित बियाणे, सिंचन सुविधा आणि शेतक-यांना आर्थिक आधार अशा विविध योजनांद्वारे राज्य शासन सातत्याने काम करत असून, 'महाराष्ट्राच्या पुढील पिढीला दुष्काळाची झळ बसू देणार नाही. राज्यात जलयुक्त शिवार अभियान आणि शेततळे योजनेच्या माध्यमातून २२ हजारांहून अधिक गावांमध्ये जलसंधारणाची व्यापक कामे करण्यात आली आहेत. या कामांमुळे अनेक भागांमध्ये एक पिकावरून दोन आणि तीन पिकांची शेती शक्य झाली असून, ज्या भागात शेती करणे कठीण होते, त्या ठिकाणीही फळबागा फुलू लागल्या आहेत. हवामान बदलाच्या आव्हानांवर मात करण्यासाठी जलसंधारण हा प्रभावी उपाय ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील शेतक-यांना मोफत वीज देण्याचा निर्णय प्रभावीपणे राबविण्यात येत असून, सौर कृषी पंपांच्या स्थापनेत महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. प्रधानमंत्री योजनेअंतर्गत देशभरात बसविण्यात आलेल्या सौर कृषी पंपांपैकी ६० टक्के पंप महाराष्ट्रात बसविण्यात आले आहेत. सध्या ७५ टक्के शेतक-यांना दिवसा वीज उपलब्ध होत असून, चालू वर्षाअखेर राज्यातील सर्व शेतक-यांना दिवसा १२ तास मोफत वीज उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे.

## सन 2023 व सन 2024 साठी 189 पुरस्कारार्थी कृषी पुरस्काराने सन्मानित

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार -२०२३** -अमरावती विभागातील श्री. हेंमत वसंतराव देशमुख म.पो.डोंगरकिन्ही ता.मालेगांव जि.वाशिम.

**जिजामाता कृषिभूषण पुरस्कार-२०२३** - अमरावती विभागातून सौ.ललीता विश्वास गोदमले मु.पो.रामगांव ता.मंगरुळपीर जि.वाशिम. नागपूर- सौ. प्रिती रिषी टेंभरे मु.पो.चुटीया ता. जि.गोंदिया

**कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार-२०२३-** अमरावती विभागातून श्री.निखील मधुकरराव तेटु मु.पो.कु-हा ता.तिवसा जि.अमरावती

**वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार-२०२३** - अमरावती श्री.हेंमत किसनराव निखाडे मु.पो.गुरुकुंज मोझरी, ता.तिवसा,जि.अमरावती.

**युवा शेतकरी पुरस्कार-२०२३** - अमरावती श्री.गणेश जगन्नाथ काळे मु.पो. तामशी ता.बाळापुर जि.अकोला, नागपुर सौ. प्रतिभा प्रमोद महाजन मु.पो. पवनी ता. जि. वर्धा.

**उद्यानपंडीत पुरस्कार-२०२३-**अमरावती श्री.कृष्णराव अण्णाराव देशट्टीवार मु. खैरगांव दे पो.सोनबर्डी ता.पांढरकवडा जि.यवतमाळ.,

**वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार** - वाशिम श्री.केशव मोतीराम भगत मु.पो.चांभई ता.मंगरुळपीर जि.वाशिम ,यवतमाळ श्री.विनोद रंगराव मैंद मु.उढी पो.मुडाना ता.महागांव जि.यवतमाळ ,अमरावती श्री.उमेश रामरावजी बगणे मु.शहापुर पो.हिरुळ पुर्णा ता.चांदुर बाजार जि.अमरावती, बुलढाणा श्री.रविंद्र राजकुमार तुरुकमाणे मु.पो.मादणी ता.मेहकर जि.बुलढाणा, नागपूर संतोष बाबाराव भगत-ता. उमरेड जि. नागपूर,

**वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार (आदिवासी गट)**- अमरावती सौ.वंदना सदानंद पांडे मु.खरबी पो.दराटी ता.उमरखेड जि.यवतमाळ,

**पद्मश्री डा. विठ्ठलराव विखे पाटील कृषि सेवारत्न पुरस्कार-२०२३** -अमरावती श्री. अनंतकुमार केशवराव देशमुख उपकृषी अधिकारी ता.कृ.अ. कार्यालय अकोट, जि.अकोला, नागपुर श्री मनोज झिबलराव गायधने उपकृषी अधिकारी गिरड, ता.कृ.अ. कार्यालय समुद्रपूर, जि.वर्धा,

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार** - अमरावती श्री.राहुल साहेबराव उभाले मु.पो. भिलोना, ता. अचलपूर, जि. अमरावती,

**जिजामाता कृषिभूषण पुरस्कार** -अमरावती सौ. वंदना देविदास धोत्रे मु.पो. विवरा, ता. पातुर, जि.अकोला

**कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार** - अमरावती श्री. राजेंद्र महादेव ताले मु.पो. दिग्रस, बु.ता. पातुर, जि. अकोला, नागपूर श्री.नंदकिशोर किसनराव गावंडे मु.आमगाव (मदणी), पो.आकोली, ता.सेलू, जि.वर्धा

**वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार-** अमरावती श्री. कृष्णा यशवंतराव लोखंडे मु.पो. ता. जि. अमरावती,

**युवा शेतकरी पुरस्कार**-अमरावती श्री कुलदीप गजानन टोळे मु. पानोरा, पो. टाकळी, ता. दर्यापूर जि. अमरावती,

**उद्यानपंडीत पुरस्कार** - अमरावती श्री.नवीनकुमार अरुणकुमार पेठे मु.पो.ता. मोर्शी, जि. अमरावती

**वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार (सर्वसाधारण गट)**-अमरावती श्री. बबन तुकाराम कुटे मु.पो. घाटा ता. मालेगाव जि. वाशिम, श्री. गजानन शंकरराव वानखेडे मु.पो. सुकळी ज. ता. उमरखेड जि. यवतमाळ २७ श्री. रामभाउ महादेवराव ढोरे मु.पो. ता. वरुड, जि. अमरावती, श्री. प्रितेश विजयराव डहाके मु.पो. डोणगाव, ता. मेहकर जि. बुलढाणा,श्री विठ्ठल पुरषोत्तम माळी मु.पो. बहादुरा, ता. बाळापुर जि. अकोला.

**वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार (आदिवासी गट)** -अमरावती श्री. रामगोपाल सखाराम मावस्कर मु.पो. टीटंबा ता. धारणी जि. अमरावती

**कृषि सेवारत्न पुरस्कार** - -अमरावती कु. रुपाली वसंतराव ठाकरे सहायक कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी भातकुली जि. अमरावती.


### -सायटेशन/जाहीरनामा-

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

**आर.एम.जे.सी.क्र.३९०/२०२६** **ने.ता.११.०८.२०२६**

अर्जदार - १. श्रीमती सुशिला हरिचंद्र संतापे, **वय ८० वर्षे, धंदा - घरकाम**
२. श्री अजय हरिचंद्र संतापे, **वय ४२ वर्षे, धंदा - शेती**
३. श्री रविंद्र हरिचंद्र संतापे, **वय ४० वर्षे, धंदा - शेती**
**सर्व रा.खोपडा, ता.मोर्शी, जि.अमरावती**
४) राजकुमार हरिचंद्र संतापे मयताचे वारस
४अ) श्रीमती ममता राजकुमार संतापे, **वय ४० वर्षे, धंदा - घरकाम**
४ब) निखिल राजकुमार संतापे, **वय २२ वर्षे, धंदा - शिक्षण**
४क) विक्रांत राजकुमार संतापे, **वय १९ वर्षे, धंदा - घरकाम**
**सर्व रा.खोपडा, ता.मोर्शी, जि.अमरावती**

-- विरुध्द --

कोणीही नाही

**वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-(८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे वडील तर अर्जदार नं.४ (अ) चे सासरे तर अर्जदार नं.४ (ब,क) चे आजोबा नामे** हरिचंद्र मंगल संतापे **हे** दिनांक १८/०१/२०१३ **रोजी खोपडा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मरण पावले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.**

**दिनांक २५.०६.२०२६** शिक्का **आदेशान्वये,** सहाय्यक अधीक्षक **दिवाणी न्यायालय, मोर्शी**



दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, यवतमाळ
एम.एस.पौळ यांचे न्यायालयात
३ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्र.श्रे. यवतमाळ,यवतमाळ

**दिवाणी किरकोळ अर्ज/२३७/२०२६**
वैशाली कमलकिशोर धर्माळे -वि- कोणीही नाही.
**पुढील ता.२७.०७.२०२६**

वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकरिता जाहीरनामा

अर्जदार : १. वैशाली कमलकिशोर धर्माळे
**वय अंदाजे ४७ वर्षे, धंदा-गृहिणी**
**रा.कृषक कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती**
**आणि अजनी नगर, अजनी रेल्वे स्टेशन, नागपुर, ता.जि.नागपूर**

-- विरुध्द --

गैरअर्जदार : कोणीही नाही

**ज्याअर्थी अर्जदार** १ वैशाली कमलकिशोर धर्माळे, वय अं.४७ वर्षे, धंदा-गृहिणी, रा.कृषक कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती आणि अजनी नगर, अजनी रेल्वे स्टेशन, नागपूर, ता.जि.नागपूर -विरुध्द- गैरअर्जदार -कोणीही नाही **यांनी वरील न्यायालयात** मयत नामे कमलाबाई दत्तात्रय गावंडे आणि मयत दत्तात्रय बाबलाजी गावंडे **यांचे वारस म्हणून बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज केला आहे.** मयत नामे कमलाबाई दत्तात्रय गावंडे यांचा मृत्यू दिनांक २४/११/२०१७ रोजी झाला **आणि मयत दत्तात्रय बाबलाजी गावंडे यांचा मृत्यू दिनांक १२/१०/२००७ रोजी झाला. करिता वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्जदारांनी या न्यायालयात** दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक २३७/२०२६ **दाखल केलेला आहे.**

**त्याअर्थी वरील सर्व अर्जदार हे सदहू मयतांचे वारस नव्हे व वारसाचे प्रमाणपत्र देऊ नये असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहिरनामा प्रसिध्द झालेल्या तारखेपासून एक महिन्याचे आंत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर मुदतीत योग्य हरकती न दाखविल्यास सदहू अर्जदार यांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास सदहू** मयत-कमलाबाई दत्तात्रय गावंडे आणि मयत दत्तात्रय बाबलाजी गावंडे **यांचे वारसाहक्काचे प्रमाणपत्र अर्जदारांना देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

**आज दिनांक २५/०६/२०२६रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली आहे.**

शिक्का **आदेशानुसार,** सहायक अधीक्षक **दिवाणी न्यायालय ,व.स्तर, यवतमाळ**



### -सायटेशन/जाहीरनामा-

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

**आर.एम.जे.सी.क्र.४०५/२०२६** **ने.ता.११.०७.२०२६**

अर्जदार - श्री.तुलाराम पुंजाजी मसाने,
**वय ८५ वर्षे, धंदा - शेती**
**रा.पाळा, ता.मोर्शी, जि.अमरावती**

-- विरुध्द --

कोणीही नाही

**वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-(८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराची बहिण नामे** नाजाबाई तुकाराम घोरपडे **ही** दिनांक २५/०८/२०२० **रोजी पाळा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मय्यत झालेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.**

**दिनांक २५.०६.२०२६** शिक्का **आदेशान्वये,** सहाय्यक अधीक्षक **दिवाणी न्यायालय, मोर्शी**



### -सायटेशन/जाहीरनामा-

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

**आर.एम.जे.सी.क्र.२९६/२०२६** **ने.ता.१३.०७.२०२६**

अर्जदार - १. श्री.सतिश श्रीरंग ठोंबरे, **वय ३९ वर्षे, धंदा - शेती**
२. श्री.धनराज श्रीरंगराव ठोंबरे, **वय ४३ वर्षे, धंदा - शेती**
**दोघेही रा.खानापुर, ता.मोर्शी, जि.अमरावती**
३. शोभा रमेशराव जपुलकर, **वय ५९ वर्षे, धंदा - घरकाम**
**रा.काटपूर (ममदापूर), ता.मोर्शी, जि.अमरावती**
४. वैशाली हरिभाऊ जामोदकर, **वय ४६ वर्षे, धंदा - घरकाम**
**रा.खेड, ता.मोर्शी, जि.अमरावती**
५. माधुरी विजय गायकी, **वय ४२ वर्षे, धंदा - घरकाम**
**रा.लहान आर्वी, ता.आष्टी,जि.वर्धा**

-- विरुध्द --

कोणीही नाही

**वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-(८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदारांचे वडिल नामे** श्रीरंग तुळशिराम ठोंबरे **हे** दिनांक ०६/१०/२०२५ **रोजी यांचे राहते घरी खानापुर,ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मय्यत झालेले आहे. तसेच अर्जदाराची आई नामे** सिंधु श्रीरंगराव ठोंबरे **ही दिनांक** ०७/११/२०१७ **रोजी खानापुर,ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मय्यत झालेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.**

**दिनांक २५.०६.२०२६** शिक्का **आदेशान्वये,** सहाय्यक अधीक्षक **दिवाणी न्यायालय, मोर्शी**

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २१५ ■ गुरुवार, २ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


### पाठीवर दप्तर... डोळ्यांत स्वप्नांची भरारी
## चिमुकल्यांच्या पावलांनी शाळा पुन्हा बहरल्या

**विरूळ आकाजी जनमाध्यम :** मंगळवारपासून विदर्भातील बहुतांश शाळा सुरू झाल्या असल्या, तरी बुधवार १ जुलैपासून अनेक विद्यार्थ्यांनी नव्या शैक्षणिक वर्षाची खरी सुरुवात केली. नवाकोरा गणवेश, चकचकीत बूट, पाठीवर दप्तर, हातात डबा आणि चेहऱ्यावर उत्साहाचे हास्य घेऊन चिमुकल्यांनी शाळेकडे धाव घेतली. शाळांच्या आवारात पुन्हा एकदा बालकिलबिलाट दुमदुमला. काहींच्या डोळ्यांत नवीन मित्रांची ओढ, तर



पालकांच्या नजरेत मुलांच्या उज्ज्वल भवितव्याची स्वप्ने दिसत होती. चिमुकल्यांच्या निरागस हास्याने शाळांचे अंगण पुन्हा एकदा आनंदाने फुलून गेले.

### जून कोरडाच गेला...
# शेतकऱ्यांची नजर आता दमदार पावसाकडे
## १.१३ लाख हेक्टरवर खरीप लागवड पूर्ण; कापूस, सोयाबीन, तुरीच्या पेरण्यांना वेग

**वर्धा जनमाध्यम :** यंदाचा मान्सून उशिराने दाखल झाल्याने जून महिन्याचे पहिले तीन आठवडे जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी अक्षरशः चिंतेचे ठरले. पावसाने दडी मारल्याने पेरणीची कामे खोळंबली, तर आकाशाकडे डोळे लावून बसलेल्या बळीराजाची धाकधूक वाढत गेली. अखेर २१ जूनपासून पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांनी शेतात धाव घेत खरीप पेरण्यांना वेग दिला. मात्र, संपूर्ण जून महिन्याचा आढावा घेतल्यास जिल्ह्यात सरासरीच्या केवळ ७१ टक्के पावसाची नोंद झाली असून तब्बल २९ टक्के पावसाची तूट कायम आहे. त्यामुळे खरीप हंगामाचे भवितव्य आता जुलै महिन्यातील दमदार पावसावरच अवलंबून आहे.

कृषी विभागाने यंदा जिल्ह्यात सुमारे ४ लाख १८ हजार हेक्टरवर खरीप पिकांची लागवड होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यापैकी आतापर्यंत १ लाख १३ हजार २२७ हेक्टरवर विविध खरीप पिकांची लागवड पूर्ण झाली आहे. पाऊस सुरू होताच कापूस, सोयाबीन आणि तुरीच्या पेरण्यांना वेग आला असून शेतकऱ्यांनी उपलब्ध ओलाव्याचा पुरेपूर फायदा घेतला आहे.

दरम्यान, खरीप हंगामात शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये म्हणून कृषी विभागाने जिल्ह्यात बोगस बियाणे आणि खत विक्रीविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. आठही तालुक्यांत प्रत्येकी एक आणि जिल्हास्तरावर एक अशा एकूण नऊ भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. बियाणे आणि खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण होऊ नये, यासाठीही प्रभावी नियोजन करण्यात आल्याचा दावा कृषी विभागाने केला आहे.

### सरासरीच्या केवळ ७१ टक्के पावसाची नोंद




**कपाशीला सर्वाधिक पसंती**

जिल्ह्यात आतापर्यंत ७१ हजार ९६.४६ हेक्टरवर कपाशीची लागवड झाली असून खरीप पिकांमध्ये कपाशीचाच सर्वाधिक वाटा आहे.

सेलू, देवळी, आष्टी आणि हिंगणघाट तालुक्यांत कपाशीच्या पेरण्यांना मोठा वेग मिळाला आहे.

**तालुकानिहाय खरीप लागवड**

सेलू – १९,७२५ हेक्टर
देवळी – १९,३६८.६६ हेक्टर
आष्टी – १७,४०५.६७ हेक्टर
वर्धा – १६,२१२ हेक्टर
हिंगणघाट – १२,७३४.५ हेक्टर
आर्वी – १२,२७३ हेक्टर
समुद्रपूर – ९,१८९.४ हेक्टर
कारंजा – ६,३३९.२ हेक्टर

**२६ हजार हेक्टरवर सोयाबीनचा पेरा**

शेतकऱ्यांचे दुसरे महत्त्वाचे पीक असलेल्या सोयाबीनची २६ हजार ६८८ हेक्टरवर लागवड झाली आहे. देवळी, सेलू आणि आष्टी तालुक्यांत सोयाबीन पेरणी आघाडीवर असून पावसाचा जोर कायम राहिल्यास पुढील काही दिवसांत या क्षेत्रात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.

**तुरीचाही पेरा सुरू**

जिल्ह्यात १५ हजार २०६.७ हेक्टरवर तुरीची लागवड झाली आहे. आर्वी, सेलू, देवळी आणि वर्धा तालुक्यांत तुरीच्या पेरणीलाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. सध्या पेरण्या वेगाने सुरू असल्या तरी खरीप हंगामाचे यश आगामी काही दिवसांतील मुसळधार पावसावरच अवलंबून आहे. त्यामुळे जिल्ह्यातील बळीराजाचे डोळे अजूनही आकाशाकडेच लागले असून दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

## हॉटेलमधील किरकोळ वादाचे हिंसक रूप
## युवकावर चाकूने जीवघेणा हल्ला
### नालवाडीतील घटना, जखमीवर सावंगीत उपचार, रामनगर पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू

**वर्धा जनमाध्यम :** नागपूर वर्धा मार्गावरील नालवाडी परिसरातील एका हॉटेलमध्ये किरकोळ वादातून युवकावर चाकूने जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी रात्री घडली. या हल्ल्यात इमरान खान हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर सावंगी मेघे येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेनंतर आरोपी फरार झाला असून रामनगर पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून शोधमोहीम सुरू केली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री सुमारे १० वाजताच्या सुमारास नालवाडी येथील एका हॉटेलमध्ये काही कारणावरून वाद झाला. सुरुवातीला शाब्दिक बाचाबाची झाल्यानंतर वादाने अचानक हिंसक वळण घेतले. संतापलेल्या आरोपीने इमरान खान याच्यावर चाकूने वार करत त्याला गंभीर जखमी केले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या इमरानला पाहताच परिसरात एकच खळबळ उडाली, तर हल्लेखोराने घटनास्थळावरून पळ काढला.

घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी आणि पोलिसांनी तत्काळ धाव घेत जखमीला सावंगी मेघे येथील रुग्णालयात दाखल केले. त्याच्यावर उपचार सुरू असून त्याची प्रकृती लक्षात घेऊन डॉक्टरांकडून आवश्यक वैद्यकीय उपचार केले जात



आहेत. या घटनेप्रकरणी रामनगर पोलिस ठाण्यात तक्रारीवरून गुन्हा नोंदविण्यात आला आहे. हल्ल्यामागील नेमके कारण काय, याचा पोलिसांकडून तपास सुरू असून फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष पथक कार्यरत आहे. शहरात वारंवार घडणाऱ्या चाकूहल्ल्यांच्या घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## पुण्यातील जीवदान, बोरच्या जंगलात नवी मुक्त वाटचाल
### रेस्क्यू केलेल्या गव्याला बोर व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर क्षेत्रात सोडले

**वर्धा जनमाध्यम :** पुण्यातील सिंहगड मार्गावरील विश्रांतीनगर परिसरात जलवाहिनीत अडकलेल्या गव्याची वनविभागाने धाडसी बचावमोहीम राबवत सुखरूप सुटका केली. त्यानंतर वैद्यकीय तपासणीत तो पूर्णपणे तंदुरुस्त असल्याचे स्पष्ट झाल्याने बुधवार (१ जुलै) रोजी त्याला वर्ध्यातील बोर व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर क्षेत्रात नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले.




मंगळवारी (३० जून) पुणे वनविभागाच्या पथकाने आव्हानात्मक परिस्थितीत जलवाहिनीत अडकलेल्या गव्याला सुरक्षित बाहेर काढले.

पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याची सखोल आरोग्य तपासणी केली असता कोणतीही गंभीर दुखापत अथवा मार लागलेला नसल्याचे निष्पन्न झाले. वन्यजीव संरक्षणाच्या सर्व नियमांचे पालन करून त्याला योग्य नैसर्गिक अधिवासात सोडण्याचा निर्णय घेण्यात आला.

यानंतर समृद्धी महामार्गाने रात्रभर प्रवास करून गव्याला बोर व्याघ्र प्रकल्पात आणण्यात आले. बुधवार, १ जुलै रोजी न्यू बोर परिसरातील कोअर क्षेत्रात त्याला निसर्गाच्या सान्निध्यात मुक्त करण्यात आले.

बोर व्याघ्र प्रकल्प हा वन्यजीव संवर्धनासाठी अत्यंत पोषक अधिवास मानला जातो. दरवर्षी उन्हाळ्यात गव्यांचा या परिसरात वावर आढळतो आणि पावसाळा सुरू झाल्यानंतर ते पुन्हा आपल्या मूळ अधिवासाकडे परततात. पुण्यातून आणलेल्या या गव्याच्या हालचालींवर वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी सातत्याने लक्ष ठेवून असून, त्याच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे.

## रस्त्यावर पुन्हा आठवडी बाजाराचा कब्जा, प्रशासनाची कारवाई ठरली फोल
### नागरिक हैराण, ठेकेदार प्रशासनाच्या मिलीभगतीची चर्चा - सेलूकरांचा संताप

**सेलू जनमाध्यम :** शहरातील आठवडी बाजार पुन्हा मुख्य रस्त्यावर भरू लागल्याने वाहतूक व्यवस्था कोलमडली असून नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. काही महिन्यांपूर्वी नगरपंचायत आणि पोलीस प्रशासनाने संयुक्त कारवाई करत बाजार मूळ जागी स्थलांतरित केला होता. त्यावेळी शहरातील मुख्य रस्ते मोकळे झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले होते. मात्र प्रशासनाची ती कारवाई अल्पायुषी ठरली असून आता पुन्हा रस्त्यांवर दुकाने थाटली जात असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.



विशेष म्हणजे वाहनतळासाठी राखीव ठेवलेल्या जागेवरही व्यापाऱ्यांनी अतिक्रमण केल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे वाहनधारकांना पार्किंगची मोठी समस्या निर्माण झाली असून बाजाराच्या दिवशी संपूर्ण शहरात वाहतूक कोंडी होत आहे. रुग्णवाहिका शालेय बस आणि अत्यावश्यक सेवांनाही याचा फटका बसत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.

दरम्यान बाजार पुन्हा रस्त्यावर येण्यामागे बाजार ठेकेदार आणि संबंधित यंत्रणांतील काही घटकांची मिलीभगत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. नियमांचे उल्लंघन करून काही व्यापाऱ्यांना रस्त्यावर व्यवसाय करण्याची मुभा कोणी दिली असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. सामाजिक कार्यकर्त्यांनीही या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाने केवळ दिखाऊ कारवाया न करता सातत्याने अंमलबजावणी करावी अशी मागणी केली आहे. नियम सर्वांसाठी समान असावेत अशी भूमिका घेत नागरिकांनी आगामी आठवडी बाजारापूर्वी नगरपंचायत आणि पोलीस प्रशासनाने प्रत्यक्ष मैदानात उतरून रस्ते अतिक्रमणमुक्त करावेत अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे. आता प्रशासन कठोर भूमिका घेणार की पुन्हा एकदा मूकदर्शक राहणार याकडे संपूर्ण सेलूकरांचे लक्ष लागले आहे.

## शेतकऱ्यांनी आधुनिक शेतीसोबत कृषी पूरक व्यवसाय करावेत- जिल्हाधिकारी वान्मथी सी
### निमगाव सबाने येथे कृषी दिन साजरा

**वर्धा जनमाध्यम :** एकापेक्षा अधिक पिके घेता यावी यासाठी शेतकऱ्यांनी सिंचन सुविधा वाढविण्यावर भर द्यावा. कृषी, पशुसंवर्धन विभाग व इतर संस्थांच्या मदतीने शेतीसोबतच कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्धव्यवसाय यासारखे पूरक व्यवसाय आत्मसात करावेत. कृषि विज्ञान केंद्राच्या मार्गदर्शनाखाली नाविन्यपूर्ण पिके घ्यावीत, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केले.

हरितक्रांतीचे जनक माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा कृषी दिन कृषि विज्ञान केंद्र, बायफ संस्था व नयारा एनर्जीच्या संयुक्त विद्यमाने निमगाव (सबाने) येथे साजरा करण्यात आला, त्यावेळी जिल्हाधिकारी बोलत होत्या. यावेळी विभागीय कृषी सहसंचालक उमेश घाडगे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी



अरविंद उपरीकर, कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.जीवन कतोरे, नायराचे डेपो प्रमुख संजय अग्रवाल, बायफचे मुख्य कार्यक्रम व्यवस्थापक शैलेश भगत, नाबार्डचे सुशांत पाटील आदी उपस्थित होते. विभागीय कृषी सहसंचालक उमेश घाडगे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी पावसाचे पाणी शेतात मुरवण्यासाठी प्रयत्न करावेत. सरी-वरंबा व बीबीएफ पद्धतीने पिकांची लागवड केल्यास पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते. डॉ.जीवन कतोरे यांनी यंदाच्या अल-निनो परिस्थितीत पिके वाचवण्यासाठी रुंद वरंबा सरी पद्धत, प्रत्येक तीन ओळीनंतर खोल डवरणी व रायझोबियम बीज प्रक्रिया करून नैसर्गिक युरिया निर्मितीचे महत्त्व सांगितले. अरविंद उपरीकर यांनी कीटकनाशक फवारणीवेळी घ्यावयाची काळजी व सेफ्टी किटचा वापर प्रात्यक्षिकासह समजावून सांगितला. यावेळी डॉ.निलेश वझीरे यांनी सोयाबीन, तूर, कपाशीवरील किड-रोग नियंत्रणाची माहिती दिली. डॉ.भारती तिजारे यांनी तण नियंत्रण व खत नियोजनातून उत्पादन वाढीचे उपाय, डॉ.सविता पवार यांनी ड्रोन फवारणी तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक दाखवले. डॉ.सचिन मुळे यांनी शेतीला जोडधंदा म्हणून कुक्कुटपालन, शेळीपालन व दुग्धव्यवसाय यांचे मार्गदर्शन केले. बायफचे वरिष्ठ प्रकल्प अधिकारी संजय बाभुळकर यांनी बायफ संस्थेच्या ७५ गावांमधील कृषी व दुग्धव्यवसाय उपक्रमांमुळे शेतकऱ्यांना झालेल्या फायद्याची माहिती दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय बाभुळकर, अस्मिता भांदालकर, डॉ. विक्रम भैये, चंदु वाघाडे यांनी परिश्रम घेतले.

## हिंगणघाटात अल्पवयीन मुलीच्या अपहरणाने खळबळ
### दोन संशयितांना अटक; सीसीटीव्ही व तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पोलिसांची कारवाई, मुलीचा शोध सुरू

**हिंगणघाट जनमाध्यम :** शहरात अल्पवयीन मुलीच्या अपहरणाच्या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी वेगाने तपासाची सूत्रे हलवत दोन संशयितांना अटक केली असून मुलीचा शोध घेण्यासाठी विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३० जूनच्या रात्री तक्रारदाराने अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याची फिर्याद दिल्यानंतर हिंगणघाट पोलिस ठाण्यात तातडीने गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी शहरातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक पुरावे आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरविली.

तपासादरम्यान यश सचिन श्रावणे आणि समीक्षा जंगले या दोघांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. पोलिस निरीक्षक अनिल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ मधील कलम १३७(२), ३५१(२), ७८(२), ३(५) तसेच संबंधित तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अपहृत मुलीचा शोध घेण्यासाठी विशेष पथक कार्यरत असून विविध ठिकाणी शोधमोहीम सुरू आहे. या घटनेमुळे हिंगणघाट शहरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास जमादार जगदीश चव्हाण करीत आहेत.

## टायर फुटताच भरधाव ऑटो पलटी, महिला गंभीर जखमी
### सेलू हिंगणी मार्गावरील घटना, नागरिकांच्या तत्परतेने वाचला जीव

**सेलू जनमाध्यम :** सेलू हिंगणी मार्गावरील घोराड परिसरात बुधवारी भरधाव तीनचाकी ऑटोचा समोरील टायर अचानक फुटल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात हिंगणी येथील सौ. सुरेखा संजय अवचट (४४) या गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर सेवाग्राम येथे उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार एमएच ३१ सीव्ही ७३६९ क्रमांकाचा ऑटो सेलूहून हिंगणीकडे जात होता. घोराड येथील सेवालाल महाराज मंदिरासमोर पोहोचताच ऑटोचा समोरील टायर अचानक फुटला. त्यामुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि भरधाव ऑटो रस्त्यावर पलटी झाला.



या दुर्घटनेत सुरेखा अवचट या ऑटोखाली दबल्या गेल्या.


अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जिवाची पर्वा न करता नागरिकांनी ऑटो उचलून त्याखाली अडकलेल्या सुरेखा अवचट यांची सुटका केली. त्यानंतर त्यांना तातडीने सेलू येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारांनंतर त्यांच्या कमरेला गंभीर दुखापत झाल्याचे निदर्शनास आल्याने त्यांना पुढील उपचारासाठी सेवाग्राम येथील रुग्णालयात हलविण्यात आले.

या अपघातामुळे काही काळ सेलू हिंगणी मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. स्थानिक नागरिकांनी दाखविलेल्या समयसूचकतेमुळे जखमी महिलेला वेळेत वैद्यकीय उपचार मिळाल्याने मोठा अनर्थ टळल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## जिल्ह्यातील कृषी पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते मंत्रालयात सत्कार

**वर्धा जनमाध्यम :** कृषी विभागाच्यावतीने सन २०२३ व २०२४ या वर्षातील राज्यस्तरीय कृषी पुरस्कारांसाठी निवड झालेल्या जिल्ह्यातील पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांचा पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी आज आपल्या मुंबई येथील मंत्रालयातील कार्यालयात सत्कार केला. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना राज्यस्तरीय पुरस्कार अभिमानास्पद आहे, असे सांगून त्यांनी पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांचे अभिनंदन केले व त्यांच्याशी संवाद साधला.

नाविन्यपूर्ण शेती, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, संशोधनाची जोड आणि अथक परिश्रम यांच्या बळावर पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांनी राज्यस्तरावर जिल्ह्याचा गौरव वाढविला आहे. त्यांच्या अनुभवातून आणि कार्यातून राज्यातील इतर शेतकऱ्यांनाही नवी प्रेरणा मिळेल, असा विश्वास पालकमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी शासन सदैव कटिबद्ध असून आधुनिक, शाश्वत व समृद्ध शेतीसाठी अशा प्रयोगशील शेतकऱ्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे, असे पालकमंत्री शेतकऱ्यांनी संवाद साधतांना म्हणाले. यावेळी



आ.राजेश बकाने हे देखील उपस्थित होते.

मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज कृषी दिनी या शेतकऱ्यांना पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

सन २०२३ चा युवा शेतकरी पुरस्कार पवनी येथील युवा प्रयोगशील महिला शेतकरी प्रतिभा प्रमोद महाजन यांना नाविण्यपूर्ण प्रयोग आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याबाबत तसेच उप कृषि अधिकारी मनोज झिबलराव गायधने यांनी प्रशासकीय सेवेत असतांना शेतकऱ्यांपर्यंत शासकीय योजना प्रभावीपणे पोहोचविल्याबद्दल शासकीय श्रेणीतील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील पुरस्कार देण्यात आला.


## जाहीर सुचना

माझे अशील श्री. सुरेश महादेवराव साठवणे हे मौजा सिंदी (मेघे) ता. व जि. वर्धा, मौजा क्र. ४१९ ग्रामपंचायत सिंदी ( मेघे )हद्दीतील फील्ड सर्व्हे क्र. ७१/३, १०५/१, १०६/३ (जुना) व नवीन सर्व्हे क्र. २३८/२ मधील पश्चिमेकडील भागातील प्लॉट क्र. २३, क्षेत्रफळ १३९.४५ चौ. मी. (१५००.००चौ. फूट) या मिळकतीचे मालक आहेत.

सदर मिळकतीच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत :

पूर्वेस : प्लॉट क्र. २३ मधील श्री. भेंडे यांच्या मालकीचा उर्वरित भाग.

पश्चिमेस : प्लॉट क्र. २४

उत्तरेस : प्लॉट क्र. २६ व २७

दक्षिणेस : ले-आऊट रस्ता.

श्री. सुधाकर महादेवराव कांबळे यांनी पश्चिमेकडील भागातील प्लॉट क्र. २३, क्षेत्रफळ १३९.४५ चौ. मी. (१५००.००चौ. फूट) ही मिळकत दिनांक ०२/०५/१९८९ रोजी दस्तऐवज क्र. २०८३/१९८९ अन्वये नोंदणीकृत विक्रीखताद्वारे माझे अशील श्री. सुरेश महादेवराव साठवणे यांच्या नावे विक्री केली आहे.माझ्या अशीलांचा मूळ लिंक दस्तऐवज म्हणजे दिनांक ०७/१०/१९८५ चे वाटणीपत्र, दस्तऐवज क्र. २६८०/१९८५ हरवलेले आहे.सध्या माझे अशील श्री. सुरेश महादेवराव साठवणे यांनी पश्चिमेकडील भागातील प्लॉट क्र. २३, क्षेत्रफळ १३९.४५ चौ. मी. (१५००.००चौ. फूट) बाबत सौ. हर्षाली चंद्रकांत आत्रे यांच्यासोबत विक्री करार केलेला आहे. सदर हरवलेल्या मूळ वाटणीपत्राबाबत माझ्या अशीलांच्या वतीने सौ. हर्षाली चंद्रकांत आत्रे यांनी पोलीस ठाण्यात प्रथम माहिती अहवाल (एफ.आय.आर) दाखल केलेला आहे. तसेच सदर मिळकतीवर कर्ज मिळविण्यासाठी सौ. हर्षाली चंद्रकांत आत्रे यांनी बंधन बँकेत कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

यास्तव सर्व संबंधितांना याद्वारे जाहीर कळविण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणाचा काही हक्क, दावा अथवा आक्षेप असल्यास किंवा हरवलेले दिनांक ०७/१०/१९८५ चे वाटणीपत्र, दस्तऐवज क्र. २६८०/१९८५ कोणास मिळून आल्यास, त्यांनी ही सार्वजनिक नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४ ) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधून लेखी स्वरूपात आपला दावा किंवा आक्षेप नोंदवावा. अन्यथा त्यानंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे किंवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधितांची राहील.

**ॲड. आर. आर. तिवारी**
रामनगर, वर्धा – ४४२००१
मो. क्र. ९९२२४२६१६८

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## युरोपमध्येही 'हिटवेव्ह'

मानवाच्या अनियंत्रित विकासाच्या मॉडेलमुळे निर्माण झालेला हवामान बदल आता केवळ पर्यावरणाचा विषय राहिलेला नाही; तो मानवी अस्तित्व, अर्थव्यवस्था आणि अन्नसुरक्षेशी थेट जोडला गेला आहे. गेल्या काही वर्षांपासून दक्षिण आशियात उष्णतेच्या लाटा आणि लांबलेला मान्सून ही जवळपास दरवर्षीची बाब झाली आहे.भारत, पाकिस्तान आणि बांगलादेश या तिन्ही देशांमध्ये उन्हाळ्यातील तापमान ४५ ते ५० अंश सेल्सियसपर्यंत पोहोचत आहे. त्याचवेळी मान्सूनचे आगमन उशिरा होणे, पावसात मोठे खंड पडणे आणि पर्जन्यमानाचे असमान वितरण ही संकटे अधिक तीव्र होत आहेत. परिणामी, लाखो नागरिकांचे आरोग्य, शेती, पाणीपुरवठा आणि रोजगार धोक्यात आले आहेत. उष्णतेच्या लाटा हा पूर्वी अपवादात्मक प्रकार मानला जात होता. आता मात्र तो नित्याचा अनुभव बनला आहे.हवामानशास्त्रज्ञांच्या मते, यंदाची उष्णतेची लाट केवळ तापमानामुळे नव्हे, तर तिच्या दीर्घ कालावधीमुळे अधिक धोकादायक ठरली आहे.अनेक भागांत सलग अनेक दिवस प्रखर उष्णता कायम राहिल्याने मानवी शरीराला विश्रांती मिळण्याची संधीच मिळाली नाही. विशेषतः वृद्ध, लहान मुले,गर्भवती महिला, बांधकाम कामगार, शेतकरी आणि उघड्यावर काम करणाऱ्या कामगारांवर त्याचा सर्वाधिक परिणाम झाला. या परिस्थितीमागे अनेक नैसर्गिक आणि मानवनिर्मित कारणे आहेत. पृथ्वीच्या पृष्ठभागावर निर्माण होणारी उच्च दाबाची हवामान व्यवस्था वातावरणात उष्णता अडकवून ठेवते.त्यामुळे गरम हवा वर जाऊ शकत नाही आणि तापमान सतत वाढत राहते. यावर्षी एल-निनोच्या प्रभावामुळे मान्सूनचे आगमनही उशिरा झाले.परिणामी, उष्णतेची लाट अधिक काळ टिकून राहिली. हवामान बदलामुळे अशा घटना अधिक वारंवार आणि अधिक तीव्र होत असल्याचे जगभरातील वैज्ञानिक सातत्याने अधोरेखित करत आहेत.या बदलांचा सर्वाधिक फटका शेतीला बसत आहे. दक्षिण आशियातील अर्थव्यवस्था अजूनही मोठ्या प्रमाणात मान्सूनवर अवलंबून आहे. पाऊस वेळेवर न आल्यास किंवा कमी झाल्यास पेरण्या उशिरा होतात.दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने अन्नधान्याचा तुटवडा आणि महागाई वाढते.पिण्याच्या पाण्याची टंचाई हे या संकटाचे आणखी एक गंभीर रूप आहे. धरणांतील पाणीसाठे कमी होतात,भूजलपातळी खालावते आणि गावोगावी टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ येते. अनेक शहरांमध्ये पाणीपुरवठ्यावर निर्बंध लावावे लागतात.ग्रामीण भागात महिलांना पाण्यासाठी किलोमीटरच्या अंतरावर जावे लागते. पाण्याची कमतरता वाढली, की जलजन्य आजारांचाही धोका वाढतो आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर अतिरिक्त ताण येतो. उष्णतेच्या लाटांचा परिणाम केवळ आरोग्यापुरता मर्यादित राहत नाही. भारताने हवामान बदलाचा मुकाबला करण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. कार्बन उत्सर्जन कमी करणे,सौर आणि पवन ऊर्जेला प्रोत्साहन देणे, विद्युत वाहनांचा वापर वाढविणे, हरित ऊर्जेतील गुंतवणूक वाढविणे आणि ऊर्जा कार्यक्षमतेवर भर देणे अशा अनेक उपाययोजना राबविल्या जात आहेत.तथापि, हवामान बदल हा जागतिक स्वरूपाचा प्रश्न असल्यामुळे केवळ एका देशाच्या प्रयत्नांनी तो पूर्णपणे नियंत्रणात येणार नाही. विकसित देशांनीही कार्बन उत्सर्जन कमी करण्याची जबाबदारी तितक्याच प्रामाणिकपणे स्वीकारणे आवश्यक आहे. हवामान बदलाचे दुष्परिणाम आता केवळ दक्षिण आशियापुरते मर्यादित राहिलेले नाहीत.युरोपमध्येही अभूतपूर्व उष्णतेच्या लाटा अनुभवास येत आहेत.फ्रान्स, जर्मनी, स्पेन, इटली आणि ब्रिटनसारख्या देशांमध्ये तापमान ४० ते ४३ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचले आहे. अनेक ठिकाणी शाळा बंद ठेवाव्या लागल्या, सार्वजनिक आरोग्य इशारे जारी करण्यात आले आणि विशेषतः वृद्ध नागरिकांमध्ये मृत्यूचे प्रमाण वाढले.थंड हवामानाची सवय असलेल्या युरोपीय समाजासाठी ही परिस्थिती अत्यंत गंभीर ठरली आहे. भारतात उन्हाळ्यात ४७ ते ४८ अंश तापमान नवीन नाही; परंतु भारतातील लोकसंख्या उष्ण हवामानाशी काही प्रमाणात जुळवून घेतलेली आहे. युरोपमध्ये मात्र अशा तापमानाची सवय नसल्यामुळे त्याचा आरोग्यावर अधिक गंभीर परिणाम होतो. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की हवामान बदलाचा परिणाम प्रत्येक प्रदेशात वेगवेगळ्या स्वरूपात दिसतो. एखाद्या प्रदेशाची सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक क्षमता किंवा असुरक्षितता यावर त्याचे परिणाम अवलंबून असतात. आज जग एका निर्णायक टप्प्यावर उभे आहे. जंगलतोड,जीवाश्म इंधनांचा अतिवापर,अनियंत्रित औद्योगिकीकरण आणि वाढते शहरीकरण यामुळे पृथ्वीचे तापमान सातत्याने वाढत आहे.त्याचा परिणाम म्हणून उष्णतेच्या लाटा,अतिवृष्टी, दुष्काळ, पूर आणि समुद्रपातळीत वाढ यांसारख्या घटना अधिक तीव्र होत आहेत. भविष्यात ही परिस्थिती आणखी बिकट होऊ नये, यासाठी तातडीने कृती करणे आवश्यक आहे. वृक्षारोपण, जलसंधारण, पावसाच्या पाण्याचे संकलन, शाश्वत शेती, हरित ऊर्जा, सार्वजनिक वाहतूक आणि ऊर्जा बचत यांसारख्या उपाययोजना मोठ्या प्रमाणावर राबविण्याची गरज आहे. त्याचबरोबर शहरांचे हवामानपूरक नियोजन, उष्णतेच्या लाटांसाठी पूर्वसूचना प्रणाली आणि आरोग्य यंत्रणेची तयारीही तितकीच आवश्यक आहे. उष्णतेच्या वाढत्या लाटा आणि लांबणारा मान्सून ही निसर्गाची साधी चक्रे राहिलेली नाहीत; ती मानवी हस्तक्षेपाची गंभीर चेतावणी आहेत. पृथ्वी अधिक तापत गेली, तर भविष्यातील पिढ्यांसाठी पाणी, अन्न आणि सुरक्षित जीवन हीच सर्वात मोठी आव्हाने ठरतील.



## बळीराजाची कोंडी थांबवायची तर...

**निसर्गाचा लहरीपणा, सरकारी धोरणांची अनास्था आणि कर्जबाजारीपणा यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी गर्तेत अडकला आहे. जागतिक पातळीवर शेतकऱ्यांना मिळणारे संरक्षण आणि भारतातील दुरवस्था यामधील दरी मिटवून शेतीला कायद्याचे आणि हमीभावाचे भक्कम कवच दिले तरच वाढत्या शेतकरी आत्महत्या रोखल्या जातील. त्यासाठी प्रशासकांना चाकोरी मोडून विचार आणि आचार ठेवावा लागेल.**

भारताला कृषिप्रधान देश म्हटले जात असले, हवालदिल आणि निराश झाला आहे. महाराष्ट्रात दुष्काळ हा शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पुजला आहे, हे जळजळीत सत्य त्याने आता स्वीकारले असून निसर्ग आणि सरकार या दोन्हीकडून फारशी अपेक्षा न ठेवता, केवळ पोटापुरते अन्न कसे पिकवता येईल, एवढाच मर्यादित विचार आजचा शेतकरी करत आहे. बंगालच्या ऐतिहासिक दुष्काळात दहा लाख लोकांचे बळी गेले होते. आज तीच भयावह परिस्थिती शेतकरी आत्महत्येच्या वाढत चाललेल्या आलेखाच्या रूपाने महाराष्ट्रात पहायला मिळत आहे. बंगालमधील अमर्त्य सेन यांनी या जागतिक समस्येवर संशोधन करून पुस्तके लिहिली. त्यासाठी त्यांना नोबेल पुरस्कार मिळाला; त्यानंतर जगातील अनेक देशांनी आपल्या अन्नदात्याची काळजी घेण्यास सुरुवात केली. भारतात मात्र अजूनही शेतकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नांना बगल दिली जात आहे. यंदाच्या हंगामात कमी पावसाची शक्यता असल्याने शेतकऱ्यांवर मोठे संकट येण्याची चिन्हे आहेत. या आपत्तीची कल्पना असल्याने राज्य सरकारने कर्जमाफी आणि पीक विमा योजना जाहीर केल्या आहेत, परंतु या योजना वरवरच्या असून अमेरिका किंवा इस्त्रायलसारख्या देशांच्या तुलनेत त्या अजिबात आकर्षक नाहीत. आजपर्यंत कोणत्याही सरकारने शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य हमीभाव आणि संपूर्ण खरेदीची खात्री दिलेली नाही तसेच बँकांकडे फेऱ्या मारूनही शेतकऱ्यांना सहजासहजी कर्ज मिळत नाही, कारण बँकांच्या लेखी शेतकऱ्याची पत खिजगणतीलाही नसते. शेतमाल विकून चार पैसे नफा मिळावा अशी कोणतीही सक्षम व्यवस्था आज भारतात अस्तित्वात नाही, हीच या व्यवस्थेची सर्वात मोठी शोकांतिका आहे.

### पोशिंद्याची वाटचाल अंधाऱ्या कालखंडातून

सद्यस्थितीत देशाचा पोशिंदा एका कठीण आणि अंधाऱ्या कालखंडातून वाटचाल करत आहे; आज महाराष्ट्रातील शेतकरी एका भयावह चक्रव्यूहात अडकला असून कधी कोरडा दुष्काळ तर कधी अस्मानी अतिवृष्टी, या निसर्गाच्या लहरीपणामुळे त्याची शेती पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. पावसाची अनिश्चितता आणि बदलत्या हवामानामुळे एकाच हंगामात शेतकऱ्यावर दुबार-तिबार पेरणीची नामुष्की ओढवते. त्यामुळे बियाणे आणि खतांचा खर्च कैक पटींनी वाढतो. त्या प्रमाणात उत्पादन मात्र कवडीमोलाचे निघते. या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी शेतकरी बँकांचे उंबरठे झिजवतो, पण तिथली पत आणि कागदपत्रांची मारामार त्याला सावकाराच्या दारात उभे करते; डोक्यावर कर्जाचा डोंगर, घरात धान्याचा तुटवडा आणि बाजारात मालाला नसलेला योग्य भाव यामुळे तो पुरता कोलमडून गेला आहे. घामाचे दाम मिळत नसल्याने आणि नव्या हंगामासाठी भांडवल उभे राहत नसल्याने शेतकरीवर्ग अत्यंत हताश आणि निराश झाला असून, निसर्गाची अवकृपा आणि व्यवस्थेची अनास्था यामुळे महाराष्ट्रातील बळीराजा स्वतःच्याच मातीत रोज एक जीवघेणी आणि बिकट लढाई लढत आहे. जागतिक आणि भारतीय शेतीधोरणांची तुलना करता, इतर देशांच्या तुलनेत भारतीय आणि खास करून महाराष्ट्रातील शेतकरी नैराश्य आणि असहाय्यतेने का ग्रासला आहे याची कल्पना येते. अमेरिका, युरोपीय देश; अगदी इस्त्रायल आणि कंबोडियासारख्या छोट्या देशांमध्येही शेतकऱ्यांना मालाला बाजारात उत्तम भाव मिळण्याची शाश्वती सरकार देते, तिथे शेतकरी कधीही आत्महत्येचा विचार करत नाही, उलट तो आनंदाने शेती करतो.

### खरेदीची कायदेशीर हमी नाही

भारतात मात्र किमान आधारभूत किंमत (एमएसपी) कागदावर असली, तरी प्रत्यक्षात शेतकऱ्याला आपला माल अत्यंत कमी दराने व्यापाऱ्यांच्या दावणीला विकावा लागतो आणि मालाच्या खरेदीची कोणतीही कायदेशीर हमी नसल्यामुळे भारतीय शेतकरी कायम तोट्यात राहतो. परदेशात शेतकऱ्याला उद्योगपतींइतकाच सन्मान मिळतो आणि बँका त्यांना अत्यंत सुलभतेने, कमी व्याजात कर्ज पुरवतात; भारतात मात्र परिस्थिती उलटी असून, बँका बड्या उद्योगपतींचे कोट्यवधींचे कर्ज सहज माफ करतात, पण अल्पभूधारक शेतकऱ्याला काही हजारांच्या कर्जासाठीही अपमानास्पद वागणूक दिली जाते, त्याची आर्थिक पत आणि जमिनीचे मूल्य बँकांच्या व्यवस्थेत कवडीमोल मानले जाते, ज्यामुळे शेतकरी खाजगी सावकारांच्या पाशात अडकतो. आज जगभरात सेंद्रिय पद्धतीने उत्पादित केलेल्या शेतमालाला प्रचंड मागणी आहे आणि ग्राहक त्यासाठी मोठी किंमत मोजायला तयार आहेत तसेच भारतातील बहुतांश पारंपरिक शेती ही सेंद्रिय स्वरूपाचीच आहे, तरीही भारताच्या शेतकऱ्याला परदेशातील बाजारपेठेत आपले उत्पादन विकण्याची संधी किंवा पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत; आम्ही वारंवार ही बाब सरकारच्या निदर्शनास आणून दिली, पण त्याकडे गांभीर्याने पाहिले गेले नाही. इतर प्रगत देशांमध्ये कृषी संशोधनावर दरवर्षी अब्जावधी डॉलर्सचा निधी खर्च केला जातो; तिथे हवामानबदल, पिकांवर पडणारे नवीन रोग, पाण्याचे सूक्ष्म नियोजन आणि कमी जागेत जास्त उत्पादन वाढवणे यांवर सातत्याने सरकारी प्रयोगशाळांमध्ये अहोरात्र संशोधन चालते आणि त्याचे निष्कर्ष थेट शेतकऱ्याच्या बांधापर्यंत पोहोचवले जातात.

### शेती संशोधनाचा कार्यक्रम अत्यंत संथ

भारतात मात्र शेती संशोधनाचा शासकीय कार्यक्रम अत्यंत संथ आणि कालबाह्य झाला आहे.आपल्याकडील कृषी विद्यापीठे संशोधनापेक्षा प्रशासकीय कामातच जास्त व्यस्त दिसतात, परिणामी जागतिक दर्जाचे नवीन तंत्रज्ञान, बदलत्या हवामानाला तोंड देणारी उत्तम दर्जाची बियाणे आणि ठिबक सिंचनाचे योग्य नियोजन सामान्यातल्या सामान्य आणि गरीब शेतकऱ्यापर्यंत वेळेत पोहोचतच नाही. त्यामुळे जागतिक स्पर्धेत आणि उत्पादकतेच्या शर्यतीत आपला शेतकरी खूप मागे पडत आहे. देशात सामान्य नागरिक, नोकरदार आणि संघटित कामगारांसाठी अनेक आंदोलने झाली. त्यातून त्यांच्या हक्कांचे विविध कायदे अस्तित्वात आले, परंतु संपूर्ण देशाचा आर्थिक कणा असलेल्या आणि जनतेला अन्न पुरवणाऱ्या शेतकऱ्यांच्या हक्कासाठी असे ठोस, कायदेशीर संरक्षण देणारे कायदे बनवण्याचे प्रामाणिक प्रयत्न कोणत्याही राजकीय पक्षाने केले नाहीत. मी स्वतः जगातील तब्बल १०२ देश फिरून, तिथल्या सरकारांनी शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केलेले कायदे, दिलेली अनुदाने आणि सवलती यांचा अभ्यास करून पाचशे पानांचे एक विस्तृत निवेदन तयार केले तसेच नीती आयोगाच्या विशेष मागणीनुसार त्याचे ४५ पानांचे संकलित रूप सादर केले होते, पण आजही ते सरकारदरबारी धूळ खात पडून आहे. केवळ पावसाच्या लहरी पाण्यावर आणि संपूर्णपणे निसर्गाच्या मेहेरबानीवर अवलंबून असलेल्या महाराष्ट्रातील जवळपास ८५ टक्के कोरडवाहू शेतकऱ्यांची व्यथा, वेदना आणि हलाखीची परिस्थिती पाहिल्यावर खरोखरच मन सुन्न होते आणि ही व्यवस्था विचार करायला लावते.

### बळीराजाची सन्मानासाठी लढाई

महाराष्ट्रातील बळीराजा आज स्वतःच्याच पवित्र मातीत केवळ सन्मानाने जगण्यासाठी बिकट आणि एकाकी लढाई लढत असून कृषिप्रधान देशात अन्नदात्याला आपल्या मूलभूत मानवी हक्कांसाठी एवढा संघर्ष करावा लागतो, ही या शतकातील सर्वात मोठी शोकांतिका आणि लोकशाहीचा पराभव आहे. एकंदरीत पाहता, निसर्गाचा लहरीपणा आणि सरकारी अनास्थेमुळे महाराष्ट्रातील शेतकरी मरणाच्या दारात आहे; त्याला केवळ कर्जमाफी नको, तर जागतिक स्तराप्रमाणे कायद्याचे कवच, हमीभाव आणि सन्मानाचा पतपुरवठा मिळणे हीच काळाची गरज आहे. महाराष्ट्रातील शेती आणि शेतकरी आज अत्यंत कठीण कालखंडातून जात असून येणारा हंगाम आणि त्यापुढील काळ केवळ परीक्षा नसून, अस्तित्वाची थेट लढाई आणि कठोर अग्निपरीक्षा पाहणारा ठरणार आहे. तात्पुरती कर्जमाफी, तुकड्या-तुकड्याने दिली जाणारी मदत किंवा निवडणुकांपुरती मर्यादित असणारी घोषणाबाजी या चक्रव्यूहातून शेतकऱ्याला बाहेर काढू शकत नाही. प्रगत जागतिक स्तराप्रमाणे भारतीय शेतकऱ्याच्या शेतमालाला कायदेशीर हमीभावाचे भक्कम कवच मिळत नाही, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेची दारे थेट खुली केली जात नाहीत आणि बँकांकडून सन्मानाने सुलभ पतपुरवठा केला जात नाही, तोपर्यंत शेतकरी सुखी आणि चिंतामुक्त होणार नाही; आता सरकारने राजकीय इच्छाशक्ती दाखवावी आणि शेतीधोरणात क्रांतिकारी, पायाभूत बदल करण्याचे धाडस दाखवायला हवे. ही ऐतिहासिक संधी गमावल्यास अन्नदात्याच्या आत्महत्येची जीवघेणी मालिका या देशाच्या प्रगतीला कायम काळिमा फासत राहील.

**मुकुंद गायकवाड**

## तेच तेच आणि तेच !

काही महिन्यांपासून राज्याच्या राजकारणात बहुचर्चित असलेले 'ऑपरेशन टायगर-२' यशस्वीरित्या पार पडत नाही तोच, आमदार सचिन अहिर यांच्या 'शिवसेना' प्रवेशाने 'ऑपरेशन टायगर-३' चा शुभारंभ झाला की काय? असा प्रश्न पडला आहे. पावसाळी अधिवेशन सुरू होण्याच्या ३ दिवस आधी 'उबाठा' गटाच्या ३ आमदारांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. त्यापैकी १९९२ मध्ये 'राष्ट्रवादी'तून तत्कालीन 'शिवसेने'त दाखल झालेले सचिन अहिर हे हातावरचे 'शिवबंधन' सोडून 'उबाठा' गटातून 'शिवसेने'त दाखल झाले. त्यांना विधान परिषदेचे उपसभापतीपद बहाल करण्यात आले. येत्या काही दिवसांत उरलेले २ आमदारही शिवसेनेत दाखल होऊ शकतात. ८ दिवसांतच शिंदेंचा उध्दव ठाकरेंना हा दुसरा मोठा 'दे धक्का' असे म्हणण्या पेक्षा, आदित्य ठाकरे यांना शिंदेंनी हा 'जोरका झटका धीरेसे दिया', असे म्हणणे योग्य ठरेल.कारण, कायम आदित्य बरोबर सावलीसारख्या वावरणा-या सचिन अहिर यांचा आदित्यच्या विजयामध्ये मोलाचा वाटा होता. पुढील निवडणुकीत आदित्यला कदाचित नवीन मतदार संघ निवडावा लागेल. अन्यथा, वरळीमधून त्यांचा पराभव झाल्यास आश्चर्य वाटणार नाही.

खासदार फुटणार आहेत, याची बरेच दिवस आधीपासून चर्चा होत होती. पण, त्यांना थांबवण्यासाठी योग्य रणनिती आखण्याऐवजी विश्वप्रवक्ते हे नित्यनियमाप्रमाणे रोज सकाळी 'सर्व काही अलबेल आहे. आमचा एकही खासदार फुटणार नाही', अशा थापा मारण्यात मश्गुल होते. बहुदा, त्यांना आपल्या मालकाला 'गाफिल' ठेवायचे असावे. कारण, जो लोकप्रतिनिधी 'उबाठा' तून फुटून जातो, तो 'राऊतांनी 'उबाठा' गट संपविण्याची सुपारी घेतली आहे', असा त्यांच्यावर आरोप करतो. खासदार फुटण्याच्या २ दिवस आधी ओमराजे निंबाळकर आणि नागेश पाटील आष्टीकर हे दोघे परत फिरण्याच्या मनस्थितीत असावेत. कारण, दुस-या दिवशी बोलावलेल्या संसदीय दलाच्या बैठकीला हजर राहण्याचे माध्यमांसमोर बोलताना त्यांनी सांगितलेही होते. तेव्हा 'ऑपरेशन टायगर'मध्ये नवीन ट्विस्टही आला होता. फुटीर ४ खासदार आणि शिंदे यांनाही टेन्शन आले होते. पण, अतिविद्वान संपादकाने आपली अश्लील शिविगाळ चालूच ठेवल्याने कदाचित, दोघांनी परत फिरण्याचा निर्णय ऐनवेळेस बदलला असावा. खासदारांच्या फुटीवर 'शिक्कामोर्तब' झाल्यानंतर नेहमीसारखा 'झोपी गेलेला जागा झाला' याप्रमाणे 'उबाठा' गट खडबडून जागा झाला; आणि नेहमीप्रमाणेच 'वरातीमागून घोडे' अशी सवय जडल्यानुसार फुटलेल्या खासदारांच्या मतदार संघात, कार्यकर्ते आणि पदाधिका-यांशी संवाद साधून त्यांना उभारी द्यायला हवी, संघटना बळकट करायला हवी, अशी त्यांना 'उपरती' झाली; आणि 'काळू-बाळू'च्या धावत्या दौ-याचे आयोजन करण्यात आले. वाशिमपासून सुरू झालेल्या या ३ दिवसीय मिनी दौ-याची शिर्डी येथे सांगता झाली. 'टोमणेसम्राटां'च्या या दौ-याला जरी 'झंझावती' दौरा असे नाव देण्यात आले होते. तरी, नेहमीप्रमाणेच 'टोमणा दौरा' ठरणार; आणि या दौ-यातही सहानुभूती मिळवण्यासाठी बाळू नेहमीचीच रडगाण्याची रेकॉर्ड वाजवणार; आणि काळू अश्लील शिविगाळ करून फड गाजवणार, हेच अपेक्षित होते; आणि झालेही तसेच. माझा पक्ष फोडला, बाप चोरला, चिन्ह पळवले, माझा विश्वासघात केला, माझे हात आज रिकामे आहेत, मी तुम्हाला काहीच देऊ शकत नाही,



आजचा दिवस माझा नाही पण, उद्याचा नक्की असेल, गेले ते गद्दार, पन्नास खोके घेतले, आमचे हिंदूत्व 'शेंडी-जाणव्या'चे नाही, मी मुख्यमंत्री असताना शेतक-यांना कर्जमुक्त केले, असे नेहमीचेच रडके 'डायलॉग' मारले गेले. विशेष म्हणजे, ज्या काही ४/५ सभा झाल्या, त्यात नवीन असा काहीच मुद्दा नव्हता.

फुटलेल्या खासदारांना कितीही शिव्या घाला. पण, त्यांच्या आई-बापांना का मध्ये आणता? हा माणूस नोकरी ठाकरेंकडे करतो. पण, चाकरी मात्र राहुल गांधी, ममता बॅनर्जी व शरद पवारांची करतो. मग 'आई नेक आणि बाप एक' हा नियम याला लागू होत नाही का? निष्ठेचे उदाहरण देताना तो स्वतःचे कवित्व गाताना सांगतो की, 'मी तुरुंगात गेलो पण, पक्ष सोडला नाही'. पहिली गोष्ट म्हणजे, हा पक्षाच्या कोणत्या आंदोलनात नव्हे तर, मराठी माणसांना रस्त्यावर आणणा-या 'पत्राचाळ' घोटाळ्यात तुरुंगात गेला होता. दुसरी गोष्ट म्हणजे, याची पक्ष सोडण्याची मनापासून कितीही इच्छा असली तरी, याला त्याच्या तोंडामुळे व मत्सरी स्वभावामुळे कोणताही पक्ष साधे दारातही उभे करणार नाही. 'आयत्या पिठावर रांगोळ्या रेखाटणा-या' या माणसात 'लोकप्रतिनिधी' म्हणून असा कोणता गुण आहे; आणि काय कार्य आहे? म्हणून याला कोणत्या पक्षात प्रवेश मिळावा. तसेच, 'एक सडका आंबा पूर्ण पेटी नासवतो' याची जाण प्रत्येक पक्षाला आहेच. त्यामुळे याला शेवटपर्यंत 'उबाठा' शिवाय काहीच पर्याय नाही. जमलेल्या कार्यकर्त्यांना चांगले दोन शब्द बोलून मोलाचे मार्गदर्शन करण्याऐवजी तोडा, झोडा, मारा, फोडा, तुडवा असे चिथावणीखोर शब्द वापरून त्यांची माथी भडकविण्याचेच काम केले. मोठ्या जोशात 'ऑपरेशन तुडवा'ची घोषणा केली होती. पण, आजपर्यंत एकाही कार्यकर्त्याने एकाही खासदाराला साधी चापटही मारली नाही. उलट, परभणीतून 'काळू-बाळू'ची जोडी पाठही फिरवत नाही, तोच १५ ते २० पदाधिका-यांनी त्यांना 'जय महाराष्ट्र' करत शिवसेनेत प्रवेश केला. मुंबईत पायही ठेवत नाही तोच आमदार सचिन अहिर यांनी अखेरचा 'जय महाराष्ट्र' केला. तर, अजून काही आमदार कुंपणावर बसलेले आहेत. गटाला जी काही गळती लागली आहे, ती कशामुळे लागली? आणि गळती का थांबत नाही? याचे डोके शांत ठेवून आत्मचिंतन आणि आत्मपरीक्षण करायला हवे. अन्यथा, ते सांगतात तसा त्यांचा 'उद्या' उगवणे फारच कठीण आहे.

ठाकरे यांनी फडणवीस हे हतबल झालेले दिसत आहेत. पुढील पंतप्रधानपदाचे उमेदवार तेच आहेत. पण, अमित शहा स्वतःसाठी शिंदेंना हाताशी धरून, फडणविसांचे पंख कापत आहेत. तसेच, एक मराठी माणूस जर पंतप्रधान झाला तर आम्हाला आनंदच होईल. फडणविसांना आमच्या शुभेच्छा तर आहेच. पण, आमचा त्यांना पाठिंबाही आहे, असेही सभांमधून सांगितले. अर्थातच, हे त्यांचे 'मगरीचे अश्रू ' ढाळत, शिंदे आणि फडणवीस यांच्यात फूट पाडण्यासाठी दाखवलेले 'पुतणा मावशीचे प्रेम' आहे.आपल्या भाषणात ठाकरे यांनी 'माझ्या शिवसेनेला आणि शिवसैनिकाला जो कोणी कमी लेखत असेल तर, मी त्याला जागेवर ठेवणार नाही', अशी धमकीही दिली. तसेच,'मला अन्यायावर वार करणारे शिवसैनिक हवे, पाठीवर वार करणारे नकोत, असेही ते म्हणाले. २०१९ साली तुम्ही 'जनादेशा'वर दिवसाढवळ्या जो 'महादरोडा' टाकला. तो मतदारांवर तुम्ही केलेला अन्याय नव्हता का? स्वसार्थासाठी मुख्यमंत्रिपदाची खुर्ची बळकावली तो फडणविसांच्या पाठीवर केलेला वार नव्हता का? बाळासाहेबांच्या विचारांना तिलांजली देत काँग्रेसच्या मांडीवर जाऊन बसलात, ती बाळासाहेबांशी केलेली 'महागद्दारी' नव्हती का?

'तेलही गेले, तूपही गेले, हाती धुपाटणे राहिले' याप्रमाणे 'शिवसेना' पक्षाचे 'उबाठा' गटात रुपांतर झाले. त्यालाही खिंडारे पडत आहेत. पण, चांडाळ चौकडीचा अहंकार काही कमी होत नाही. काल आदित्य ठाकरे पुन्हा म्हणाले की,'कोणीही गेल्याने आम्हाला काहीच फरक पडत नाही. राम मंदिर आणि उज्जैन जमीन घोटाळे करणा-यांसोबत गद्दार गेले आहेत. हे बोलताना आदित्य ठाकरे विसरले की, कालपर्यंत ते मिठी नदी गाळ आणि कोरोना काळात केलेल्या अनेक घोटाळे करणा-यांसोबत होते, असो.

एकनाथ शिंदे यांनी धक्क्यावर धक्के देत, या आधुनिक 'धृतराष्ट्रा'ची अवस्था 'शोले' चित्रपटातील असरानीसारखी केली. आज स्वतःच्या आणि गटाच्या अस्तित्वाचा 'यक्षप्रश्न' निर्माण झाला. पण, अजूनही 'धृतराष्ट्र' काही डोळ्यावरची पट्टी काढायला; आणि 'हम कभी नही सुधरेंगे' या भूमिकेतून बाहेर पडायला तयार नाही, याचे नवल वाटते.

**प्रदीप व्ही. खोलमकर,**
नाशिक.
मो-८७६७५९२९८०

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# अंगणवाडी सेविका सह मनुष्यबळाचा गंभीर तुटवडा

## यवतमाळ जिल्ह्यात अंगणवाडी सेविका,मदतनीस,मुख्यसेविकाचे पद रिक्त, आदिवासी भाग सर्वाधिक उपेक्षित

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १ :** बालकांच्या सर्वांगीण विकासाचा पाया मानल्या जाणाऱ्या अंगणवाड्यांमध्येच मनुष्यबळाचा गंभीर तुटवडा निर्माण झाल्याने यवतमाळ जिल्ह्यातील प्राथमिक बालशिक्षण आणि पोषण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. जिल्ह्यात मंजूर असलेल्या २,७०३ अंगणवाड्यांपैकी ५६ सेविकांची पदे अद्याप रिक्त असून त्यामुळे हजारो बालकांच्या शिक्षण, पोषण आणि संगोपनावर विपरीत परिणाम होत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे.




उपलब्ध आकडेवारीनुसार, जिल्ह्यात २,६४७ सेविकाची पदे भरलेली असली तरी उर्वरित ५६ अंगणवाड्या सेविकाविना सुरू आहेत. विशेष म्हणजे आदिवासीबहुल आणि दुर्गम भागातच रिक्त पदांचे प्रमाण अधिक असल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्न उपस्थित होत आहेत. यवतमाळ हा राज्याचे आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांचा गृहजिल्हा असतानाही झरी-जामणी तालुक्यात सर्वाधिक ७ पदे रिक्त आहेत. त्यापाठोपाठ दारव्हा, पुसद, पांढरकवडा (केळापूर) आणि वणी येथे प्रत्येकी ६ पदे, तर उमरखेड व महागाव येथे प्रत्येकी ५ पदे रिक्त आहेत. त्यामुळे दुर्गम आणि आदिवासी भागातील बालकांनाच सर्वाधिक फटका बसत असल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे. जिल्ह्यातील १६ तालुक्यापैकी केवळ बाभुळगाव आणि यवतमाळ या दोन तालुक्यांमध्ये सर्व मंजूर पदे भरलेली आहेत. उर्वरित १४ तालुक्यांमध्ये सेविकांची पदे रिक्त असून अनेक अंगणवाडीचा अतिरिक्त कार्यभार शेजारच्या सेविकांवर सोपविण्यात आल्याची माहिती आहे. अंगणवाडी मधील पोषण आहाराच्या गुणवत्ते बाबतही पालकां मधून नाराजी व्यक्त होत आहे. शासनाच्या नियमांनुसार दर्जेदार आणि वैविध्यपूर्ण आहार मिळणे अपेक्षित असताना अनेक ठिकाणी केवळ मर्यादित स्वरूपाचा आहार दिला जात असल्याची तक्रार आहे. बाह्य कंत्राटी संस्थांकडून पुरविण्यात येणाऱ्या पोषण आहाराच्या गुणवत्तेची चौकशी करून स्थानिक महिला बचत गटांच्या माध्यमातून ताजा व पौष्टिक आहार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### "डिजिटल शिक्षण आणि कुपोषणमुक्तीचे दावे फोल..

यंत्रणेकडे बालवाडी शिक्षणाच्या पायाभूत व्यवस्थेकडे दुर्लक्ष का? होत असून बालकांच्या शिक्षणाचा पहिला टप्पा म्हणजे अंगणवाडी. अशा मूलभूत व्यवस्थेतच रिक्त पदे कायम राहणे ही चिंतेची बाब आहे. विशेषतः दुर्गम आणि आदिवासी भागात सेविकां ची कमतरता राहिल्यास त्याचा थेट परिणाम बालशिक्षण, पोषण आणि आरोग्यावर होतो. त्यामुळे रिक्त पदे तातडीने भरणे आणि पोषण आहाराच्या गुणवत्तेची प्रभावी तपासणी करणे ही प्रशासनाची प्राधान्याची जबाबदारी असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### ठळक मुद्दे

•जिल्ह्यात मंजूर अंगणवाड्या : २,७०३
•भरलेली सेविकांची पदे : २,६४७
•रिक्त सेविका पदे : ५६
* सर्वाधिक रिक्त पदे : झरी-जामणी – ७
* प्रत्येकी ६ रिक्त पदे : दारव्हा, पुसद, पांढरकवडा, वणी,
•इतर पदे कळंब-३, राळेगाव-२,आर्णी- १ घाटंजी-३,महागाव- ५ उमरखेड -५,दिग्रस -२,मारेगाव - १,नेर -३
पूर्ण पदभरती असलेले तालुके : बाभुळगाव, यवतमाळ

# साखरा शाळेचा प्रवेशोत्सव ठरला आदर्श..!

## जल्लोषात चिमुकल्यांचे स्वागत, शिक्षणाबाबत सकारात्मक संदेश



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. १ :** जिल्हा परिषद केंद्रीय उच्च प्राथमिक शाळा, साखरा (ता. उमरखेड) येथे नवीन शैक्षणिक वर्षानिमित्त आयोजित शाळा प्रवेशोत्सव उत्साह, आनंद आणि सामाजिक सहभागाच्या वातावरणात पार पडला. नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पहार, गुलाब, आकर्षक टोपी आणि सजविलेल्या वाहनातून गावभर मिरवणूक काढून जंगी स्वागत करण्यात आले. ठिकठिकाणी माता-भगिनींनी औक्षण करून पुष्पवृष्टी केली, तर फटाक्यांच्या आतषबाजीत संपूर्ण गावाने चिमुकल्यांच्या शैक्षणिक प्रवासाचे स्वागत केले.

शाळेच्या प्रवेशद्वारावर फुग्यांची कमान, सेल्फी पॉइंट, आकर्षक रांगोळी आणि वर्ग पहिलीची विशेष सजावट करण्यात आली होती. विद्यार्थ्यांच्या पावलांचे ठसे घेऊन त्यांच्या शैक्षणिक जीवनाची संस्मरणीय सुरुवात करण्यात आली. यावेळी गटशिक्षणाधिकारी विजय बेतेवाड, केंद्रप्रमुख अरुण बुरकुले व नील पवार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत पालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. मान्यवरांच्या हस्ते शालेय गणवेशांचे वाटप करण्यात आले. मध्यान्ह भोजनात मसालेभात व जिलेबीचा विशेष बेत ठेवण्यात आला. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नंदकुमार वानखेडे, मुख्याध्यापक भागोराव कांबळे, शिक्षक, पालक व ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागामुळे हा प्रवेशोत्सव केवळ स्वागताचा कार्यक्रम न ठरता,गावाचा आधार शाळा आणि शाळेचा अभिमान गाव हा संदेश प्रत्यक्षात उतरवणारा आदर्श उपक्रम ठरला.

# १ जुलैपासून महागावात 'विकसित भारत–जी राम जी' अभियानाची सुरुवात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ किरण नरवाडे



**महागाव, दि. १ :** केंद्र शासनाच्या 'विकसित भारत–जी राम जी (ग्रामीण रोजगार व आजीविका अभियान)' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा शुभारंभ १ जुलै २०२६ पासून महागाव तालुक्यात होत असून, पंचायत समितीच्या माध्यमातून गावागावांत व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे.

ग्रामीण भागातील पात्र कुटुंबांपर्यंत विविध शासकीय योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचविण्याचा प्रशासनाचा निर्धार आहे. महागाव पंचायत समितीअंतर्गत सर्व ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभा, जनजागृती कार्यक्रम, माहितीपत्रकांचे वितरण तसेच नागरिकांशी थेट संवाद साधून अभियानाची सविस्तर माहिती दिली जाणार आहे. ग्रामीण भागातील पात्र कुटुंबातील प्रत्येक प्रौढ सदस्याला १२५ दिवसांच्या अकुशल मजुरी रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. या अभियानामुळे ग्रामीण रोजगारनिर्मितीला चालना मिळण्याबरोबरच उपजीविकेची साधने अधिक सक्षम होतील. गावपातळीवरील विकासकामांना गती मिळून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ प्राप्त होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पंचायत समिती, ग्रामपंचायती, ग्रामरोजगार सेवक तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी समन्वयाने कार्य करणार आहेत. पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ वेळेत, पारदर्शक आणि प्रभावीपणे मिळावा यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. 'विकसित भारत जी राम जी' अभियानामुळे महागाव तालुक्यात ग्रामीण विकासाचा नवा अध्याय सुरू होण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, रोजगार, विकास आणि लोकसहभागाचा प्रभावी संगम घडवून आणणाऱ्या या उपक्रमाक नागरीकांनी लाभ घ्यावा असे आवाहन गटविकास अधिकारी दत्तात्रय कदम व साहाय्यक गटविकास अधिकारी तुळशिराम चव्हाण यांनी केले आहे.

# "वसंतराव नाईक हे महाराष्ट्राच्या विकासाचे शिल्पकार होते" – प्रा.डॉ.उल्हास राठोड

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. १ :** शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, केळापूर येथे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन व व्याख्यान कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अजय सोळंके होते,तर प्रमुख अतिथी म्हणून समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ.उल्हास राठोड उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ.उल्हास राठोड म्हणाले की, "स्वर्गीय वसंतराव नाईक हे महाराष्ट्राच्या विकासाचे खरे शिल्पकार होते.त्यांनी कृषी,सिंचन,ग्रामीण विकास,रोजगारनिर्मिती आणि सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी दूरदृष्टीने निर्णय घेत राज्याच्या प्रगतीचा मजबूत पाया रचला.

त्यांच्या नेतृत्वामुळे महाराष्ट्राला विकासाची नवी दिशा मिळाली.त्यांचे कार्य आजही समाजासाठी आणि विशेषतः युवकांसाठी प्रेरणादायी आहे." विद्यार्थ्यांनी स्व.वसंतराव नाईक यांच्या कार्याचा आदर्श घेऊन समाजहित,राष्ट्रप्रेम आणि लोकसेवेची भावना जोपासावी, असे आवाहनही त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.अजय सोळंके यांनी स्व. वसंतराव नाईक यांच्या कार्याचा गौरव करत विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा आदर्श ठेवून गुणवत्तापूर्ण शिक्षण,सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रसेवेची भावना अंगीकारावी, असे प्रतिपादन केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व.वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.अमर वंजारी यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा.डॉ.विनोद चव्हाण व तुळशीदास जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

## थोडक्यात

### नीट पेपरफुटीवरून युवक काँग्रेस आक्रमक..! शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

**बाभुळगाव :** नीट पेपरफुटी प्रकरणावरून बाभुळगाव तालुका युवक काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. तसेच पेपरफुटीप्रकरणी जबाबदार असलेल्या सर्व अधिकारी व संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करून सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दि. ३० जून रोजी तालुकाध्यक्ष तथा कोंढा ग्रामपंचायतीचे सरपंच अमेय विनायकराव घोडे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार, बाभुळगाव यांच्यामार्फत जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी थेट संबंधित असलेल्या परीक्षेत पेपरफुटीसारखा गंभीर प्रकार घडणे ही शिक्षण व्यवस्थेची मोठी शोकांतिका असून याची नैतिक जबाबदारी स्वीकारत शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी तात्काळ राजीनामा द्यावा. तसेच या घोटाळ्यातील प्रत्येक दोषीवर कठोर कारवाई करून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी. यावेळी अमेय घोडे म्हणाले, "नीट परीक्षेसाठी लाखो विद्यार्थ्यांनी रात्रंदिवस मेहनत घेतली. मात्र पेपरफुटीमुळे त्यांच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून शैक्षणिक व आर्थिक नुकसान झाले आहे. दोषींना अभय देण्याचा प्रयत्न झाल्यास युवक काँग्रेस राज्यभर तीव्र आंदोलन छेडेल." या निवेदनावर रमेश काठेकर, विनोद वाटमोडे, कविश गावंडे, अक्षय राऊत, प्रदीप नांदूरकर, विपुल बोदडे, प्रतीक गणवीर, पराग पिसे, प्रज्वल राऊत, अविनाश गावंडे, राजेश खंडारे, मोहन भोयर, सुभोध नगराळे, प्रेमचंद छल्लाणी, प्रशांत गोडे, उमेश रेंघे, अंकुश सोयाम यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.




### दृष्टिहीनांची 'दिव्यांग पायी वारी' ४ जुलैला पंढरपूर करिता सज्जा..!

**यवतमाळ :** जिद्द, श्रद्धा आणि आत्मविश्वासाचा प्रेरणादायी संगम ठरणारी सेवा समर्पण प्रतिष्ठान ट्रस्टच्या दिव्यांग सेवा समितीची 'संत सूरदास महाराज दिव्यांग (अंध) पायी वारी २०२६' शनिवार, ४ जुलै रोजी सकाळी ७.३० वाजता यवतमाळ येथील रुक्मिणी पांडुरंग संस्थान (सरोज टॉकीज जवळ) येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. तिसऱ्या वर्षात प्रवेश केलेल्या या वारीत दृष्टिहीन दिव्यांग बांधव व भगिनी तब्बल ५२१ किलोमीटरचा प्रवास पायी पूर्ण करणार आहेत. २२ गावांमध्ये मुक्काम करत २५ जुलै रोजी दिंडी विठूरायाच्या चरणी पोहोचणार आहे. अंध मुलांचा कर्णधार प्रज्वल तुमसरे, तर मुलींची कर्णधार सोनम ठाकरे नेतृत्व करणार आहेत. वारीचे संयोजन प्रशांत बनगीनवार व प्राची बनगीनवार यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून, संवेदनशील अन्नदात्यांनी मुक्काम व भोजनाची जबाबदारी स्वीकारली आहे. या प्रेरणादायी प्रस्थान सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून दिव्यांग वारकऱ्यांना शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# कृषी दिंडीतून हरित क्रांतीच्या शिल्पकारास अभिवादन..! 'पाणी अडवा, पाणी जिरवा'चा निर्धार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. १ :** हरितक्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त पुसद ते गहुली दरम्यान काढण्यात आलेली भव्य कृषीदिंडी उत्साहात पार पडली. वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठान, वसंतराव नाईक जयंती उत्सव समिती आणि ऑल इंडिया बंजारा सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमात शेतकरी, विद्यार्थी, नागरिक आणि वसंतप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात पुसद येथील वसंतराव नाईक चौकातील पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून झाली. माजी मंत्री मनोहरराव नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिमापूजन पार पडले. नगराध्यक्ष मोहिनी नाईक, उपविभागीय अधिकारी आशिष बीजवाल, मुख्याधिकारी किरण सुकलवाड, ययाती नाईक, दीपक आसेगावकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कृषी दिनाचे औचित्य साधत कृषी संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या ट्रॅक्टरच्या नेतृत्वाखाली दिंडी गहुलीकडे रवाना झाली. शेकडो दुचाकीस्वारांनी सहभाग घेतला, तर नगराध्यक्ष मोहिनी नाईक यांनी स्वतः दुचाकी चालवत सहभाग नोंदविला. मार्गातील वरुड, ज्योतीनगर, घाटोडी, बजरंगनगर व चोंढी येथे ग्रामस्थांनी उत्स्फूर्त स्वागत केले. गहुली येथे वसंतराव नाईक यांच्या अर्धाकृती पुतळ्यास अभिवादन करून वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर ह.भ.प. पंकज पाल महाराज यांच्या समाजप्रबोधनपर कीर्तनाने वातावरण भारावून गेले. भूमिपुत्र अभिवादन सभेत बोलताना नगराध्यक्ष मोहिनी नाईक यांनी कृषीला उद्योगाची जोड, जलसंधारणाची व्यापक चळवळ आणि 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही संकल्पना प्रत्येक गावात प्रभावीपणे राबविणे, हीच वसंतराव नाईक यांना खरी आदरांजली ठरेल,असे प्रतिपादन केले. डॉ. टी. सी. राठोड, संदेश चव्हाण व दीपक आसेगावकर यांनीही नाईक यांच्या कृषी, ग्रामीण विकास व समाजकारणातील योगदानाचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संजय चव्हाण यांनी, तर आभार प्रा. नरेंद्र जाधव यांनी मानले.


# जि.प.शाळा करकडोह येथे शाळा प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १ :** आज शैक्षणिक सत्र २०२६–२७ चा शाळा प्रवेशोत्सव अतिशय उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवर अधिकारी भेट म्हणून मा.सुनिल एस.सोसे (जिल्हा समनव्य (माविअ यवतमाळ ) तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भास्कर येलेकर व सदस्य, शिक्षकवृंद, पालक आणि ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत नवप्रवेशित बालकांचे फुले, टाळ्यांच्या गजरात आणि ढोल-ताशांच्या दणदणाटात ट्रॅक्टर रॅलीद्वारे उत्साहात स्वागत करण्यात आले.

विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व शालेय गणवेशांचे वितरण करण्यात आले. पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मुलांच्या शिक्षणासाठी सहकार्याची ग्वाही दिली. उपस्थित अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून, नियमित शाळेत येण्याचे, गुणवत्तापूर्ण शिक्षण घेण्याचे आणि पालकांनी मुलांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमामुळे संपूर्ण गावात शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक गजानन पवार,वनिता झुरळे यांनी परिश्रम घेतले.





"शेतकऱ्यांच्या हक्कासाठी विधानभवनाच्या पायऱ्यांवर संघर्ष मांगुळकरांच्या आंदोलनापुढे सरकार नमले?"
"'पीकविमा मिळाल्याशिवाय माघार नाही' आमदार मांगुळकरांच्या आंदोलनानंतर कृषिमंत्र्यांचे सकारात्मक आश्वासन"

# ३१ टक्के 'लो-रेट'चा खेळ,रस्ता मात्र खड्ड्यातच!

## लाखो रुपये खर्चूनही रस्त्याची दयनीय अवस्था..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**यवतमाळ, दि. १ :** मोहा–मादणी–बोरगाव मार्गाच्या रखडलेल्या कामावर संशय यवतमाळ - सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून काही लाडके ठेकेदारांचे लाड पुरविल्या जात असून सार्वजनिक मालमत्तेची नासधूस होताना दिसत आहे. याचीच प्रचिती मोहा–मादणी–बोरगाव या मुख्य जिल्हा मार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने या २१.६०० किमी लांबीच्या मार्गाच्या वार्षिक देखभालीसाठी २०२५-२६ अंतर्गत निविदा प्रक्रिया पूर्ण करून कंत्राटदाराला १४ जानेवारी २०२६ रोजी कार्यारंभ आदेशही दिला. मात्र, जुलै महिना उजाडूनही प्रत्यक्षात कामाचा मागमूस नसल्याने विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या कामासाठी ५७.३५ लाख रुपयांचा अंदाजित खर्च निश्चित करण्यात आला होता. मात्र, कंत्राटदाराने तब्बल ३१.३१ टक्के कमी दराने ३९.९६ लाख रुपयांची निविदा मिळवली. एवढ्या मोठ्या 'लो-रेट'ला मंजुरी देताना कामाच्या गुणवत्तेची खात्री कशी करण्यात आली, असा सवाल उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे, कामाची सुरक्षा ठेव जमा असूनही रस्त्यावरील खड्डे कायम असल्याने वाहनचालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. मादणी ते बोरगाव परिसरात अद्याप कामाची माहिती दर्शविणारी पाटीही लावण्यात आलेली नाही. त्यामुळे "काम न करताच बिले काढली गेली का?" अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली असून, संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. नागरिकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून कामाची वस्तुस्थिती तपासावी, काम पूर्ण झाल्याची खातरजमा झाल्याशिवाय कोणतेही बिल अदा करू नये आणि दोषी अधिकारी व कंत्राटदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. रखडलेल्या कामामुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय तर होत नाही ना, याची उच्चस्तरीय चौकशी करण्याचीही मागणी आता जोर धरू लागली आहे.

# 'ढोल बजाव' आंदोलनाने प्रशासनाचे लक्ष वेधले..! कलावंतांचा एल्गार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १ :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कलावंत वारकरी सेवा विकास आणि सन्मान संस्थेच्या नेतृत्वाखाली बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ज्येष्ठ कलावंतांनी 'ढोल बजाव' आंदोलन करून प्रशासनाचा निषेध नोंदविला.

पूर्वसूचना देऊनही मागण्यांवर कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने कलावंतांनी ढोल वाजवत घोषणाबाजी केली आणि प्रशासनाचे लक्ष वेधले. चार वर्षांपासून रखडलेली ज्येष्ठ कलावंत मानधन निवड यादी तातडीने जाहीर करावी, मुलाखत प्रक्रियेत झालेल्या कथित आर्थिक गैरव्यवहाराची फॉरेन्सिक चौकशी करून दोषींवर एफआयआर दाखल करावा, तसेच वादग्रस्त गुणांकन रद्द करून फेरमुलाखती घ्याव्यात, अशा प्रमुख मागण्या आंदोलनातून करण्यात आल्या. जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर मोठ्या संख्येने कलावंत उपस्थित राहिले होते. ढोलाच्या गजरात दिलेल्या आंदोलनामुळे परिसर दणाणून गेला. मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास यापुढे अधिक तीव्र धरणे आंदोलन छेडण्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला दिला.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/२०५/२०२६
तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- २९/०६/२०२६

**जाहीरनामा**

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शेख रहीम शेख दोस्त मोहम्मद रा.उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांची बहीण नामे शामशाद बानो शेख दोस्त मोहम्मद जन्म दि-१४/०७/१९८८ मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक १५.०७.२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा/-
तालुका दंडाधिकारी
उमरखेड

**नगरसेवक अनिल अग्रवाल यांच्या उपोषणाच्या इशाऱ्याला यश**

# आष्टीकर यांच्या कथित भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी समिती गठीत

## सेवानिवृत्त न्यायाधीश सुदाम देशमुख यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती, शहराचे लक्ष आता समितीच्या चौकशी आणि अहवालाकडे

**अमरावती/का.प्र.**

माजी आयुक्त प्रवीण आष्टीकर यांच्या कार्यकाळातील भ्रष्टाचाराच्या प्रकरणांची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय चौकशी समिती गठीत करण्यात यावी, या मागणीसाठी मनपा नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी आमसभेत आवाज उठवला होता. तसेच मनपा आयुक्त वर्षा लड्डा यांना आमरण उपोषणाचा इशाराही दिला होता. या इशाऱ्यामुळे मनपा प्रशासन खडबडून जागे झाले आणि आता या प्रकरणाच्या चौकशीसाठी सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली एकसदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. हे नगरसेवक अनिल अग्रवाल यांचे मोठे यश मानले जात आहे.या प्रकरणात, महानगरपालिका प्रशासनाने जिल्हा व सत्र न्यायालयाचे सेवानिवृत्त प्रमुख न्यायाधीश सुदाम पी. देशमुख यांची एकसदस्यीय चौकशी समितीचे प्राथमिक चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. नियुक्ती पत्र जारी झाल्यामुळे आता या बहुचर्चित प्रकरणाच्या चौकशी प्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला आहे.

तत्कालीन आयुक्त तथा माजी प्रशासक डॉ. प्रवीण आष्टीकर यांनी आपल्या कार्यकाळात मनमानी कारभार करत अनेक कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता केल्याचा आरोप आहे.

सुमारे १०० कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराचे आरोपही झाले होते आणि मनपाने प्राथमिक स्तरावर केलेल्या चौकशीत यातील काही आरोपांना दुजोराही मिळाला होता. याच कारणामुळे या मुद्द्यावरून मनपाच्या सलग दोन आमसभांमध्ये अभूतपूर्व गदारोळ झाला होता, ज्यामध्ये सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या लोकप्रतिनिधींमध्ये तीव्र वादावादी पाहायला मिळाली होती. आमसभेत अनेक नगरसेवकांनी तत्कालीन प्रशासकीय कार्यकाळातील विकासकामे, निविदा प्रक्रिया आणि पेमेंटच्या मुद्द्यांवर गंभीर प्रश्न उपस्थित करत कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक घोटाळ्याची शंका व्यक्त केली होती. त्यानंतर मनपाच्या २० एप्रिल २०२६ रोजी झालेल्या आमसभेत सर्वपक्षीय संमतीने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, हा निर्णय होऊन दोन महिने उलटले तरी हे प्रकरण रखडलेलेच होते.

**नगरसेवक अनिल अग्रवाल यांचे आंदोलन व उपोषणाचा इशारा**

मनपा नगरसेवक अनिल अग्रवाल हे हे प्रकरण सातत्याने लावून धरत आहेत. तत्कालीन प्रशासक आष्टीकर यांच्या कार्यकाळात अनेक विकासकामांमध्ये नियमांचे उल्लंघन करून आर्थिक अनियमितता करण्यात आली असून, याची निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे आहे, असा आरोप त्यांनी केला होता.

चौकशीला होणाऱ्या विलंबाबाबत त्यांनी मनपा आयुक्त वर्षा लड्डा यांना आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा दिला होता.

जोपर्यंत संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी होत नाही, तोपर्यंत शहरवासीयांच्या मनातील प्रश्नांची उत्तरे मिळणार नाहीत, असे अग्रवाल यांचे म्हणणे होते.



**कोणार्क कंपनीच्या पेमेंटवरूनही झाला होता विवाद**

यापूर्वी झालेल्या दोन आमसभांमध्ये या प्रकरणातील सर्वाधिक चर्चा 'कोणार्क कंपनी'शी संबंधित पेमेंटवरून झाली होती. कथित अनियमिततेची चौकशी पूर्ण होईपर्यंत कंपनीचे थकीत पेमेंट रोखण्यात यावे, अशी मागणी अनेक लोकप्रतिनिधींनी केली होती. चौकशीत अनियमितता सिद्ध झाल्यास नंतर होणारे आर्थिक नुकसान भरून काढणे कठीब होईल, असा युक्तिवाद त्यांनी केला होता. या मागणीवरून सभागृहात तीव्र वाद होऊन परिस्थिती अनेकदा तणावपूर्ण बनली होती.

**आमसभेच्या प्रस्तावानंतर कारवाई**

महानगरपालिकेच्या २० एप्रिल २०२६ रोजी झालेल्या सार्वत्रिक सभेत ठराव क्रमांक ३३ आणि ३५ मंजूर करून या प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक आणि स्वतंत्र चौकशी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यानंतर प्रशासनावर चौकशी समिती गठीत करण्यासाठी सातत्याने दबाव वाढत गेला.

आता मुख्य विधी अधिकारी श्रीकीतसिंह चव्हाण यांनी जारी केलेल्या आदेशान्वये, सेवानिवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुदाम देशमुख यांच्याकडे या चौकशीची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

बांधकाम विभागातर्फे जारी करण्यात आलेल्या निविदांमध्ये जिओ-टॅगिंगच्या अटींचा वापर, विविध विकासकामांचे क्लबिंग (एकत्रिकरण) करणे, बायोमायनिंग प्रकल्पाची निविदा प्रक्रिया, १० लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या कामांमध्ये ई-टेंडर प्रक्रियेचे पालन न करणे, केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करणे, सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेली कामे मनपा स्तरावर दाखवणे, ई-टेंडर प्रक्रिया टाळण्यासाठी कामांची अंदाजित किंमत कृत्रिमरी्या कमी दाखवणे, अशा गंभीर मुद्द्यांचा समावेश आहे, नगरसेवक आणि अधिकाऱ्यांचे जबाब नोंदवले जाणार, कागदपत्रांची होणार तपासणी चौकशी अधिकाऱ्यांना संबंधित फाईल्स, निविदा दस्तऐवज, पेमेंट रेकॉर्ड आणि प्रशासकीय नोंदी तपासण्याचे पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत. गरज पडल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार आणि इतर संबंधित घटकांचे जबाबही नोंदवले जातील. तसेच नगरसेवक, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी सादर केलेल्या तक्रारी, सूचना आणि कागदपत्रेही या चौकशीचा भाग असतील.

**आठ आठवड्यांत अहवाल; राजकीय वर्तुळात खळबळ**

महानगरपालिका प्रशासनाने चौकशी समितीला आठ आठवड्यांच्या आत आपला अहवाल, निष्कर्ष आणि शिफारसी सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या चौकशीच्या आदेशानंतर शहराच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चांना उधाण आले आहे.तत्कालीन प्रशासकीय कार्यकाळात झालेल्या विकास कामांमध्ये खरोखरच अनियमितता झाली होती की नाही, हे या चौकशी अहवालातून स्पष्ट होईल, असे लोकप्रतिनिधींचे मानणे आहे.तसेच आरोप सिद्ध झाल्यास जबाबदार अधिकारी आणि संबंधित घटकांवर मोठी कारवाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आता संपूर्ण शहराचे लक्ष आगामी आठ आठवड्यांत येणाऱ्या चौकशी अहवालाकडे लागले आहे, ज्यामुळे अमरावती महानगरपालिकेच्या अत्यंत गाजलेल्या आणि वादग्रस्त आर्थिक प्रकरणाचे सत्य समोर येऊ शकते.

# जिल्हा खाजगी कोचिंग क्लासेस संघर्ष समितीकडून महापौरांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**

अमरावती जिल्हा खाजगी कोचिंग क्लासेस संघर्ष समितीच्या वतीने अमरावती महानगरपालिकेकडून कोचिंग क्लासेसना देण्यात आलेल्या अग्निसुरक्षा (फायर सेफ्टी) नोटिसीच्या पार्श्वभूमीवर मार्गदर्शन व सहकार्य मिळावे, यासाठी मा. महापौर यांना निवेदन देण्यात आले.



निवेदनात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे स्पष्ट करत शासनाने घालून दिलेल्या सर्व सुरक्षा नियमांचे पालन करण्यास समिती सकारात्मक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, शहरातील अनेक कोचिंग क्लासेस भाड्याच्या इमारतींमध्ये कार्यरत असून, इमारतीतील अनेक अग्निसुरक्षा उपाययोजनांची जबाबदारी इमारत मालकांवर असल्याने सर्व अटींची तत्काळ पूर्तता करणे आर्थिक व तांत्रिकदृष्ट्या कठीण असल्याचे समितीने म्हटले आहे.परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची तसेच शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या रोजगारावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी विनंती करण्यात आली.याशिवाय आवश्यक अग्निसुरक्षा उपाययोजनांसाठी मुदतवाढ, इमारत मालक व क्लास चालकांची संयुक्त बैठक, व्यावहारिक कार्यपद्धती निश्चित करणे तसेच कठोर कारवाईपूर्वी आवश्यक संधी देण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली.

विद्यार्थ्यांचे शिक्षण, शिक्षकांचा रोजगार आणि शैक्षणिक संस्थांचे अस्तित्व सुरक्षित राहावे यासाठी प्रशासनाने सहकार्य करावे, अशी अपेक्षा अमरावती जिल्हा खाजगी कोचिंग क्लासेस संघर्ष समितीने व्यक्त केली आहे.महापौरांनी संघर्ष समितीचे निवेदन स्वीकारून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबरोबरच त्यांचे शैक्षणिक हित अबाधित राहणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगितले. कोचिंग क्लासेसच्या अडचणी व मागण्या सकारात्मकपणे विचारात घेतल्या जातील, असे त्यांनी आश्वासन दिले. तसेच या विषयावर संबंधित अधिकारी, अग्निशमन विभाग, प्रशासन, इमारत मालक व कोचिंग क्लास प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक आयोजित करून व्यावहारिक आणि सर्वांना मान्य होईल असा मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नियमांचे पालन करताना कोणत्याही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होणार नाही आणि लहान-मध्यम कोचिंग क्लासेसना न्याय मिळेल, यासाठी महानगर पालिका आवश्यक ते सहकार्य करेल, असे आश्वासन महापौरांनी दिले.

# भाजपात निष्ठावान कार्यकर्त्यांना डावलून शहराध्यक्षपदाची नियुक्ती

## माजी नगरसेवक संजय अग्रवाल यांचा आरोप

**अमरावती/का.प्र.**

भाजपात अनेक वर्षे निष्ठेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना डावलून शहराध्यक्षपदी नियुक्त्या होत असल्याचा आरोप माजी नगरसेवक संजय अग्रवाल यांनी केला आहे.त्यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी या नियुक्ती प्रक्रियेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.



कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, पूर्वी पक्षाध्यक्षपदासारख्या महत्त्वाच्या जबाबदारीसाठी किमान दहा ते पंधरा वर्षे पक्षात सक्रियपणे काम केलेल्या, प्रत्येक कार्यकर्त्याला ओळखणाऱ्या आणि संघटन उभारणीत योगदान दिलेल्या व्यक्तीची निवड केली जात असे.आमदार, खासदार। किंवा नगरसेवक पदासाठी विजयाची क्षमता हा निकष असू शकतो; मात्र संघटन प्रमुख म्हणून जुन्या व अनुभवी कार्यकर्त्यालाच संधी देण्याची परंपरा होती.मात्र गेल्या काही वर्षांतील तसेच सध्याच्या नियुक्त्यांमध्ये या परंपरेला फाटा दिला जात असल्याची खंत अनेक जुन्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. आज पक्षातील जुन्या कार्यकर्त्यांच्या वाटयाला के वळ टाळ्या वाजविण्याचे काम उरले आहे. त्यामुळे मी मी स्वतः पक्षाच्या कार्यक्रमांना जाणेही बंद केले आहे, अशी भावना मनपाचे माजी गट नेते संजय अग्रवाल यांनी केली आहे.

कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, संघटनेतील निर्णयप्रक्रिया बदलत असून त्याचा परिणाम पक्षाच्या भविष्यातील कामगिरीवर होऊ शकतो. नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत ४५ पैकी केवळ २५ नगरसेवक निवडून आल्याने पक्षाच्या संघटनात्मक धोरणाचा पुनर्विचार करण्याची गरज असल्याचेही मत व्यक्त केले जात आहे.पक्षाच्या तळागाळातील निष्ठावान कार्यकर्त्यांचा सन्मान, त्यांना योग्य संधी आणि संघटनातील पारदर्शक नियुक्ती प्रक्रिया यावर भर दिला नाही, तर भविष्यात पक्षाला त्याची राजकीय किंमत मोजावी लागू शकते, अशी चर्चा पक्षातील काही वर्तुळांमध्ये सुरू आहे.

दरम्यान, या नाराजीबाबत पक्षाच्या अधिकृत भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# उंच स्पीड ब्रेकरमुळे महिला जखमी

**बेलोरा** - बेलोरा ते रिद्धपूर मार्गावरील संत पुजाजी महाराज मंदिरासमोरील उंच स्पीड ब्रेकरमुळे दुचाकी अपघात वाढले आहेत.

बेलोरा येथील वंदना नरेंद्र गुजर या मुलासोबत दुचाकीवरून जात असताना स्पीड ब्रेकरवर तोल जाऊन पडल्याने जखमी झाल्या.या मार्गावर सात ते आठ उंच स्पीड ब्रेकर असल्याने वारंवार अपघात होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. हे स्पीड ब्रेकर नियमानुसार कमी उंचीचे करावेत, अशी मागणी बेलोरा ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे.



# महापालिकेत जन्म-मृत्यू दाखल्यांबाबत आढावा बैठक

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगर पालिके च्या जन्म-मृत्यू नोंदणी विभागा च्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली.

बैठकीत नागरिकांना जन्म-मृत्यू दाखले वेळेत, अचूक आणि नियमानुसार उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्पष्ट निर्देश देण्यात आले. तसेच चुकीच्या पद्धतीने




## नियमबाह्य कामकाजावर कारवाईचे निर्देश

दाखले देणे किंवा नियमबाह्य कामकाज आढळल्यास संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्याचे आदेशही महापौरांनी दिले.नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये आणि जन्म-मृत्यू दाखले वितरण प्रक्रिया अधिक पारदर्शक, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने राबविण्या च्या सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.बैठकीस सभागृह नेते गावंडे, नगरसेवक अतकरे, ॲड. देशपांडे, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त पिठे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, जन्म-मृत्यू विभागाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतिभा आत्राम यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# विद्यापीठातर्फे 'पी.जी. डिप्लोमा इन मॉलिक्युलर डायग्नोसिस ऑफ इन्फेक्शियस डिसीजेस' अभ्यासक्रम

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या पुढाकाराने आरोग्य क्षेत्रात सज्ज व्यावसायिक घडवण्यासाठी 'पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मॉलिक्युलर डायग्नोसिस ऑफ इन्फेक्शियस डिसीजेस' (संसर्गजन्य आजारांचे मॉलिक्युलर निदान यातील पदव्युत्तर पदविका) हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या प्रगत सेंटर फॉर मॉलिक्युलर डायग्नोसिस ॲन्ड रिसर्च द्वारे संचालित हा विशेष अभ्यासक्रम शैक्षणिक लाईफ सायन्सेस (जीवन विज्ञान) आणि क्लिनिकल डायग्नोस्टिक्स (वैद्यकीय निदान क्षेत्र) मधील दरी साधण्याचे काम करेल.

जागतिक आरोग्य यंत्रणा साथीच्या आजारांचा सामना करण्यासाठी आणि रुग्णांच्या गुंतागुंतीच्या उपचारांचे व्यवस्थापन करण्यासाठी वेगाने आणि अचूकपणे केल्या जाणाऱ्या अणुवांशिक ओळखीवर अधिकाधिक अवलंबून आहे. पारंपारिक चाचणी पद्धतींची जागा आता उच्चक्षमतेच्या अत्याधुनिक मॉलिक्युलर कार्यपद्धती घेत आहेत. हा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम थेट बाजारातील गरजांशी सुसंगत आहे, ज्यामुळे पदवीधरांना आधुनिक निदान प्रयोगशाळा, सार्वजनिक आरोग्य संस्था आणि फार्मास्युटिकल (औषध निर्माण) संशोधन केंद्रांमध्ये स्पर्धात्मक आघाडी मिळते.

**करिअरच्या संधी आणि उद्योगातील मागणी**

या अभ्यासक्रमाचे




पदवीधारक सरकारी आणि खाजगी लाईफ सायन्स (जीवन विज्ञान) क्षेत्रातील मॉलिक्युलर डायग्नोस्टिक्स स्पेशालिस्ट, मेट्रोपोलिस लॅब्स किंवा अपोलो डायग्नोस्टिक्ससारख्या कॉर्पोरेट प्रयोगशाळांमध्ये काम करणे, रिसर्च असोसिएट, प्रगत वैद्यकीय चाचणी केंद्र, विद्यापीठांच्या मुख्य संशोधन सुविधांमध्ये संशोधन सहाय्यक म्हणून कार्य करणे, तांत्रिक सल्लागार, जागतिक बायोटेक कंपन्यांसाठी मॉलिक्युलर उपकरणांच्या उत्पादन विक्री आणि लॉजिस्टिक व्यवस्थेचे व्यवस्थापन करणे, सार्वजनिक आरोग्य अधिकारी, प्रादेशिक पातळीवर पसरणाऱ्या आजारांचा मागोवा घेणे तसेच आरोग्याच्या आणीबाणीच्या काळात राज्य रोगराई नियंत्रण पथकांना मदत करणे आदी विविध प्रकारच्या करिअरच्या संधी उपलब्ध आहेत.

विद्यापीठातील सीएमडीआर उत्कृष्ट शैक्षणिक पायाभूत सुविधांनी परिपूर्ण असून मोठया वैद्यकीय केंद्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या अचूक निदान प्रणालींवर थेट काम करण्याची संधी या ठिकाणी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. विद्यार्थ्यांना नॉलेज रिसोर्स सेंटर, विस्तृत शैक्षणिक ग्रंथालये आणि कॅम्पसमधील वसतिगृह आदी सुविधांचा पूर्ण लाभ मिळेल. याशिवाय अनुभवी मार्गदर्शक तसेच आंतरराष्ट्रीय संसर्गजन्य रोग संशोधनाचा दांडगा अनुभव असलेल्या वरिष्ठ लाईफ-सायन्स प्राध्यापकांच्या थेट मार्गदर्शनाखाली अभ्यास करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

प्रवेशासंबंधी माहिती अभ्यासक्र मासाठी मायक्रोबा योलॉजी, बायोटेक्नॉलॉजी, झूलॉजी, बायोकेमिस्ट्री, जेनोमिक सायन्सेस, ॲग्रीक ल्चर, व्हेटर्नरी सायन्सेस, फिशरीज सायन्सेस, फार्मसीमध्ये प्रथम श्रेणीसह एम.एस्सी. पदवी किंवा बायोटेक्नॉलॉजीमध्ये एम.टेक. किंवा एमबीबीएस, बीडीएस अथवा वैद्यकीय विद्याशाखेतील कोणतीही पदवी धारण केलेले उमेदवार पात्र आहेत. ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा आहे, त्यांनी प्रवेशाचे सविस्तर वेळापत्रक, अर्ज करण्याची पद्धत आणि शुल्काचा तपशील आदी जाणून घेण्याकरीता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या sgbau.ac.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा dir.cmdr@sgbau.ac.in या ई-मेलवर थेट विभागाशी संपर्क साधावा.

तरी ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा आहे त्यांनी ऑनलाईन अर्ज https://sgbauadm.samarth.edu.in वर करून आपला प्रवेश आधीच निश्चित करुन घ्यावयाचा आहे. अधिक माहितीकरीता केंद्राचे संचालक डॉ. प्रशांत ठाकरे व उपसंचालक डॉ. निरज घनवटे यांचेशी संपर्क साधावा, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# संक्षिप्त

## कुऱ्हा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेशोत्सव

**कुऱ्हा**- स्थानिक अशोक शिक्षण संस्था अशोक नगर द्वारा संचालित कुऱ्हा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कुऱ्हा येथे शैक्षणिक सत्र २०२६ -२७ या सत्रामध्ये कुऱ्हा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयकुऱ्हा मध्ये वर्ग पाच ते दहा पर्यंत प्रवेशित झालेल्या नवप्रवेशितांचे स्वागत विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आर.जी. कुमरे यांच्या हस्ते करण्यात आले. नवप्रदेशित विद्यार्थ्यांना कुमकुम तिलक लावून गुलाब पुष्प देऊन व पाठ्यपुस्तक बुक व पेन देऊन सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाला प्रा. एच. एन. बोके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचप्रमाणे पालक प्रतिनिधी मारोडकर, गुरुदेव आमले, बेहरे, ढोणे, उपस्थित होते.संचालन पी.एम.राऊत आभार एच. बी. जाधव यांनी मानले.कार्क्रमाला ए. बी. चांबटकर, एस.आर.इसळ, व्ही.आर. इंगोले, एन. डी. राठोड, एस.बी. चौधरी, के.एन ढगे, जी.पी. नीमकर प्रा. एस.पी.ढोले प्रा. एम.एस. शिरभाते, प्रा.एन.एस. घुणारे, प्रा.एम.एच. वाळके, एस. आर.जीरापुरे, एस.ए.पारवे, व्ही.जी. बेठे कर, एस. एस. चव्हाण, एस.एस. इरपाते, राजू गुल्हाने, युनिस खान पठाण यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाला वर्ग पाच ते बारा चे सर्व विद्यार्थी, शिक्षक, पालक बहू संख्येने उपस्थित होते.

## हर्षल बनसोड यांना राज्यस्तरीय पुरस्कार

**अमरावती**- राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून हर्षल बनसोड यांना राज्य स्तरीय राजर्षी छत्रपती शाहू महाराज २०२६ हा सन्मानाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार वितरण समारंभ खासदार श्रीमंत छत्रपती शाहू महाराज व लोकप्रिय आमदार सतेज उर्फ बंटी पाटील, सुरेश केसरकर यांचे प्रमुख उपस्थितीत कोल्हापूर येथे संपन्न झाला.सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक, कला व धम्म कार्य इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे हर्षल बनसोड हे २०२६ च्या पुरस्काराचे मानेकरी ठरले असून त्यांचे सर्व स्तरावर अभिनंदन होत आहे.पां. ना. दंदे, गोविंदभाऊ कासट, डॉ. मा.प. थोरात, सुदर्शनजी जैन, विकास धंदर, नयन मोंढे, प्रविण वासनिक, अरुणकुमार आठवले, प्रभाताई आवारे, डॉ. गोपीचंद मेश्राम, भारत शहारे, राजू डांगे, प्रशिक मेश्राम, डॉ रंजन खिल्लारे, संजय शेंडे, देवीदास भस्मे, अरुण पुडके, सुरेश इंगोले, अशोक खंडारे, राहूल साळुंके, वसंत दहाट, ॲड. पी. के. राऊत, सागर नाईक, पराग टोकसे इत्यादि मान्यवरांनी बनसोड यांचे अभिनंदन केले आहे..फ़ोटो

## न.प.प्राथमिक शाळेत प्रवेशोत्सव

**चांदुर रेल्वे**- स्थानिक नगर परिषद नेताजी सुभाषचंद्र बोस प्राथमिक शाळेत प्रवेशोत्सव शुभारंभ कार्यक्रम संपन्न झाला.याप्रसंगी गजानन ठाकरे अध्यक्ष म्हणून लाभले. प्रमुख अतिथी आचल प्रधान न प सदस्य, मा.पाटील सर अधीक्षक चांदुर रेल्वे, गवई आणि पालक वर्ग मुख्याध्यापक बडवाईक तथा शिक्षक अरविंद गाठे यांच्या उपस्थितीत मुलांना शालेय पुस्तक वाटप करण्यात आले. तसेच या प्रसंगी गजानन ठाकरे यांच्या हस्ते मुलांना बिस्किट चॉकलेट वाटप करण्यात आले.



## शहर वाहतुकीत तात्पुरता बदल

**अमरावती** - शहरातील बडनेरा-अमरावती राज्य मार्ग क्र. ३०४ वरील कि. मी. १६२/०५० या पादचारी उड्डाणपूलाचे विकासकाम सर्वसामान्य नागरिकांचे हिताचे असून सदर स्टिल स्ट्रक्चर निश्चित स्थानावर स्थापीत करतांना कोणताही अनुचित प्रकार घडु नये याकरीता अलामस गेट बडनेरा ते सावता मैदान बडनेरा या दरम्यान मार्गावरील वाहतुक बंद ठेवण्यात येत असल्याची माहिती अमरावती शहर वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ यांनी दिली आहे. हे मार्ग बंद असतील - अलमास गेट ते सावता मैदान बडनेरा पर्यंत मार्ग सर्व प्रकारचे वाहन व पादचारी यांना कालावधी ४ जुलै च्या रात्री ११.३० वाजेपासून ५ जुलै च्या सकाळी ६ वाजेपर्यंत बंद राहील.

हे असतील पर्यायी मार्ग-बडनेरा कडून अलमास गेट कडे येणार सर्व वाहनांनी अकोला वाय पॉइंट येथून सुपर एक्सप्रेस हायवेवर मेघे कॉलेज चौक, कोंडेश्वर टी पॉईटं मार्गे अमरावती. अमरावती कडून अलमास गेट मार्गे बडनेरा कडे जाणाऱ्या वाहनांनी जुना बायपासचा वापर करावा.सदर अधिसुचनेचे जो कोणी वाहन चालक उल्लंघन करेल त्यांचे विरूध्द मो. वा. का. १९८८ व महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ अन्वये कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. असे आवाहन अमरावती शहरचे पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ यांनी केले आहे.

# शिक्षणः पुस्तकांवरून पडद्याकडे; पडद्यावरून पुस्तकांकडे

**भाषा, वाचन, लेखन या साऱ्या कौशल्यांच्या विकासासाठी स्वीडनसारखा देश शिक्षण पडद्याकडून पुस्तकांकडे नेत असताना आपल्या देशातले अतिउत्साही राज्यकर्ते व प्रशासन मात्र त्याउलट करीत आहेत. शिक्षणाला डिजिटलायझेशनच्या आहारी ढकलत आहेत. भारतातील शैक्षणिक धोरणकर्ते, राज्यकर्ते, संबंधित यंत्रणा यांनी एकदा स्वीडनच्या आरशात बघायला हवे आणि त्यांच्याप्रमाणे शिक्षणाबाबत धोरण आखायला हवे.**



भारतात शिक्षणाचे वेगाने खासगीकरण आणि डिजिटलीकरण करणे सुरू आहे. हळूहळू सरकार शिक्षणातून आपले अंग काढून घेत शिक्षण सरकारचा पैसा न वापरता खासगी क्षेत्राकडे सोपवत आहे. कदाचित लवकरच मानवी शिक्षकांकडून शिक्षण काढून घेऊन ते यंत्रबुद्धीकडे सोपवले जाईल की काय? एवढ्या वेगवान हालचाली घडू लागल्या आहेत.

आंध्र प्रदेशात ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना एआयच्या वापराला परवानगी देत क्यूआर कोडद्वारे शिक्षण देण्याचे चालले आहे. कदाचित पुढे ते मोबाईल रिचार्जसारखे प्रीपेडही होऊ शकेल. पॅक संपला की, बंद. जेवढे पैसे टाकाल तेवढेच शिक्षण. पैसे नसतील तर शिक्षणही नाही.सध्याचा डिजिटल वेग बघता काहीही घडू शकते. याचा अर्थ आपल्याकडे छापील पुस्तकांकडून शिक्षण पूर्णपणे पडद्यावर नेले जाते आहे.

दुसरीकडे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणात जगात आघाडीवर असणाऱ्या स्वीडनमध्ये मात्र 'डिजिटल फर्स्ट' धोरण त्यागून शिक्षणात पारंपरिक साधने, पुस्तकांकडे आपला मोर्चा वळवला आहे. नर्सरीमधून डिजिटल साधनांचा वापर थांबवून मुलांचे लक्ष विचलित होऊ नये म्हणून व शैक्षणिक वातावरणावर लक्ष अधिक केंद्रित करण्यासाठी मोबाईल फोनच्या वापरावरदेखील बंदी घालण्यात आली आहे. अभ्यासक्रम हे पुन्हा छापील पुस्तककेंद्री करण्यात आले आहेत. दहा वर्षांचे सक्तीचे शिक्षण सहा वर्षांच्या मुलांच्या शाळापूर्व शिक्षणाचे प्राथमिक शाळेच्या पहिल्या वर्गात विलीनीकरण करण्यात येत आहे. म्हणजे पडद्याकडून छापील पुस्तकांकडे तिथे शिक्षण नेले जात आहे. भारतात मात्र उलट घडवले जात आहे.

शिक्षणाचे विविध मूल्यमापन अहवाल दरवर्षी विद्यार्थ्यांची लेखन, वाचन, गणन कौशल्यात कशी पीछेहाट होते आहे ते सांगत असतात. या पार्श्वभूमीवर यंत्रबुद्धीकडेच शिक्षण सोपवल्यावर विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमता, भाषिक कौशल्ये इ.चे पूर्णपणे वाटोळे झाल्याशिवाय राहणार नाही हे उघडच आहे. विशेषतः ९४ हजार विद्यार्थी मराठी मातृभाषेतच नापास होत असताना त्यांची भाषिक कौशल्ये, आकलन क्षमता वाढवण्यासाठी स्वभाषेवर जोर देण्याऐवजी महाराष्ट्रातले जे विद्वान अधिकारी मराठीसह भाषा विषयाच्या तासिका कमी करणारे निर्णय घेत आहेत ते उद्या आंध्रच्या धर्तीवर भाषा शिक्षण यंत्रबुद्धीकडे सोपवण्याची भीती वाटते.

भाषा, वाचन, लेखन या साऱ्या कौशल्यांच्या विकासासाठी स्वीडनसारखा देश शिक्षण पडद्याकडून पुस्तकांकडे नेत असताना आपल्या देशातले अतिउत्साही राज्यकर्ते व प्रशासन मात्र त्या उलट करीत आहेत. शिक्षणाला डिजिटलायझेशनच्या आहारी ढकलत आहेत.

स्वीडनच्या प्रस्तावित विधेयकानुसार एआयचा वापर सहा ते तेरा वर्षांच्या मुलांना करता येणार नाही. उच्च माध्यमिकपासून त्याचे उपयोजनच शिकवले जाईल. मुख्य म्हणजे विद्यार्थ्यांना काही विशेष सहाय्याची गरज असेल तर संबंधित शिक्षक प्राचार्यांच्या तसे लक्षात आणून देतील. तसेच अशा विद्यार्थ्यांना व्यक्तिगत पातळीवरदेखील शिकवले जाण्याची सोय केली जाणार आहे.

इकडे महाराष्ट्रात आपण २० पटसंख्येच्या खालच्या शाळाच बंद करायला निघालो आहोत. १२० पटसंख्येच्या शाळेला केवळ एकच शिक्षक सर्व विषय शिकवायला आपले सरकार नेमते आहे. तिकडे महापालिकेच्या शाळांतील शिक्षकांना विशेष शैक्षणिक क्षमता असणाऱ्या तज्ज्ञांची मदत घेण्याची सोय करून देण्यात आली आहे. आपल्याकडे शासन, प्रशासन, राज्यकर्ते यांची वृत्ती तज्ज्ञांचा सल्ला न जुमानण्याचीच अधिक आहे.

स्वीडनमध्ये शिक्षकांवरील प्रशासकीय कामांचा बोजा कमी केला जाणार आहे. शिक्षक हाच अध्यापनाबाबतचे निर्णय घेणारा घटक असल्याची जाणीव करून देण्यात आली आहे. विषयाच्या ज्ञानासोबतच मूलभूत कौशल्ये तसेच विद्यार्थ्यांची बौद्धिक वाढ यावर लक्ष केंद्रित करणारे स्वीडनचे धोरण आहे. सेमेटिसिझमचा म्हणजे ज्यू, मुस्लिम, अरब लोकांचा विरोध ही तिकडे मोठी समस्या आहे. शालेय शिक्षण व्यवस्थेतील त्याचे अध्ययन करून या समस्येवर उपाय शोधण्यावर भर देण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांच्या शाळेतील अनुपस्थितीचे राष्ट्रीय यंत्रणेला सर्वेक्षण करण्याचे काम या विधेयकात सोपवले गेले आहे. शैक्षणिक धोरणाचे पुनरीक्षण करताना स्वीडनच्या संबंधित अहवालात विशेषत्वाने हे लक्षात आणून दिले गेले आहे की, डिजिटल साधनांचा जाणीवपूर्वक वापर करणारे विद्यार्थी या साधनांचा अपवादाने वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा मागे पडत आहेत.

अध्ययन निष्पत्तीच्या संदर्भात डिजिटल साधनांच्या वापराचा परिणाम शैक्षणिक प्रगतीबाबत समाधानकारक नाही, असे संशोधन आहे. सध्या जगभरच या विषयावर गांभीर्याने विचार सुरू असून विद्यार्थ्यांचा डिजिटल साधनांचा वापर रोज सहा तासांवर पोहोचला आहे. त्यामुळे अनेक राष्ट्रांनी शाळेत डिजिटल साधनांच्या वापरावर बंदी घातली आहे. काहींनी त्यांचा वापर मर्यादित केला आहे. जगातील अर्ध्या म्हणजे ११४ राष्ट्रांचा त्यात समावेश आहे. नेदरलॅण्ड, चिली, डेन्मार्क, इक्वेडोर, इथिओपिया, फ्रान्स, फिनलॅण्ड, इटली, कोरिया, ऑस्ट्रेलिया यांनी डिजिटल शिक्षणावर नियंत्रण आणले आहे. बल्गेरियाने अगोदरच बंदी घातली आहे. युनेस्कोने तर २०२३ सालीच शाळांमधून मोबाईल फोनवर बंदी घालण्याचे सुचवले होते. मात्र आपल्याकडे त्याबाबत कुठलाच विचार झालेला नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होऊन त्यांच्या शिकण्यावर परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर भारतातील शैक्षणिक धोरणकर्ते, राज्यकर्ते, संबंधित यंत्रणा यांनी एकदा स्वीडनच्या आरशात बघायला हवे आणि त्यांच्याप्रमाणे शिक्षणाबाबत धोरण आखायला हवे.

**श्रीपाद भालचंद्र जोशी**

# शालेय शिक्षणाच्या भवितव्याची दशा आणि दिशा

सरलेल्या पाच वर्षात देशातील तब्बल १८ हजार ७२७ शाळा बंद करण्यात आल्याची धक्कादायक कबुली राज्यसभेत सरकारच्या वतीने देण्यात आली होती. तर दुसरीकडे एकाच वर्षात ८ हजार ४७५ विना अनुदानित शाळा वाढवण्यात आल्याचे सांगण्यात आले. शाळांचे सरकारी अवलंबित्व कमी करून खाजगीकरणाची ही वाटचाल आहे. महाराष्ट्रातील परिस्थिती पाहता गत पाच वर्षात ८५० सरकारी शाळा बंद करण्यात आल्या. जोडीलाच मागील एका वर्षात १०४ खाजगी शाळा वाढवण्यात आल्या. ही शाळाबाबतची आकडेवारी नसून, शासनाची शिक्षण क्षेत्राबाबतच्या धोरणाची दिशा स्पष्ट करते असे म्हटले गेले आहे. जशी शाळांची अवस्था आहे, तशी शाळा आणि शाळेतील पटसंख्या ही अतिशय दयनीय अवस्थेत आहे. राज्यातील शाळांचा विचार करता २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात ७ हजार ७४२ शाळांत १ ते १० एवढीच पटसंख्या नोंदविली गेल्याचे वृत्त प्रसारित झाले होते. तर ८ हजार ७०२ शाळा ११ ते १०० पटसंख्येवर तग धरून आहेत. आज ग्रामीण भागातील शाळा अंतिम घटका मोजत आहे. त्याला भौगोलिक, सामाजिक, राजकीय अनास्था कारणीभूत ठरते. मध्यंतरी देशातील एक लाख तीन हजार शाळा ह्या एक शिक्षकी असल्याच्या युडायसच्या नोंदणीत उघडीस आल्या होत्या.एकंदरीत ही आकडेवारी सरकारी शाळेची शोकांतिका समजून घेण्यास पुरेशी ठरते. या उलट खाजगी शाळा जोमात आहे.

खाजगी शाळा असाव्यात, पण त्या सरकारी शाळांना पर्याय नसाव्यात, तर पूरक असाव्यात. आजचे शिक्षण क्षेत्र बळकट कमी मळकट अधिक होत आहे. शिक्षण देणाऱ्या शाळांकडे देशाची अनमोल गुंतवणूक म्हणून पाहणी जरुरी आहे. ज्यात देशाचे उज्वल भविष्य दडलेले आहे. गेल्या काही वर्षात राज्यात कायम विना अनुदानित तत्वावर अनेक शाळांना मान्यता देण्यात आली. शिक्षण क्षेत्रात खाजगी गुंतवणूक वाढविणे, शैक्षणिक सुविधेचा विस्तार, शासन शासनावरील आर्थिक बोजा कमी करणे अशा उद्देशाने कायम विना अनुदानित तत्वांवर शाळा उभारण्यात आल्या. मात्र या धोरणाची अंमलबजावणी करताना अनेक त्रुटी राहिल्यात. अनेक संस्था मान्यता मिळून थांबल्या, ना दर्जेदार पायाभूत सुविधा उभ्या राहिल्यात,ना शिक्षकांची योग्य भरती केली जात. परिणामी विद्यार्थ्यांचे कायम शैक्षणिक नुकसान होत गेले. शिक्षण क्षेत्रात खाजगी गुंतवणुकीचे विपरीत परिणाम होत गेले. गेल्या दशकात शिक्षण क्षेत्रात अनेकांनी व्यवसाय म्हणून प्रवेश केलेला दिसतो. नवीन शाळांना मान्यता, शाळा चालविणे आणि विद्यार्थ्यांकडून फी गोळा करणे यालाच प्राधान्य दिलेले बघायला मिळते. तर शैक्षणिक गुणवत्ता, शिक्षकांचे प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हरवला आहे.

सरकारी शाळेत योग्य शिक्षणाचा अभाव असल्यामुळे, पालकांचा कल खाजगी शिक्षण संस्थेकडे होणे स्वाभाविकच आहे. हजारो रुपये डोनेशन भरून, आपल्या पाल्यांना खाजगी शाळेत प्रवेश घेतल्यानंतर, तिथेही फसगत झाल्यासारखे वाटते. पात्र शिक्षकांचा अभाव आणि शैक्षणिक दर्जा नसल्यामुळे, विद्यार्थी वर्ग खाजगी शिकवणीकडे वळलेली दिसतात. 'शंभर टक्के यशाची हमी' देण्याच्या कोचिंग कल्चरचा उगम कधीच झाला. आणि तो पहिल्या वर्गापासून,उच्च शिक्षण देण्यापर्यंत कोचिंग सेंटर गल्लो गल्ली आज बघायला मिळायला लागल्या. इथे विविध विषयांचे स्वयंघोषित एक्सपर्ट आहेत.अवाजवी फी आकारून पालकांचे खिसे खाली करण्यात अग्रेसर आहेत. नुसत्या राज्याचा विचार केला,तर खाजगी कोचिंग सेंटर मधून होणारी आर्थिक उलाढाल एवढी आहे की, एका छोट्या राज्याच्या शैक्षणिक बजेटच्या आसपास राहील. 'सरकारी शाळा कोमात, खाजगी शाळा आणि कोचिंग सेंटर जोमात!' अशा परिस्थितीत राज्यातील शैक्षणिक विषमता दृष्टीस पडते.

अलीकडेच देशात नीट पेपर फुटी प्रकरणात खाजगी कोचिंग क्लासेस चा सहभाग उघड झाल्यानंतर, या क्लासेस वरील नियंत्रणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. राज्यात २०००मध्ये खाजगी शिकवणी क्लासेस वर नियंत्रण आणण्यासाठी तत्कालीन शिक्षण राज्यमंत्री अनिल देशमुख यांनी अध्यादेश काढला होता. तो आजपर्यंत कागदावरच आहे. गेल्या अडीच दशकात राज्याला आठ नवे शिक्षण मंत्री मिळालेत. परंतु, एकाही मंत्र्याला अध्यादेशाचे कायद्यात रूपांतर करण्यात यश आले नाही. जे नियम शाळा महाविद्यालयांना आहे, तेच नियम खाजगी क्लासेस ना बंधनकारक करून त्यांची फी निश्चित करावी अशी मागणी आहे. राजस्थान, दिल्ली, बिहार सारख्या राज्यात खाजगी क्लासेस वर नियंत्रण आणण्यासाठी कठोर कायदे लागू केले आहेत. याच धर्तीवर राज्यात असा कायदा कधी लागू होणार? हा प्रश्न पालक वर्गांना पडला आहे. आज शिक्षण क्षेत्रात शैक्षणिक गुणवत्ता, सर्वांगीण सुधारणा, आर्थिक लूट, सर्व घटकापर्यंत शिक्षण पोहोचेल अशी विश्वासार्ह व्यवस्था निर्माण करण्यासाठी;शासन, प्रशासन, शिक्षण तज्ज्ञांकडून मोठ्या अपेक्षा आहेत. तसेच लोकप्रतिनिधीं कडून माफक आशा,अपेक्षा बाळगल्या जात आहे.

**शशिकांत तोटे**
दारव्हा,जि.यवतमाळ
मो: ९१३०८३५४५८

# कामवाले रोबोट आणि आम्ही

घरोघर गृहलक्ष्मीच्या हाती झाडू असतो, तसा आमच्याही घरी (पण जरा जास्त प्रमाणात) आहेच. वयोमानाने पत्नीला झाडू पोछा करत राहणे कठीण होत गेले आणि पगारवाढीसोबतच कामवाल्या बायांच्या सुट्ट्यांमध्ये देखील वाढ होत गेली. त्यामुळे आम्ही यंत्राला शरण जाण्याचे ठरविले.



झाडू पोछा एकदम करणारा रोबोट विकत आणला. एखाद्या चपट्या पेढेघाटी डब्यासारखा आकार असलेल्या या रोबोटची विधिवत एका जागी स्थापना करावी लागते. त्याचे सिंहासन म्हणजे एक छोटेसे चार्जिंग स्टेशन असते, जे वायरने प्लगला जोडावे लागते. सर्वप्रथम हा रोबोट बसल्या जागेवरून संपूर्ण घराचा नकाशा आत्मसात करून घेतो. मग त्याला त्याची कामाची वेळ निश्चित केली की तो त्या ठराविक वेळी आपले स्टेशन सोडून घरभर फिरू लागतो, फिरता फिरता सगळा केर कचरा, धूळ गोळा करतो आणि पोछा ही करतो. हे सगळे काम तो थोडा गुणगुणत करत असल्यामुळे आपल्या जवळपास आला तर सावध होता येते. पण त्याआधी फरशीवर कुठे नोकदार लोखंडी वस्तू, काच इ. पडलेले नाहीत याची आपल्यालाच खात्री करून घ्यावी लागते. शिवाय त्याच्या मार्गातले छोटे छोटे अडथळे म्हणजे स्टूल, चपला, इ. वर उचलून ठेवावे लागतात. आपल्या घरात जर अनेक लेव्हल्स असल्या तर मात्र हा रोबोट फारसा कामाचा नाही. कारण तो वर किंवा खाली उडी मारू शकत नाही. रांगत्या लेकरासारखा धडपडू शकतो. लेकराला इजा झाली तर ते रडू लागते. रोबोटचे उलटे आहे. इजा झाली तर तो नुसता पडून राहील.

सुदैवाने आमच्या घरात सर्व खोल्या एकाच पातळीवर आहेत. त्यामुळे सुमारे सव्वा तास पुन्हा पुन्हा सर्व खोल्यांमध्ये फिरत राहून धुळीचा कणही फरशीवर शिल्लक राहू नये याची दक्षता हा रोबोट घेतो, आणि केराने पोट भरले व पाण्याची पिशवी रिकामी झाली की पुन्हा आपल्या जागी येऊन शांत बसतो. नंतर चार्जिंग करून त्याला पुन्हा ताजेतवाने करावे लागते आणि टायमिंग नुसार लावलेल्या वेळी तो सक्रिय होतो.

रोबोटमुळे टाइल्स खूपच स्वच्छ होतात, ज्या हाताने केलेल्या झाडू पोछामुळे तितक्या स्वच्छ होऊ शकत नाही. त्याची कामाची वेळ आणि माझी आंघोळीची वेळ सारखीच असते. तो आल्यापासून आंघोळ करताना मी आठवणीने दोन्ही तळपायसाबण लाऊन स्वच्छ करण्याचा प्रयत्न करतो. तरीही बाथरूम मधून बेडरूम मध्ये येण्यासाठी पाऊल उचलले की पाकीजातल्या राजकुमार सारखा त्याचा आवाज माझ्या कानात घुमत असल्याचा भास होतो.

'आपके पाँव देखे, इन्हे जमीनपर मत उतारियेगा. टाइल्स मैली हो जायेंगी'.

**किशोर देशपांडे**

# शेतच कुंपण खाते तेव्हा..


बालपणी कवी प्रदीपचे एक सुंदर गीत ऐकत होतो..**'देख तेरे संसार कि हालात क्या हो गई भगवान, कितना बदल गया इंसान।'**

ज्या देशात रामाला आदर्श मानल्या जाते. राम हा भारतीय संस्कृतीचा आत्मा आणि आदर्श मानल्या जाते. ज्या रामाने वडिलांची आज्ञा पाळून आपली राजवस्त्र फेकून चौदा वर्ष वनवास भोगला आणि आदर्श पुत्र म्हणून भारतीय संस्कृतीत नोंद केली.जेव्हा जेव्हा पौराणिक कथेचा विषय हाताळल्या जातो तेव्हा तेव्हा प्रभू रामचंद्राचा सन्मानाने उल्लेख केला जातो. चौदा वर्ष वनवास भोगूनही शेवटी सहाशे वर्ष प्रभू रामचंद्र आपल्या जन्मभूमीत बंदिस्त होते. पण जेव्हा रामजन्मभूमी मोकळी झाली आणि रामलल्लाचे भव्य दिव्य मंदिर अयोध्येत उभे झाले तेव्हा करोडो भारतीयांचा आनंद गगनात मावेनासा झाला.तेव्हा भारतीयांनी श्रद्धा म्हणून लाखो-करोडो रुपयाचे दान केले.काहीनी आपल्या कमाईतून दान दिले, अनेकांनी आपली दागिने अर्पण केली, राब राब राबणाऱ्या मजुराने आपल्या कमाईचा खारीचा वाटा म्हणून, फुल नाही फुलाची पाकळी म्हणून दान दिले. केवळ आणि केवळ प्रभू रामचंद्राविषयी असलेली आपली प्रचंड श्रद्धा म्हणून.परंतु या सगळ्या पैशांची लूट करणारे मंदिरातील ट्रस्टी यांना थोडीही लाज वाटली नाही. पैसे लुटताना त्यांची हिंमतच कशी झाली हे समजत नाही. प्रभू रामचंद्राचा अपमानच नाही तर लाखो लोकांचे प्रेरणास्थान असलेल्या प्रभू रामचंद्राचा विश्वासघात केला आणि धार्मिक भावना दुखावल्या गेल्या.लाखो करोडो रुपयांच्या देणगीवार डल्ला मारताना यांना जराही लाज वाटली नाही का? मंदिरातील रामलल्लाच्या मूर्तीला निर्जीव समजले का? पण तुमच्या साठी रामाल्लला निर्जीव असले तरी मात्र लाखो जनतेच्या श्रद्धेचे स्थान आहे. तर काही साठी प्रेरणा तर काही करीता आदर्श आहे. श्रद्धेच्या पोटी दिलेले दान लुटतांना आपण पाप करीत आहे याची जराही जाण त्यांना नाही आली का? पण शेतच कुंपण खात असेल तर शेताचे रक्षण कसे होईल?आता पर्यंत आठ आरोपींना अटक केली तर रामजनभूमी ट्रस्टचे महासचिव आणि सदस्य यांनी आपल्या पदाचा राजीनामे दिले. पण केवळ राजीनामे दिल्याने होईल काय? तर यापुढे भक्त असे दान अर्पण करणार नाही.

वर्तमानकालीन राजकीय परिस्थितीचे अवलोकन केले असता दररोज उगवणारी पाहत काहीना काही बदल घेऊन येते.राजकारणामध्ये कोणतीही विचारधारा आज दिसून येत नाही.नीतिमूल्ये,सत्य,ईमानदारी केव्हाच विकल्या गेली.राजकारणामध्ये घोडे बाजाराला ऊत आला आणि आता हत्ती बाजार झाला.एक काळ होता मूल्याधिष्ठित राजकारण होते, नीतिमत्ता होती, मूल्ये होती.तत्वाकरीता वेळ प्रसंगी सत्ता सोडणारी व सत्तेवर लाथ मारणारी मंडळी होती.शब्दाला किंमत होती.मानसन्मान होता.पण आज हि मूल्ये निस्तानभूत झाली आहे.पैसा आणि सत्येकारिता लोटांगण घालणारी राजकारणी तयार झाली आहे.मतदाराच्या मतांना किंमत राहिली नाही.

मला येथे रतन खत्रीच्या मटक्याची आठवण होते. त्याच्या मुंबई कल्याण च्या वरळी मटक्यामध्ये कायद्याची मान्यता नव्हती पण समाजमान्यता तर नव्हतीच पण प्रामाणिकता होती. रात्री नऊ नंतर ओपन आला की लावलेले पैसे मिळत होते आणि क्लोज खुलला की क्लोज चे पैसे. हा एक जुगार होता. लाखो रुपये लावायचे आणि आपण लावलेला आकडा आला तर केवळ छोट्या चिठ्ठीवर पैसे मिळत होते. केवढी हि प्रामाणिकता नंबर दोन च्या धंद्यात! पण राजकारणामध्ये प्रामाणिकता कोठेच दिसत नाही.लग्न एकाशी जोडायचे, दुसऱ्याशी करायचे आणि मुल तिसऱ्याची.

आम्ही प्रामाणिकपणे मतदान करायचे पक्षाच्या नावावर व पक्षाची वैचारिक बांधिलकी राखून उमेदवाराला मतदान करायचे आणि तो निवडून आला कि पक्ष सोडून पैस्यत करीता व सत्तेच्या गुरुत्वाकर्षणामुळे दुसऱ्या पक्षात प्रवेश करायचा. स्व पक्षाची बांधिलकी तोडून, मतदाराचा विश्वासघात करून मतदारांनी नाकारलेल्या पक्षात डुबकी मारायची.हि अत्यंत वेदनादायक बाब आहे. सुदृढ लोकशाहीकरिता धोक्याचा इशारा आहे.अशाने लोकशाही नासवली जाईल. खर म्हणजे आज राजकीय एन्काऊंटर केल्या जात आहे.



**प्राचार्य डॉ. संजय साळीवकर,**
अमरावती
मो.९४२३४२४८५१

# जनतेच्या मताचा विश्वासघात:पक्षांतर नव्हे, लोकशाहीवरील घाव!

महाराष्ट्राच्या राजकारणात अलीकडे अनेक पक्षांतरांच्या घटना घडल्या आहेत. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली निवडून आलेले काही खासदार नंतर शिंदे गटात सामील झाले. या घटनेकडे अनेकजण वेगवेगळ्या राजकीय दृष्टिकोनातून पाहतात. काहींच्या मते हा त्यांच्या राजकीय भवितव्याचा निर्णय आहे, तर काहींच्या मते हा जनादेशाशी विसंगत निर्णय आहे. लोकशाहीत या दोन्ही मतांना स्थान आहे.

प्रश्न असा आहे की, मतदारांनी ज्या पक्षाच्या विचारांवर आणि नेतृत्वावर विश्वास ठेवून मत दिले, त्या जनादेशाचा सन्मान राखणे ही निवडून आलेल्या प्रतिनिधीची नैतिक जबाबदारी नाही का?अनेक मतदारांचा असा युक्तिवाद असतो की, जर एखाद्या नेत्याला आपल्या पक्षाच्या भूमिकेशी मूलभूत मतभेद असतील, तर त्याने प्रथम आपल्या पदाचा राजीनामा देऊन पुन्हा जनतेसमोर जावे. त्यानंतर मतदारांनी जर त्याच निर्णयाला पाठिंबा दिला, तर तो निर्णय अधिक नैतिक मानला जाऊ शकतो. ही अपेक्षा लोकशाहीतील उत्तरदायित्वाच्या संकल्पनेशी सुसंगत मानली जाते.

लोकशाही ही केवळ संख्येचा खेळ नाही; ती विश्वासाची व्यवस्था आहे. मतदार पाच वर्षांसाठी आपल्या प्रतिनिधीवर विश्वास ठेवतो. त्यामुळे निवडून आल्यानंतर झालेल्या पक्षांतरामुळे अनेक मतदारांना आपला विश्वास तुटल्याची भावना निर्माण होऊ शकते.इतिहासात अनेक नेत्यांनी तत्त्वांसाठी सत्ता, पद आणि सुविधा सोडल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे राजकीय निर्णयांचा विचार करताना तत्त्वनिष्ठा आणि जनादेश या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या ठरतात.

दुसरीकडे, भारतीय राज्यघटनेत आणि कायद्यात पक्षांतराबाबत काही तरतुदी आहेत. त्या कायदेशीर प्रक्रियेच्या चौकटीत निर्णय घेतले जातात. त्यामुळे एखादा निर्णय कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य असू शकतो; परंतु नैतिकदृष्ट्या त्याचे मूल्यमापन वेगळ्या निकषांवर केले जाऊ शकते. कायदेशीरता आणि नैतिकता हे नेहमीच समानार्थी नसतात.

मतदारांचा विश्वास हा कोणत्याही लोकशाहीचा पाया असतो. जर वारंवार पक्षांतरामुळे मतदारांमध्ये 'आमच्या मताचे मूल्य काय?' असा प्रश्न निर्माण होत असेल, तर त्या चिंतेकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.राजकारणात मतभेद असणे स्वाभाविक आहे. विचार बदलू शकतात, भूमिका बदलू शकतात. परंतु त्या बदलाची पद्धतही तितकीच महत्त्वाची असते. लोकशाही अधिक बळकट व्हावी असे वाटत असेल, तर जनतेच्या मताचा आणि जनादेशाचा सन्मान राखणारी राजकीय संस्कृती विकसित होणे आवश्यक आहे.

शेवटी प्रश्न एका पक्षाचा किंवा एका गटाचा नाही. प्रश्न असा आहे की, मतदारांनी दिलेल्या जनादेशाचा अर्थ काय? जर मतदारांना वाटू लागले की निवडणुकीनंतर त्यांचा निर्णय सहज बदलला जाऊ शकतो, तर लोकशाहीवरील विश्वास कमी होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. राजकीय निष्ठा, तत्त्वनिष्ठा आणि जनतेप्रती उत्तरदायित्व ही लोकप्रतिनिधींची मूलभूत मूल्ये मानली जातात. त्यामुळे कोणत्याही पक्षातील किंवा कोणत्याही विचारसरणीतील लोकप्रतिनिधींनी पक्षांतराचा निर्णय घेताना मतदारांच्या अपेक्षा आणि जनादेशाचा सन्मान यांचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

लोकशाहीचा खरा विजय सत्ताबदलात नसतो; तो जनतेच्या विश्वासाचा सन्मान करण्यात असतो. जनादेश हा केवळ मतांचा आकडा नसतो, तर लाखो नागरिकांच्या आशा, अपेक्षा आणि विश्वासाचे प्रतीक असतो. त्यामुळे त्या विश्वासाचे रक्षण करणे ही प्रत्येक लोकप्रतिनिधीची सर्वोच्च जबाबदारी आहे.सत्ता, पद आणि पक्ष बदलू शकतात; पण जनतेने दिलेला जनादेश बदलत नाही. मतदारांनी ज्या विश्वासाने मतदान केले, त्या विश्वासाचा सन्मान करणे ही प्रत्येक लोकप्रतिनिधीची नैतिक जबाबदारी आहे.लोकशाहीत सर्वात मोठा पक्ष कोणताही नसतो; सर्वात मोठी ताकद जनतेचा विश्वास असतो. तो तुटला, तर जिंकते सत्ता... पण हरते लोकशाही.

**महेश महादेव देवळे**
आययूडीपी कॉलनी,
वाशिम
मो.९९६०४११९८३

# पहिल्याच पावसात रस्त्याचा बुरखा फाटला!

## अकोट–दर्यापूर मार्गावरील रंभापूर फाट्याजवळ नवा रस्ता खचला

### निकृष्टकामाचा आरोप, तासन्तास वाहतूक ठप्प

■ प्रतिनिधी | अकोट ■

कोट्यवधी रुपयांचा खर्च, विकासाच्या गप्पा आणि दर्जेदार कामाचे दावे... मात्र पहिल्याच पावसाने या सर्व दाव्यांची अक्षरशः पोलखोल केली. अकोट–दर्यापूर मार्गावरील रंभापूर फाट्याजवळ नुकताच तयार करण्यात आलेला नवीन रस्ता पहिल्याच पावसाच्या तडाख्यात खचल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रस्ता खचल्यामुळे या महत्त्वाच्या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली असून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. त्यामुळे प्रवाशांना तासन्तास मनस्ताप सहन करावा लागला.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित रस्त्याचे काम नुकतेच पूर्ण झाले होते. मात्र पावसाची पहिलीच सर कोसळताच रस्त्याखालची माती वाहून गेली आणि मोठा भाग खचला. त्यामुळे कामाच्या गुणवत्तेवर संशय व्यक्त केला जात असून, कंत्राटदाराने



निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून काम केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. पहिल्याच पावसात रस्त्याची अशी दुरवस्था झाल्याने विकासकामांच्या दर्जाबाबत प्रशासनाच्या दाव्यांवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. रस्ता खचल्याने अकोट–दर्यापूर मार्गावरील वाहतुकीचा पूर्णतः खोळंबा झाला. अवजड वाहनांसह शेकडो चारचाकी व दुचाकी वाहनांच्या रांगा लागल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला.

अनेक प्रवासी पर्यायी मार्ग शोधताना दिसले. विशेष म्हणजे, खचलेल्या भागामुळे मोठा अपघात होण्याची भीतीही व्यक्त केली जात असून प्रशासनाने तातडीने सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करूनही जर रस्त्यांची अशी अवस्था होत असेल, तर यामागे कंत्राटदार आणि संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित केलीच पाहिजे, असा संताप नागरिकांनी व्यक्त केला आहे. केवळ डागडुजी करून प्रकरण दडपण्याऐवजी संपूर्ण कामाची तांत्रिक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

### पहिल्याच पावसातच विकासाची 'पोलखोल'

रस्ता पूर्ण झाल्यानंतर काही दिवसांतच पहिल्याच पावसात तो खचल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखरेखीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कामाच्या दर्जाची तपासणी नेमकी झाली होती का? वापरण्यात आलेले साहित्य निकृष्ट होते का? संबंधित कंत्राटदाराला पाठीशी घालण्याचा प्रयत्न झाला का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आता प्रशासनाला द्यावी लागणार आहेत. अन्यथा 'कागदावर विकास आणि प्रत्यक्षात निकृष्ट काम' अशीच भावना जनतेत अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

## महानगरात मोफत मराठी शिका उपक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यात गत सात दशकापासून शिक्षण क्षेत्रात वेगळा शैक्षणिक ठसा निर्माण करणाऱ्या हिंदी- गुजराती शिक्षण संस्थेच्या वतीने मराठी संवर्धन व जोपासन व मराठी संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी मोफत मराठी शिका अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्थानीक मुंगीलाल बाजोरिया विद्यालयात या शैक्षणिक सत्रापासून मराठी शिका हा उपक्रम सुरू होत असून या उपक्रमात मराठी लिहिणे व बोलण्यात पारंगत करण्यासाठी १० वर्षापासून तर ७० वर्षापर्यंतच्या नागरिकांसाठी मोफत मराठी भाषा वर्ग प्रारंभ करण्यात येणार आहेत. हिंदी- गुजराती शिक्षण संस्थेच्या वतीने गत १९५२ पासून मुंगीलाल बाजोरीया विद्यालयाची स्थापना केली असून यातून अनेक विद्यार्थी घडले आहेत.काही विद्यार्थी परदेशातही उच्च पदावर विराजमान असून प्राथमिक शिक्षणापासून सुरू झालेला प्रवास आज उच्च शिखरावर पोचला आहे.विद्यार्थी कुठेही मागे राहू नये म्हणून एमबी कॉन्व्हेंट हे इंग्रजी माध्यमाचे वर्ग ही संस्थेच्या वतीने सुरू केले असून ते अविरत सुरू आहेत.राज्यात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्ती, विद्यार्थ्याला मराठी भाषा लिहिता, वाचता, बोलता आली पाहिजे. यासाठी या भाषेचे संवर्धन व जोपासन करण्यासाठी संस्थेने हा मोफत मराठी शिका उपक्रम प्रारंभ केला आहे. यात मराठी तज्ञ शिक्षिका सौ पुराणीक यांच्या मार्गदर्शनात या मराठी भाषाचे विशेष वर्ग सुरू करण्यात येणार आहेत. वयोगटातील सर्व विद्यार्थी व नागरिकांनी या मोफत मराठी शिका उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले.

**Change In Name**

I have Change My Name Form
**AJAZ MUSTAFA KHAN**
-TO-
**AEJAZ KHAN MUSTUFA KHAN**
My passport Number - L8846470 My residential Address in Near Ambedkar School, Shahnwaz Pura, Naigaon Akola 444003

### जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९८३/२०२६ — प्रोसेस नं.८०९२/२०२६
चौ.ता. ११/०८/२०२६ — दिनांक : ३०/०६/२०२६

**अर्जदार :** १. सुजाता दिनकर दारमोडे २. रविंद्र दिनकर दारमोडे ३. पवन दिनकर दारमोडे सर्व रा. गुरूदेव नगर, मोठी उमरी, महाकाली नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : दिनकर ज्ञानदेव दारमोडे
**पत्ता :-** रा. महाकाली नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत दिनकर ज्ञानदेव दारमोडे यांचे दि. ०६/०३/२०२६ रोजी वत्सल हॉस्पिटल, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९१६/२०२६ — प्रोसेस नं.७९५४/२०२६
चौ.ता. ०३/०८/२०२६ — दिनांक : २४/०६/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती सिंधुताई भीमराव अरखराव रा. पी. के. व्ही. कॉलनी, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला. २. दिनेश भीमराव अरखराव रा. लहरीया नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला. ३. सौ. उषा विष्णू सुरवाडे रा. प्लॉट नं. १४, वार्ड नं. २, पी. के. व्ही. कॉलनी, मलकापूर, चांदूर, अकोला. ता. जि. अकोला. ४. सौ. छाया नाजुकराव सिरसाट रा. पी. के. व्ही. मलकापूर, चांदूर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : भीमराव नारायण अरखराव
**पत्ता :-** रा.--

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुमन रूपराव बिल्लेवार यांचे दि. ०७/१२/२०२५ रोजी दोडकी जवळा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/०८/२०२६. रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## निंबी खूनप्रकरणाचा १२ तासांत छडा; सहा संशयित ताब्यात

■ प्रतिनिधी | बार्शिटाकळी ■

तालुक्यातील निंबी येथे २७ वर्षीय अनिकेत भास्कर इंगळे यांच्या हत्येप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) आणि बार्शिटाकळी पोलिसांनी संयुक्त कारवाई करत अवघ्या १२ तासांत सहा संशयितांना ताब्यात घेतले. तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहिती आणि रात्रभर राबविलेल्या शोधमोहीमेच्या आधारे ही कारवाई करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३० जून २०२६ रोजी निंबी येथील सौ. प्रार्थना भास्कर इंगळे यांनी बार्शिटाकळी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीत शेतीच्या कारणावरून झालेल्या वादातून काही जणांनी संगनमत करून अनिकेत इंगळे यांच्या डोळ्यांत मिरची पावडर मिश्रित पाणी टाकले व त्यानंतर हातोड्याने डोक्यावर वार करून त्यांचा खून केल्याचा आरोप करण्यात आला. या तक्रारीच्या आधारे बार्शिटाकळी पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.



■ शेतीच्या वादातून तरुणाच्या हत्येचा आरोप
■ एलसीबी व बार्शिटाकळी पोलिसांची संयुक्त कारवाई

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर आणि बार्शिटाकळीचे पोलीस निरीक्षक प्रवीण धुमाळ यांना संशयितांना तातडीने ताब्यात घेण्याचे निर्देश दिले. त्यानुसार एलसीबी व बार्शिटाकळी पोलिसांची संयुक्त पथके तयार करण्यात आली.

संशयितांचा शोध घेण्यासाठी पथकांनी रात्रभर बार्शिटाकळी व पातूर तालुक्यात विविध ठिकाणी शोधमोहीम राबविली. संभाव्य लपण्याची ठिकाणे, बसस्थानके, खासगी प्रवासी वाहतूक केंद्रे आणि अन्य महत्त्वाच्या ठिकाणी तपास करण्यात आला. तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे एलसीबीच्या पथकाने पातूर परिसरातून विशाल सुरेश करवते (२८) आणि अमोल सुरेश करवते (३०), दोघेही रा. निंबी, यांना ताब्यात घेतले. हे दोघे परिसरातून पसार होण्याच्या तयारीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. दरम्यान, बार्शिटाकळी पोलिसांनी स्वतंत्र कारवाई करत सुरेश हरिभाऊ करवते (६०), रेखा सुरेश करवते (५२), अस्मिता विनोद सुरवाडे (२५) आणि मयुरी अमोल करवते (२३), सर्व रा. निंबी, यांना ताब्यात घेतले.

या प्रकरणाचा पुढील तपास बार्शिटाकळी पोलीस करीत असून, घटनेमागील नेमके कारण, प्रत्येकाची भूमिका आणि पुराव्यांच्या आधारे पुढील कायदेशीर प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा आणि बार्शिटाकळी पोलीस ठाण्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे केली.

## जिल्ह्यात पावसाची शक्यता पाऊस

**अकोला :** जिल्ह्यात काही ठिकाणी विजाच्या कडकडासह पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवली आहे. यादरम्यान ताशी ४० ते ५० किमी प्रतितास याप्रमाणे हवेचा वेग राहण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि ढगांच्या गडगडाटांसह विजा आणि पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे.

## देशी गोवंशाचे संवर्धन ही काळाची गरज- मुंदडा

**अकोला :** महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे राज्यभरातील ९८६ गोशाळा नोंदणीकृत असून अकोला जिल्ह्यात ३६ गोशाळा या आयोगाकडे नोंदीत असून २४ गोशाळांना गोवंश रक्षण व संवर्धनसाठी अनुदान देण्यात येत आहे. राज्यभरात देशी गोवंशाचे संवर्धन व रक्षण झाले पाहिजे, त्याच दृष्टीने गो आधारित शेती, गो उत्पादन, गो पर्यटन, राज्यभरातील विद्यार्थ्यांना गोवंशाची महती पटावी यासाठी विविध उपक्रम महाराष्ट्र गोसेवा आयोग सातत्याने राबवित असून आयोगाच्या कृतीशील कार्यामुळेच राज्यमातेचा दर्जा मिळालेल्या गोमातेला वैज्ञानिक दृष्ट्या मोठे महत्व प्राप्त झाले असून ही आपल्या संस्कृतीची मोठी उपलब्धी आहे.

### जाहीर नोटीस

**अकोला येथील वि. ५वे सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांच्या न्यायालयात**
**'वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स'**
(दिवाणी व्यवहार संहिता, नियमक्रम ५, नियम १,५)
अनुसूची एक, परिशिष्ट ब,क्र. २

दावा रु. /- — आर.सी.एस ३८०/२०२५
चौ. ता. : २९/०७/२०२६

**साई कन्स्ट्रकशन ... वि....प्रभाकर**

बनाम : - १. प्रभाकर निंबाळकर
२. कुसुम शंकरप्रसाद मिश्रा सर्व रा. १७७९, कलाल की चाळ अकोला ता.जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी SUIT FOR EVICTION, POSSESSION, ARREARS OF RENT AND INQUIRY INTO FUTURE MESNE PROFIT' यासाठी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे, त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक २९/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रशंचे उत्तर देउ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, समन्स बजावल्यापासून ३० दिवसाचे आत तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) 'पुष्ठ्यर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमून केलेल्या तारखेस किंवा कालावधीत बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल. आज दिनांक २२/०६/२०२६ रोजी अकोला येथे माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. समन्स मिळाल्यापासून ३० दिवसाच्या आत लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**Civil Judge Sr.Dn.Akola**
**IN THE COURT OF Shri A.R. Sayed**
**5th Jt. Civil Judge S.D. and Addl.CJM Akola, Akola, Akola.**

SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES

R.C.S./373/2025
Sai Construction And Developers LLP Thr. Shanky Rajendrakumar Jaiswal Vs P. M. Modak And 2
NEXT DATE: 23-07-2026

(0.5, R. 1, 5.)

To,
**P. M. Modak And 2**
**R/o. 1793, Kalal Ki Chawl, Akola, Tq. Dist. Akola,**
**AKOLA, MAHARASHTRA**

Whereas **Sai Construction And Developers LLP Thr. Shanky Rajendrakumar Jaiswal** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the **23-07-2026 at 11:00 o'clock in the forenoon**, to answer the claim; and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement. Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence. Given under my hand and the seal of Court this 20-06-2026

**5th Jt Civil Judge S.D.and Addl.CJM . Akola**

**Civil Judge Sr.Dn.Akola**
**IN THE COURT OF Shri V.R. Assudani**
**9th Jt Civil Judge Sr.Dn. Akola, Akola, Akola.**

SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES

R.C.S./376/2025
Sai Construction And Developers LLP Thr. Shanky Rajendrakumar Jaiswal Vs Yashwant K. Deshpande And 2
NEXT DATE: 24-07-2026

(0.5, R. 1, 5.)

To
Yashwant K. Deshpande And 2
R/o. 1785, Kalal Ki Chawl, Akola,
Tq. Dist. Akola, AKOLA, MAHARASHTRA

Whereas **Sai Construction And Developers LLP Thr. Shanky Rajendrakumar Jaiswal** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the **24-07-2026 at 11:00 o'clock in the forenoon**, to answer the claim; and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court this 29-06-2026

**9th Jt Civil Judge Sr.Dn. Akola**

### जाहीर नोटीस

**अकोला येथील वि. ४ थे दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांच्या न्यायालयात**
**'वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स'**
(दिवाणी व्यवहार संहिता, नियमक्रम ५, नियम १,५)
अनुसूची एक, परिशिष्ट ब,क्र. २

दावा रु. /- — नि. दावा. नं. ३७२/२०२५
चौ. ता. : ०९/०७/२०२६

**साई कन्स्ट्रकशन ... वि....नवल किशोर**

बनाम : - 1.Naval Kishor Jaiswal 2. Mohammad Nisar
Both R/o- 1732, Kalal ki Chawl, Akola Tq. Dist. Akola

ज्याअर्थी वादी यांनी ' SUIT FOR EVICTION, POSSESSION, ARREARS OF RENT AND INQUIRY INTO FUTURE MESNE PROFIT' यासाठी तुमच्या विरुध्द या न्यायालयात बाद दाखल केला आहे. त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक ०९/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रशंचे उत्तर देउ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे. की, समन्स बजावल्यापासून ३० दिवसाचे आत तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) पुष्ठ्यर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुन केलेल्या तारखेस किवा कालावधीत बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल आज दिनांक २५/०६/२०२६ रोजी अकोला येथे माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. समन्स मिळाल्यापासून ३० दिवसाच्या आत लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९५९/२०२६ — प्रोसेस नं. ७९६२/२०२६
चौ.ता. ०७/०८/२०२६ — दिनांक : २४/०६/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती कौशल्या अशोककुमार भाटिया २. सुंदर उर्फ सुंदरदास अशोककुमार भाटिया ३. मयुर अशोक भाटिया मो. क्र. ८०८७३०३०१९ तिघेही रा. कच्ची खोली, सिंधी कॅम्प, अकोला. ता. जि. अकोला. ४. रिया लोकेश भाटिया रा. सुखडिया नगर, रामपुरा रोड, नाथवरा, राजस्थान ५. करिश्मा चेतन सुखेजा रा. दिवान चॉल, सिंधी गल्ली दौंड, जि. पुणे. ६. ज्योती अमरलाल भाटिया रा. गोपाल पार्क, मैत्री हॉस्पिटल जवळ, कुबेर नगर, अहमदाबाद.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अशोककुमार बक्षराम उर्फ बन्सुमल भाटिया
**पत्ता :-** रा. नवीन पावर हाउस मागे, बाबा हरदासराम नगर, सिंधी कॅम्प, कच्ची खोली, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अशोककुमार बक्षराम उर्फ बन्सुमल भाटिया यांचे दि. ०४/०६/२०२६ रोजी अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**Civil Judge Sr.Dn. Akola**
**IN THE COURT OF Shri V.J. Dongre**
**Civil Judge SD Akola, Akola, Akola.**

SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES

Small Cause Suit/22/2025
Sai Construction And Developers LLP Thr. Its Patner Shanky Rajendrakumar Jaiswal Vs Keshav N Joshi And 1
NEXT DATE : 15-07-2026

(0.5, R. 1, 5.)

To,
**Keshav N Joshi And 1**
**R/o. 1707, Kalal Ki Chawl, Akola, Tq. Dist. Akola,**
**AKOLA, MAHARASHTRA**

Whereas **Sai Construction And Developers LLP Thr. Its Patner Shanky Rajendrakumar Jaiswal** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the **15-07-2026 at 11:00 o'clock in the forenoon,** to answer the claim; and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set- off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Conurt 24-06-2026

**Civil Judge SD Akola**

### जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७६८/२०२६ — प्रोसेस नं.७६२०/२०२६
चौ.ता. ३०/०७/२०२६ — दिनांक : १६/०६/२०२६

**अर्जदार :** अनिस खान नजाकत खान रा. दहीहांडा, वार्ड नं. ३, अकोला. ता. जि अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : आशाबी खान नजाकत
**पत्ता :-** रा. दहीहांडा, वार्ड नं. ३, अकोला. ता. जि अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत आशाबी खान नजाकत यांचे दि. ०२/१०/२०२४ रोजी राहते घरी दहीहांडा, ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९३३/२०२६ — प्रोसेस नं.७९५९/२०२६
चौ.ता. ०५/०८/२०२६ — दिनांक : २४/०६/२०२६

**अर्जदार :** १. प्रमिलाबाई ईश्वरसिंग मालिये रा. कब्रस्तान जवळ, जुना वाशिम नाका, अंबिका नगर, अकोला. ता. जि. अकोला. २. राजेश ईश्वरसिंग मालिये रा. कब्रस्तान जवळ, अंबिका नगर, जुना वाशिम नाका, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ९९२११९५८०० ३. विनोद ईश्वरसिंग मालिये रा. वाशिम बायपास रोड, अंबिका नगर, जुने शहर, अकोला ग्रामीण, अकोला शहर, ता. जि. अकोला. ४. जियालाल ईश्वरसिंग मालिये रा. कब्रस्तान जवळ, अंबिका नगर, जुना वाशिम नाका, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : ईश्वरसिंग गंगाराम मालिये
**पत्ता :-** रा. कब्रस्तान जवळ, जुना वाशिम नाका, अंबिका नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत ईश्वरसिंग गंगाराम मालिये यांचे दि. ०८/०७/२०२२ रोजी अंबिका नगर, बायपास, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २०४**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# गोवंश तस्करांचा सिनेस्टाईल पाठलाग; दोन तस्कर फरार

## १७ जनावरांचे प्राण वाचवण्यात पोलिसांना यश

**अमरावती/प्रतिनिधीः-** पहाटेच्या अंधारात गोवंशांनी भरलेल्या वाहनांमधून सुरू असलेल्या तस्करीचा डाव मंगरूळ दस्तगीर पोलिसांनी उधळून लावला. गोरक्षकांकडून मिळालेल्या अचूक माहितीच्या आधारे पोलिसांनी विटाळा मार्गावर सापळा रचत तस्करांचा सिनेस्टाईल पाठलाग केला. या धडक कारवाईत १७ गोवंशांना जीवदान मिळाले, तर भीषण अपघातात दोन गोवंशांचा मृत्यू झाला. पोलिसांनी सुमारे २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून दोन तस्कर अंधाराचा फायदा घेत पसार झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ३० जून रोजी पहाटे सुमारे ३ वाजताच्या सुमारास एमएच ४० बीडी ५६८६ आणि एमएच ४९ बीझेड ५६७१ क्रमांकाची दोन संशयित चारचाकी वाहने विटाळा मार्गे वेगाने जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गजानन डवरे आणि त्यांच्या पथकाने नाकाबंदी करून वाहनांना थांबविण्याचा प्रयत्न केला.

मात्र, पोलिसांचा इशारा धुडकावून तस्करांनी वाहनांचा वेग वाढवत पळ काढला. पोलिसांनी पाठलाग सुरू केल्यानंतर अरुंद रस्त्यावरून भरधाव वेगाने धावणाऱ्या एका वाहनाने प्रवीण चौधरी यांच्या उभ्या असलेल्या एमएच २७ डीटी ०८०५ क्रमांकाच्या वाहनाला जोरदार धडक दिली. तर दुसरे वाहन नियंत्रण सुटल्याने थेट डॉ. महल्ले यांच्या घरासमोरील सज्जा तोडून विजेच्या खांबावर आदळले. अपघातानंतर वाहनांची तपासणी केली असता आतमध्ये गोवंशांची अमानुष कोंडी करण्यात आल्याचे आढळून आले. जनावरांचे पाय आणि तोंड दोरीने घट्ट बांधण्यात आले होते. पहिल्या वाहनातील ९ गोवंशांपैकी एक आणि दुसऱ्या वाहनातील १० गोवंशांपैकी एक अशा दोन गोवंशांचा जागीच मृत्यू झाला. उर्वरित १७ गोवंश गंभीर अवस्थेत आढळून आले. घटनेनंतर पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना तातडीने पाचारण करण्यात आले. जखमी जनावरांवर उपचार करून त्यांना धामणगाव रेल्वे येथील गोरक्षण संस्थेच्या ताब्यात देण्यात आले. या कारवाईत गोवंशांसह वाहनांचा मिळून सुमारे २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दरम्यान, अपघातानंतर दोन्ही वाहनांतील तस्करांनी अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पळ काढला. फरार आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कार्यरत आहेत. या संपूर्ण कारवाईमुळे गोवंश तस्करीच्या अवैध साखळीला मोठा धक्का बसला असून मंगरूळ दस्तगीर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद निवृत्ती आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# ग्रामीण पोलीस दलात मोठा प्रशासकीय फेरबदल

## १७ पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांचे आदेश -पीआय अशोक लांडे यांच्यांवर एलसीबीची धुरा

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती ग्रामीण पोलीस दलात प्रशासनाने मोठा फेरबदल करत १७ पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी जिल्हा आस्थापना मंडळाच्या शिफारशीनुसार हा निर्णय घेतला असून संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ नव्या ठिकाणी रुजू होण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या बदल्यांमुळे जिल्ह्यातील अनेक महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांमध्ये नवीन नेतृत्वाची नियुक्ती होणार आहे. विशेष म्हणजे सायबर शाखेतील अशोक नारायणराव लांडे यांच्याकडे स्थानिक गुन्हे शाखेची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

ग्रामीण पोलीस दलातील कामकाज अधिक प्रभावी करणे, कायदा व सुव्यवस्था बळकट करणे तसेच प्रशासकीय समतोल राखणे या उद्देशाने हा फेरबदल करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. अचानक जाहीर झालेल्या या बदल्यांमुळे पोलीस वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. आदेशानुसार आनंद कवडुजी पिदुरकर यांची पोलीस कल्याण शाखेतून नांदगाव खंडेश्वर येथे बदली करण्यात आली आहे. अवतारसिंग ठाकुरसिंग चव्हाण यांची धारणीहून अचलपूर येथे नियुक्ती करण्यात आली आहे. चांदूर रेल्वेचे पोलीस निरीक्षक अजय श्रावण आखरे यांना परतवाडा येथे तर परतवाड्याचे सुरेश रामेश्वर म्हस्के यांना चांदूर रेल्वे येथे जबाबदारी देण्यात आली आहे. जिल्हा विशेष शाखेतील आधारसिंग सरदारसिंग सोनोने यांच्याकडे चांदूर बाजार पोलीस ठाण्याची धुरा सोपविण्यात आली असून चांदूर बाजारचे अशोक तुकाराम जाधव यांची वरूड येथे नियुक्ती करण्यात आली आहे. गौतम प्रभुजी इंगळे यांची सरमसपुरा येथे तर गजानन काशिनाथ मेहेत्रे यांची अचलपूरहून दत्तापूर येथे बदली करण्यात आली आहे. आर्थिक गुन्हे शाखेतील अजित तोताराम राठोड यांना दर्यापूर येथे पाठविण्यात आले असून नियंत्रण कक्षातील शेषराव लक्ष्मणराव नितनवरे धारणी येथे कार्यभार स्वीकारणार आहेत. सायबर शाखेतील अशोक नारायणराव लांडे यांच्याकडे स्थानिक गुन्हे शाखेची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तर सतीश ओंकारराव पाटील यांची जिल्हा विशेष शाखेत नियुक्ती करण्यात आली आहे.

## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्कः**
**९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९**

महाराष्ट्र शासन
कार्यालय कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर

ई-मेल पत्ता :- achalpur.ee@,mahapwd.gov.in

दुरध्वनी /फॅक्स क्रमांक - :- ०७२२३-२२०२६०

**ई-निविदा सुचना क्रमांक-०८/निली/२०२६-२७/दि.२५/०६/२०२६**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर दूरध्वनी क्रमांक ०७२२३ २२०२६० हे राज्यपाल, महाराष्ट्र शासन ह्यांच्या वतीने खालील कामांचे ब-१ नमुन्यातील ऑनलाईन निविदा सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागवित आहे. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकारी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १ | **Request for Proposel (RFP) for Selection of the consultant for prepartion of Detailed Project Report & Providing assistance in land acquisition proceeding and related activities for Achalpur Ring Road SH-306, Taluka: Achalpur District :Amravati** | २६९७८०४७.०० |
| २ | निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी | दि.०१/०७/२०२६@ १०.०० वाजता ते ०८/०७/२०२६ @१७.०० वाजता |
| ३ | निविदा पुर्व बैठक स्थळ, दिनांक व वेळ | निरंक |
| ४ | निविदाकारांनी ऑनलाईन निविदा तयार करण्यासाठी व सादर करण्याचा (तांत्रिक व आर्थिक निविदा ) अंतिम दिनांक व वेळ | दि.०१/०७/२०२६@ १०.०० वाजता ते ०८/०७/२०२६ @१७.०० वाजता |
| ५ | तांत्रिक व आर्थिक निविदा उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर यांचे कार्यालयात दि. १०/०७/२०२६ @ १७.०० वाजतानंतर ऑनलाईन उघडण्यात येतील. (शक्य झाल्यास) |

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) http://mahapwd.gov.in
२) https://mahatenders.gov.in
(सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर कार्यालयातील सूचना फलक

दूरध्वनी क्र. ०७२२३२२०२६०
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर
जावक क्रमांक :- २५३६/निली/२०२५-२०२६/दि.२५/०६/२०२६

सही/-
(प्रमोद बा.वानखडे)
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर**

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.३८३/२०२६ ने.ता.०६.०८.२०२६

**अर्जदार -** १. राजेश मधुकरराव वानखडे, वय ४३ वर्षे, धंदा - खाजगी नोकरी
२. पंकज मधुकरराव वानखडे, वय ४२ वर्षे, धंदा - खाजगी नोकरी
दोघेही रा.पोरगव्हाण, ता.मोर्शी, जि.अमरावती
ह.मु.अमरावती, ता.जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार नं.१ व २ यांचे वडील **नामे मधुकर वामनराव वानखडे** हे दि.**२९.०५.२०१३** रोजी पोरगव्हाण, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार नं.१ व २ यांचे आई **नामे पुष्पा मधुकरराव वानखडे** हे दि.**०९.०२.२०२६** रोजी अमरावती, ता. जि.अमरावती येथे मयत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २४.०६.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११८९/२०२६
**प्रकाश व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०४.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Prakash Jiwatram Bajaj,Age 63 Yrs. Occu.: Business R/o Kanwar Nagar, Near Shiv Mandir, Rukhmini Nagar,Amt.
2. Baldev Jiwatram Bajaj, Age 68 Yrs. Occu.: Business
3. Manjiri Mukund Kolwadkar, Age 48 Yrs. Occu.: R/o Flat No.402, Ganpati Heights Avani Vihar Road, Deldal Seoni Daldal Seoni Raipur.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **जिवंतराव धर्मदास बजाज आणि सत्यवती जीवतराम बजाज** हे अनुकमे दिनांक 06.05.2024 व 24.04.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **प्रकाश व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रकाश व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०५६/२०२६
**श्री.पंकज अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०८.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Pankaj Sudhakarrao Deshpande,Age 52 Yrs. Occu.: Business R/o Ganesh Colony, Infront of Prajapita Brhamakumari, Amt.
2. Abhijeet Sudhakarrao Deshpande, Age 50 Yrs. Occu.: Labour
3. Manjiri Mukund Kolwadkar, Age 48 Yrs. Occu.: Both R/o Near Ashirwad Mangal Karyalaya, Reserve Police Line, Amravati. Tq. Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सुधाकर गुणवंतराव देशपांडे** हे दिनांक 02.09.2004 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. मयत **सुनंदा सुधाकरराव देशपांडे** ही **१७.०३.२०२१** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाली. अर्जदार **पंकज अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पंकज अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.३८२/२०२६ ने.ता.०६.०८.२०२६

**अर्जदार -** १. ममता निळकंठ काळे, वय ५५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.वडगांव रोड आळंदी, ता.खेड, जि.पुणे
२. सविता महेश दळवी, वय ५३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.बॉम्बे हाऊसिंग कॉलनी, ब्लॉक नं.३६ ते ५२ नुतन मिलजवळ सरसापूर अहमदाबाद
३. सरला दिपक गतफणे, वय ६० वर्षे, धंदा - घरकाम
रा.कोळविहीर, ता.मोर्शी, जि.अमरावती
३अ) निकीता स्वप्नील जवंजाळ, वय २५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.शाहू नगर पिंपरी चिंचवड, ता.हवेली, जि.पुणे
३ब) स्नेहल अभिषेक मोरे, वय २३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार नं.१ व २ यांचे वडील तर अर्जदार नं.३ चे सासरे व अर्जदार नं.३अ व ३ब चे आजोबा **नामे रघुनाथ बापुरावजी गतफणे** हे दि.**१६.११.२०१८** रोजी कोळविहीर, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार नं.१ व २ यांचे आई तर अर्जदार नं.३ ची सासू व अर्जदार नं.३अ व ३ब ची आजी **नामे हिराबाई रघुनाथराव गतफणे** हे दि.**२१.१२.२०२१** रोजी कोळविहीर, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २४.०६.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२५३/२०२६
**नजीराबाई व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१३.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Najirabi Wd/o Abdul Rashid,Age 55 Yrs. Occu.: Household R/o House No.85, Musalman Pura, Islami Chowk, New Town Badnera, Tq. dist. Amravati
2. Shaikh Akeel Abdul Rashid, Age 33 Yrs. Occu.: Labour
3. Sultana Parveen Abdul Rasheed, Age 26 Yrs. Occu.: Household Appli.No.1 & 2 Both R/o Behind Dargah Islami Chowk Old town Badnera Amdapur, Tq.Dist.Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अब्दुल रशिद शेख कालू** हे दिनांक 23.10.2020 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **नजिराबी व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **नजिराबी व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अमरावती यांचे कार्यालय**
**जन्म/मृत्यू बाबत जाहीरनामा रा.मा.क./एम.आर.सी.८१/अमरावती/२१४/२०२५-२६**

**अर्जदार : श्री.नैतिक अरुण डवरे,**
**रा.कापुसतळणी, ता.जि.अमरावती**

-- **विरध्द** --

**गैरअर्जदार : निबंधक जन्म/मृत्यू, आरोग्य विभाग, महानगरपालिका, अमरावती ता.जि.अमरावती**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, अर्जदार हे वरील पत्त्यावर कायम रहिवासी आहेत. अर्जदार **श्री.नैतिक अरुण डवरे,** रा.कापुसतळणी, ता.जि.अमरावती यांच्या जन्माची दिनांक ०५.०१.२०११ रोजी पंजाबराव देशमुख हॉस्पीटल, अमरावती, ता.जि.अमरावती येथे झाला. निबंधक जन्म-मृत्यू आरोग्य विभाग, महानगरपालिका, अमरावती येथे जन्माची नोंद घेतली नाही. अर्जदाराला उपरोक्त जन्म प्रमाणपत्राची गरज असल्यामुळे जन्माची नोंद महानगरपालिका अधिनियम १९६९ मधील कलम १३(३) व त्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम ९(३) नुसार जन्माच्या नोदणीचा आदेश होण्याबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास सदर कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अमरावती येथील दाखल अर्जातील श्री.नैतिक अरुण डवरे, रा.कापुसतळणी, ता.जि.अमरावती यांच्या जन्माची दिनांक ०५.०१.२०११ रोजी पंजाबराव देशमुख हॉस्पीटल, अमरावती, येथे झाला. त्यांच्या जन्माच्या दिनांकास किंवा त्याबाबत हरकत असल्यास ता.१५.०७.२०२६ पर्यंत स्वतः किंवा आपल्या वकीलामार्फत येऊन हरकत न घेतल्यास सदरहू अर्जदार यांची साक्ष घेऊन जन्माची नोद सदर कार्यालयात घेण्याचा आदेश किंवा तसे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ३०.०६.२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

अमरावती
दिनांक ३०.०६.२०२६

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर)
अमरावती

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.३८८/२०२६ ने.ता.११.०८.२०२६

**अर्जदार -** १. सौ.मंदा रामप्रभू तायडे,
वय ४८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.कवठाळ, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार यांचे वडील **नामे सुखदेव आकाराम खंडारे** हे दि.**२९.०८.२०१३** रोजी डिस्ट्रीक्ट जनरल हॉस्पीटल, अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार योची आई **नामे चंद्रकला सुखदेव खंडारे** हे दि.**०९.०४.२०२६** रोजी कवठाळ, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २५.०६.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

प्रो.क्र.५६६/२०२६

**वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस**
**विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्रमांक १९९/२०२६ ने.ता.३०.०७.२०२६

**अर्जदार :** 1. Sachin Arunkumar Shah, Age 47 Yrs. Occu.: Business
2. Swapnil Arunkumar Shah, Age 45 Yrs. Occu.: Business Both R/o Kholapur, Tq. Bhatkuli, Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदारः** निरंक

ज्यापेक्षा **Jaya Arun Shah** हे दि.**१९.०२.२०१७** रोजी मयत झाले. अर्जदार Sachin Arunkumar Shah, Age 47 Yrs. Occu.: Business, R/o Kholapur, Tq. Bhatkuli, Dist. Amravati व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २** प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.**१७.०६.२०२६** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **Jaya Arun Shah** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **Jaya Arun Shah** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक **१९.०६.२०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
भातकुली

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२४९/२०२६
**चंदा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१३.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Chanda Shridharrao Ingole,Age 60 Yrs. Occu.: Household R/o Near Pathyapustak Mandal, Shrikrushna Nagar,VMV, Amt.
2. Dhiraj Shridharrao Ingole, Age 40 Yrs. Occu.: Business R/o Hanuman Nagar, Tapovan Area Camp, Amrvati.
3. Pankaj Shridharrao Ingole, Age 36 Yrs. Occu.: Business R/o Back side of VMV College, Ganesh Peth, Pravin Nagar, Amravati
4. Vishakha Shridharrao Ingole, Age 34 Yrs. Occu.: Household R/o Near Pathyapustak Mandal, Shrikrushna Nagar,VMV, Amt.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **श्रीधरराव विठ्ठलराव इंगोले** हे दिनांक 05.04.2026 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **चंदा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **चंदा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## -सायटेशन/जाहीरनामा-

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.३८९/२०२६ ने.ता.११.०८.२०२६

**अर्जदार -** १. **श्रीमती मिना शंकरसिंग सोळंके,** वय ७३ वर्षे, धंदा - घरकाम
२. **श्री प्रदिप शंकरसिंग सोळंके,** वय ५८ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.गोराळा, पो.मंगरुळ भिलापूर, ता.मोर्शी, जि.अकोला
३. **सौ.विजया प्रशांतसिंग कचवे,** वय ५४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.नरहरी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
४. **सौ.उज्वला सुनिलसिंह चौहाण,** वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.मुदलियार नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
५. **श्री राजकुमार शंकरसिंग सोळंके,** वय ५० वर्षे, धंदा - शेती
रा.एकनाथ विहार,रुख्मीणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

**-गैरअर्जदार-**
१) **श्रीमती दिपमाला संदिप सोळंके,** वय ३७ वर्षे, धंदा - घरकाम
२) **कु.देवश्री संदिप सोळंके,** वय १७ वर्षे, धंदा - शिक्षण
३) **कु.मौलिका संदिप सोळंके,** वय १४ वर्षे, धंदा - शिक्षण
अर्जदार नं.२ व ३ करिता अ.पा.क. आई गैरअर्जदार नं.१
तिघीही रा.कुबेरेश्वर मॅचिंग सेटर, महालक्ष्मी जनरल ॲन्ड गिफ्ट सेंटरजवळ गुरुकृपा कॉलनी, शंकर नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-(८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ४ चे वडील तसेच गैरअर्जदार नं. १ चे सासरे तर गैरअर्जदार नं.२ व ३ चे **आजोबा नामे शंकरसिंह सदाशिवसिंह सोळंके** हे **दिनांक ३०/०७/२००७** रोजी गोराळा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मय्यत झालेले आहे.त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस अर्जदार व गैरअर्जदार हे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदार व गैरअर्जदाराशिवाय ईतर कोणतेही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २९.०६.२०२६

शिक्का

आदेशान्वये,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.३८७/२०२६ ने.ता.१०.०८.२०२६

**अर्जदार -** १. श्रीमती रंगु मोतीरामजी शिंदे, वय ७५ वर्षे, धंदा - घरकाम
२. श्री.मनोहर मोतीरामजी शिंदे, वय ४२ वर्षे, धंदा - मजुरी
३. कमलाबाई किसनराव पवार, वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम
४. पंचफुला सुरेश पवार, वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम
सर्व रा.खोपडा, ता.मोर्शी, जि.अमरावती
५. **पंडीत मोतीरामजी शिंदे मयतांचे वारस**
५अ) श्रीमती शालू पंडीत शिंदे, वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम
५ब) राहुल पंडीत शिंदे, वय २५ वर्षे, धंदा - मजुरी
५क) मिना पंडीत शिंदे, वय ३२ वर्षे, धंदा - घरकाम
सर्व रा.खोपडा, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील तर अर्जदार नं.५अ चे सासरे तर अर्जदार नं.५ब, ५क चे आजोबा **नामे मोतीराम बालाजी शिंदे** हे दि.**२२.०१.२०२२** रोजी शिवण खुर्द, ता.मुर्तिजापूर जि.अकोली येथे मयत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २५.०६.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की, माझे पक्षकार **श्री.अक्षय प्रशांत मालखेडे व अर्पित प्रशांत मालखेडे** यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन कळविण्यात येते, खालील वर्णन केलेल्या मालमत्तेमध्ये माझे पक्षकाराचा वडिलोपार्जित हिस्सा आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मालमत्तेचे वर्णन** - मौजे धानोरा म्हाली, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथील शेत भूमापन क्र./उपविभाग क्र.८१ एकुण क्षेत्रफळ ५ हे.६७ आर (पो.ख.क्षेत्र ०.०८.००) मधील **श्रीकृष्ण रामचंद्र मालखेडे** यांच्या नावे असलेली २ हे.३५ आर शेतजमीन आकार रुपये ६.२३ त्यात असलेल्या झाडाझुडपासह

तरी सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, सदरहू मालमत्तेची शेतजमिनीची तसेच इतर वडिलोपार्जित मालमत्तेची **श्रीकृष्ण रामचंद्र मालखेडे** यांनी विक्री करण्याचा प्रयत्न केल्यास तो माझ्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही. करीता वरील संबंधाने कोणीही या शेतासंबंधी व्यवहार करु नये. केल्यास ते माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. तसेच त्यानंतर होणाऱ्या प रिणामांची व नुकसानीची सर्वस्वी जबाबदारी त्यांची राहील.

सबब ही जाहीर नोटीस.

दिनांक ०१.०७.२०२६

(ॲड.योगेश्वरी मनोहर चुके)
शारदा विहार, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२०३/२०२६
**संतोष व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.११.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Santosh Dinkar Navsalkar,Age 60 Yrs. Occu.: Retired
2. Anand Dinkar Navsalkar, Age 55 Yrs. Occu.: Business Both R/o Vinod State Bank Colony, Amravati. Tq.Dist. Amrvati.
3. Rekha Vinayak Pathak, Age 63 Yrs. Occu.: Household R/o Plot No.4, Near Lahane Hall, Keshav Nagar, Akola
4. Nilima Anant Aadhe,, Age 57 Yrs. Occu.: Household R/o A11-1/4 Behind Amord City, Garkheda Parisar Garkheda Aurangabad.
5. Seema Shashank Sarnaik, Age 53 Yrs. Occu.: Household R/o Moti Nagar Road, Ram Nagar, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **आशा दिनकर नवसलकर** हे दिनांक 25.01.2026 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **संतोष व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **संतोष व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२५.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज ॲंड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २९४**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# पीकेव्ही कृषी संकुलासह अमरावतीच्या विकासासाठी

# कोट्यवधींच्या निधीची विधानसभेत मागणी - आ. सुलभा खोडके

**अमरावती/का.प्र.**

राज्यविधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये सन २०२६-२७ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करतांना अमरावतीच्या आ.सुलभा खोडके यांनी अमरावती जिल्ह्याचा गतिमान विकास व बळकटीकरणासाठी आवश्यक यंत्रणांना अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने कोट्यवधींच्या निधीची पुरवणी मागणी केली.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मार्गावर असलेल्या डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या (पीकेव्ही) मोक्याच्या १५२ एकर जागेवर 'अमरावती विभागीय कृषी संकुल' उभारण्यासाठी मंत्रालयात आधीच ठराव मंजूर झाला असून, कृषिमंत्री दत्तात्रय मामा भरणे यांनी देखील या ७० कोटींचे विभागीय कृषी संकुलाच्या प्रकल्पाला हिरवी झेंडी दिली आहे.हे संकुल अमरावती विभागातील सर्व शेतकऱ्यांच्या सोयीच्या दृष्टीने सुद्धा महत्वाचे व लाभदायी ठरणार असल्याने संकुल' उभारण्यासाठी ७० कोटींची पुरवणी मागणी मंजूर करण्याची विनंती शासनाला केली आहे.

आरोग्य विभागाच्या पुरवणी मागणीवर जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन ) येथील सद्यास्थितीत एका बेड वर दोन किंवा तीन रुग्ण अशी परिस्थिती असून कधी -कधी तर रुग्णांना खाली टाकून उपचार करावे लागत आहे. याबाबत सुद्धा इर्विन रुग्णालय येथे ७०० खाटांची नवीन इमारत साकारण्यासाठी निधी देण्याची तसेच जिल्हा



सामान्य रुग्णालयातील आयसीयु कक्षात २० बेडची व्यवस्था कमी पडत असल्याने अतिरिक्त आयसीयू बेडची क्षमता वाढविण्यात यावी , डॉक्टरांची रिक्त पदे भरण्यात यावी, नवीन अद्यावत यंत्रसामुग्री सुद्धा उपलब्ध करून देण्यासाठी निधी द्यावा अशी मागणी करण्यात आली.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अमरावती शहरात १०० खाटांचे माता-बाल संगोपन केंद्र (एम.सी.एच. विंग) मंजूर आहे. अमरावती जिल्हा व परिसरातील गरजू माता, गरोदर महिला आणि नवजात बालकांना आरोग्याच्या अत्यंत आवश्यक तातडीच्या सेवा- सुविधा विना विलंब माता-बाल संगोपन केंद्राचे बांधकाम तातडीने सुरु करण्यासाठी ३३ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात यावा, तसेच जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन ) येथे ४०० खाटांच्या नवीन हॉस्पिटलमध्ये डॉक्टर व स्टाफ नर्स ची पदे मंजूर करून पदे भरण्यात यावी अशी मागणी केली आहे. अमरावती येथे ५० खाटांचे जिल्हास्तरीय आयुष दवाखाना मंजूर करण्यात आला.मात्र जिल्हातील नागरिकांचा आयुर्वेदिक उपचार चिकित्साकडे वाढता ओघ लक्षात घेता.५० खाटांची क्षमता ही वाढवून १०० खाटांचे करण्यात यावे.सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अमरावती येथे मानधनावर सेवा देणारे अतिविशिष्ठ डॉक्टरांचे थकीत वेतन सुद्धा अदा करण्याची मागणी अधिवेशनातून करण्यात आली.

### पशुचिकित्सालय बांधकामासाठी २० कोटींची मागणी

अमरावती जिल्ह्यातील सर्व १४ तालुक्यांमध्ये पशुचिकित्सालय बांधण्यात आले. मात्र त्याची अत्यंत दयनीय अवस्था निर्माण झाली असून जीर्ण झाल्याने त्या पशुचिकित्सालयात जनावरांना आणणे गैरसोयीचे झाले आहे. म्हणून पशुधन वाचविण्यासाठी जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील पशुचिकित्सालय बांधकामासाठी २० कोटींच्या निधीची आवश्यकता आहे.तसेच अमरावती जिल्ह्यातील प्रादेशिक पशु संवर्धन विभागात सहाय्यक आयुक्त, पशू वैद्यकीय अधिकारी,पशूधन अधिकारी अशा संवर्गातील यांची जवळपास ५० टक्के हुन अधिक पदे रिक्त आहेत. पशूधन वाचवायचे असेल किंवा रोगापासून थांबवायचे असेल तर पशुचिकित्सालयातील अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यात यावी. पशुचिकित्सालयात एक्स-रे मशीन व सोनोग्राफी मशीन सुद्धा उपलब्ध करणे आवश्यक असल्याचा मुद्दा आ.सुलभा खोडके यांनी विधानसभेत चर्चेदरम्यान उपस्थित केला.

# 'राज्यमाता गोमाता संवाद यात्रा'

## आज अमरावतीत समारोप

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र गोसेवा आयोग आणि पशुसंवर्धन विभागातर्फे २२ जूनपासून संपूर्ण राज्यभरात 'राज्यमाता गोमाता संवाद यात्रा' सुरू करण्यात आली आहे. या संवाद यात्रेचा अमरावती जिल्हास्तरीय कार्यक्रम येत्या २ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता शेगाव नाका येथील 'अभियंता भवन' येथे आयोजित करण्यात आला आहे.

सलग १५ दिवस चालणाऱ्या या यात्रेत सुमारे ६ हजार किलोमीटरचा प्रवास केला जाणार असून, राज्यातील ३५ जिल्ह्यांमध्ये याचे संचलन होणार आहे.

या यात्रेत राज्यातील हजारहून अधिक गोशाळा प्रत्यक्ष सहभागी होणार आहेत. या संपूर्ण प्रवासात १५ हजारांपेक्षा जास्त गोशाळा संचालक, गोरक्षक, गोपालक आणि शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून विविध विषयांवर महत्त्वपूर्ण चर्चा केली जाईल.

रासायनिक शेतीला सक्षम पर्याय म्हणून देशी गायीच्या शेणावर आधारित नैसर्गिक व सेंद्रिय शेतीला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देणे हा या यात्रेचा मुख्य उद्देश आहे. राज्यातील गोशाळा केवळ देणग्यांवर अवलंबून न राहता स्वतःच्या पायावर कशा उभ्या राहू शकतील, याचे मार्गदर्शन याद्वारे केले जाईल.

यासोबतच शेण आणि गोमूत्रापासून तयार होणाऱ्या विविध मूल्यवर्धित उत्पादनांविषयी (सेंद्रिय खते, औषधे आणि दैनंदिन वापराच्या वस्तू) समाजात जनजागृती केली जाणार आहे. पशुसंवर्धन विभाग आणि गोसेवा आयोगाच्या विविध गोपालन योजनांची माहिती तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे, गोशाळा संचालकांच्या आढावा बैठका घेणे आणि पशुसंवर्धन विभाग व गोशाळांमध्ये उत्तम समन्वय साधणे यासाठी ही यात्रा कार्यरत आहे.

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून गोवंशाचे रक्षण करण्यासाठी पोलीस प्रशासन व स्थानिक गोरक्षकांमध्ये सलोख्याचा समन्वय साधणे, संपूर्ण गोवंश हत्याबंदी कायद्याच्या कायदेशीर बाबींविषयी समाजाला अवगत करणे, आणि स्थानिक देशी गोवंशाच्या संगोपनासंदर्भात वैज्ञानिक व पारंपरिक पद्धतींची माहिती देणे या प्रमुख वैशिष्ट्यांसह या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील सर्व गोसेवक, गोरक्षक, शेतकरी, पशुपालक आणि गोशाळा संचालकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बँकांनी शासकीय योजनांसाठी प्राधान्याने कर्जपुरवठा करावा

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील स्वयंरोजगाराचे प्रमाण वाढविण्यासाठी शासना तर्फे प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम राबविले जातात. यासाठी बँकांकडे कृषी, जिल्हा उद्योग केंद्रांकडून प्रस्ताव सादर करण्यात येतात. या प्रस्तावांची तातडीने छाननी करून बँकांनी शासकीय योजनांसाठी प्राधान्याने कर्ज पुरवठा करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हा नियोजन सभागृहात आज जिल्हास्तरीय समन्वय समिती सभा पार पडली. यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक नरेश हेडाऊ, जिल्हा उद्योग अधिकारी निलेश निकम, कृषी उपसंचालक वरूण देशमुख आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी येरेकर यांनी, गेल्या वर्षातील ४१९ प्रकरणी अद्यापही कर्ज वितरीत झालेले



### जिल्हाधिकारी आशिष येरेकर

नाही. या प्रस्तावांची तातडीने छाननी करावी, तसेच निर्णय घेऊन कर्ज वितरणाची प्रक्रिया करण्यात यावी. यात आवश्यकता असल्यास संबंधितांचे प्रशिक्षण पूर्ण करावेत. गेल्या वर्षात या योजनांसाठी चांगल्या प्रकारे पतपुरवठा करण्यात आला आहे. यावर्षीही पाठपुरावा करून कर्ज प्रक्रिया करावी. जुने प्रस्ताव करीत असताना नवीन प्रस्तावाही स्विकारण्यात यावे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कृषी कर्जाचे वाटप कमी प्रमाणात झालेले आहे. त्यामुळे बँकांनी सजग होऊन याकामी मनुष्यबळ नेमून कर्ज वितरणाची गती वाढवावी. राज्य शासनाच्या कर्जमाफीनंतर कर्ज मागणाऱ्यांची संख्या वाढणार असल्याने बँकांनी यासाठी नियोजन करावे.

यावर्षी अल-निनोचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे समस्या येऊ शकतात. त्याचा सामना बँकांना करावा लागू नये, याची काळजी घ्यावी. येत्या १५ दिवसानंतर पुन्हा या प्रकरणांचा आढावा घेण्यात येणार असल्याने बँकांनी कर्जप्रक्रिया जलद करावी, असे आवाहन केले.

# मनपा शाळांचा पहिला दिवस उत्साहात

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी, महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. शाळांमधील शैक्षणिक वातावरण, विद्यार्थ्यांची उपस्थिती, मूलभूत सुविधा, अध्यापनाची तयारी तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांनी शहरातील विविध महानगरपालिका शाळांना नियोजनबद्ध भेटी दिल्या.

या विशेष उपक्रमात जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मनपा आयुक्त वर्षा लड्डा, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक संचालक नगर रचना अधिकारी सागर वानखडे, मुख्यलेखाधिकारी श्यामसुंदर देव, शहर अभियंता रविंद्र पवार, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भूषण पुसतकर, नितीन बोबडे, धनंजय शिंदे, विवेक देशमुख, उपअभियंते आशिष अवसरे, सुहास चव्हाण, श्रीरंग तायडे, एस. एस. टोपरे, सहायक



अभियंता राजेश आगरकर, शाखा अभियंता एस. एस. तिनखेडे, ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ.विजय शिंदे व डॉ.विकास गावंडे, अधिव्याख्याता डॉ. दिपक चांदूरे, वर्षा मोरे, शाळा निरीक्षक वहीद खान व मो. जावेद, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी पंकजकुमार सपकाळ, केंद्र समन्वयक नासीर हुसेन व मो. इमरान नबी, विषय साधनव्यक्ती काजी निजामुद्दीन, संजय बेलसरे, शुभांगी सुने, सुषमा दुधे व योगेश राणे यांनी विविध शाळांमध्ये भेटी देऊन शैक्षणिक कामकाजाची पाहणी केली.

तसेच लोकप्रतिनिधींकडूनही मोठ्या उत्साहात शाळा भेटी घेण्यात आल्या. महापौर श्रीचंद तेजवानी, खासदार डॉ. अनिल बोंडे, आ.रवि राणा, उपमहापौर भेंडे, सभागृह नेता चेतन गावंडे, विरोधी पक्षनेता विलास इंगोले, गटनेता नाना आमले, शेख हमीद शेख वाहेद, डॉ. राजेंद्र तायडे, झोन सभापती माधुरी ठाकरे, स्वाती कुलकर्णी, इस्माईल कासम लालुवाले, किशोर जाधव, शिक्षण समिती सभापती ॲड.प्रीती रेवणे, उपसभापती वंदना मडघे, शहर सुधार समिती सभापती राधा कुरील, उपसभापती सुमती ढोके, सभापती ममता आवारे, उपसभापती लता देशमुख, विधी समिती सभापती नेहा लुल्ला, उपसभापती डॉ. मधुरा काहाळे,यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील महानगरपालिका शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात प्रशासन, लोकप्रतिनिधी, शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून प्रेरणादायी वातावरणात झाली असून, महानगरपालिका शाळांना अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थी-केंद्रित बनविण्याचा संकल्प यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित करण्यात आला.

MAHATRANSCO

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (SRM e-Tender) from registered agencies on MSETCL's e-Tendering website. For further details please visit our website: **https://srmetender.mahatransco.in**

| Sr. No. | Tender No. & Description of Work |
|---|---|
| 1 | **Work of Supply, Installation, Testing and commissioning of Advanced ESE type LCAT system at various EHV Sub Stations under EHV (O&M) Circle, Akola. (2nd Call) RFX No. 7000040556 Tender No.: MSETCL/SE/EHV/O&M/CRL/AKL/Tech/2026-27/ T-07-LCAT Estimated Cost = Limited to Rs. 1,85,18,309.00/-** |

| Publicity period of tender | Tender Available at |
|---|---|
| Start Date:- From:- 02/07/2026 @ 00:00 Hrs onwards | https://srmetender.mahatransco.in |
| Submission Deadline : - | Tender Opening Date : - |
| 11/07/2026 @ up to 23:59 Hrs. | Technical Bid: Date : 12/07/2026, 11:00 Hrs, if possible.<br>Price Bid: Date : 12/07/2026, 12:00 Hrs, if possible. |

**Contact Person:** The Dy. Executive Engineer, EHV O&M Circle, AKOLA.
**Contact No.: 8554989534 (Dy. Executive Engineer), e-mail id: se1200@mahatransco.in**

1. Relevant portions of the Tender which the bidders have to fill up, would be available online on above said website.
2. **EMD amount of Rs. 1,85,183.09/- and Tender Fees Rs. 5000+ GST** as applicable (per tender & non refundable) should be paid on-line only. **Payment in cash/DD will not be accepted.** Bidder can pay through credit card/Debit Card/ Net Banking. The payment confirmation will be done by the Corporate Office.
3. Tender documents can be downloaded only online from above-said website.
4. Eligible bidders shall submit their bids well in advance instead of waiting till last date. MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.
5. If the payment of tender fee and EMD by a bidder is not confirmed, then the bidder will be straight-way disqualified and his bids will not be considered for further tendering process.

**Note:** All eligible & interested bidders are mandated to get enrolled on SRM e-Tendering portal. (https://srmetender.mahatransco.in/)

Sd/-
SUPERINTENDING ENGINEER
EHV O&M CIRCLE, AKOLA

## मोर्शी तालुक्यातील विचोरी येथे अतिवृष्टी

# सोयाबीनचे पिके पाण्याखाली, तात्काळ पंचनाम्यांची मागणी

**अमरावती/का.प्र.**

अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यात येणाऱ्या विचोरी व परिसरात २९ जूनच्या संध्याकाळी आणि ३० जून रोजी दुपारी झालेल्या मुसळधार अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे नुकतीच केलेली सोयाबीनची पेरणी पूर्णपणे वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

यावर्षी पावसाचे आगमन झाल्यानंतर विचोरी परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने सोयाबीनची पेरणी केली होती. अनेक ठिकाणी पिके अंकुरली होती, तर काही ठिकाणी पेरणीची कामे सुरू होती. मात्र, २९ आणि ३० जून रोजी झालेल्या ढगफुटीसदृश अतिवृष्टीमुळे शेतांना तळ्याचे स्वरूप आले आहे. मुसळधार पावसामुळे शेतातील माती वाहून गेली असून, पेरलेले सोयाबीनचे बियाणे आणि अंकुरलेली पिके पूर्णपणे दडपली (सडून खराब झाली) आहेत. यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावले आहे.



या भागात आधीच शेतकरी आर्थिक अडचणीत असताना या अस्मानी संकटामुळे त्यांचे कंबरडे मोडले आहे. त्यामुळे स्थानिक महसूल विभागाचे तलाठी आणि कृषी अधिकारी (मंडळ अधिकारी) यांनी तात्काळ विचोरी येथील शेती पाहणी करावी, अशी मागणी जोर धरत आहे. नुकसानग्रस्त शेतांचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून शासनाने पीडित शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करावी, अशी आर्त हाक विचोरी येथील शेतकरी संजय जावरकर व इतर ग्रामस्थांनी प्रशासनाला मागणी आहे.

# संक्षिप्त

## विद्यापीठात कृषी दिन साजरा

**अमरावती -** महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, हरितक्रांतीचे प्रणेते, शेतक-यांचे कैवारी वसंतराव नाईक यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात कृषी दिन म्हणून साजरी करण्यात आली.यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन,



हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे,कुलसचिव डॉ.अविनाश असनारे, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, उपअभियंता (विद्युत) राजेश एडले, उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, अधीक्षक डॉ. धनंजय पाटील तसेच विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. संचालन व वसंतराव नाईक यांच्याबद्दल माहिती उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण यांनी दिली.

## उद्या विजया रहाटकर यांचा दौरा

**अमरावती -** राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर या शुक्रवार, ३ जुलै रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.दौऱ्या दरम्यान त्या कार्यशाळा, जनसुनावणी आणि आढावा बैठकीला उपस्थित राहणार आहेत.श्रीमती रहाटकर ह्या शुक्रवारी सकाळी १० ते ११ वाजेपर्यत जिल्हा नियोजन भवन येथे पोश ॲक्ट अधिनियम २०१३ या विषयावरील कार्यशाळेला उपस्थित राहतील.



सकाळी ११ ते १२ वाजेपर्यत अमरावती येथील श्री शिवाजी सायन्स कॉलेज येथे यशोदा एआयबाबत कार्यशाळात सहभागी होतील. दुपारी १२ ते १.३० या वेळेत जिल्ह्यातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांच्या सोबत विविध विषयावर आढावा बैठक घेतील. दुपारी १.३० ते २.३० वाजेपपर्यत जिल्हा नियोजन भवन येथे महिलाच्या तक्रारीबाबत जन सुनावणीला उपस्थित राहतील. यात कौटुंबिक हिंसाचार, लैगिक छळ अनैतिक व्यापार, महिलांचे अपहरण,आदी महिलांच्या सुरक्षिततेच्या विषयाबाबत महिलांच्या समस्या व तक्रारी स्विकारण्यात येतील. त्यानंतर दुपारी ३ ते ४.३० या वेळेत जिल्ह्यातील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसोबत महिलांच्या सुरक्षितता, संरक्षण तसेच महिला आणि महिला सक्षमीकरणाशी संबंधित विविध विषयावर आढावा बैठक घेण्यात येणार आहे. शासकीय विश्रामगृह येथे सायंकाळी ५ ते ६ दरम्यान जिल्ह्यातील लोकसभा सदस्य, विधानसभा सदस्य, विधान परिषद सदस्य यांच्यासोबत महिलांच्या विविध समस्यावर बैठक घेतील.या कार्यक्रमाला नागरीकांनी उपस्थित राहावे, तसेच समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

## जागतिक मादकद्रव्य विरोधी दिन साजरा

**अमरावती -** समाजाला, विशेषतः तरुण पिढीला अमली पदार्थांच्या घातक विळख्यातून बाहेर काढण्यासाठी आणि व्यसनाधीनतेविरुद्ध व्यापक जनजागृती करण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या वतीने जागतिक मादकद्रव्य विरोधी दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाला जिल्हा शल्य



चिकित्सक् डॉ. विनोद पवार बाह्य संपर्क अधिकारी डॉ. संदीप हेडाऊ, प्रभारी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नरेंद्र सोळंके, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अमोल गुल्हाने, डॉ. प्रेषित मढवी, डॉ. ऋषिकेश घोरपडे यांच्यासह अधिसेविका ललिता अटाळकर,श्रद्धा हरकंचे, सारा बांगड,सावली परतेती उपस्थित होते.डॉ. विनोद पवार म्हणाले, मादक द्रव्यांचे सेवन हे मानवी शरीराचा आणि आरोग्याचा पूर्णपणे नाश करते.यासोबतच मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अमोल गुल्हाने, डॉ. संदीप हेडाऊ, डॉ. नरेंद्र सोळंके आणि डॉ. प्रेषित मढवी यांनी उपस्थितांना मादक द्रव्यांच्या सेवनामुळे मध्यवर्ती मज्जासंस्थेवर होणारे परिणाम, मानसिक आजार आणि सामाजिक दुष्परिणाम याविषयी शास्त्रीय व सविस्तर माहिती दिली.या कार्यक्रमाला जिल्हा स्त्री रुग्णालय परिचर्या महाविद्यालयातील विद्यार्थिनी, रुग्णालयीन कर्मचारी तसेच रुग्ण व त्यांचे नातेवाईक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सारा बांगड यांनी, तर आभार श्रद्धा हरकंचे यांनी मानले.

## स्व.वसंतराव नाईक जयंती साजरी


**शिराळा -** येथील ग्रामपंचायत मध्ये हरित क्रांतीचे प्रणेते महाराष्ट्रचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली.सर्व प्रथम स्व.वसंतरावजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण माजी जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती मिंलिद तायडे



यांनी केले. महाराष्ट्र कृषी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या व आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य तथा माजी जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती मिंलिद तायडे, कर्मचारी मधुकर खेडकर, मोहोड रुपाली कुसटकर तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

## दादा भामोदकर कृषी विद्यालयात प्रवेशोत्सव

**टाकरखेडा संभू -** श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती द्वारा संचालित दादा भामोदकर कृषी विद्यालय, साऊर येथे शैक्षणिक सत्र २०२६-२७ चा शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून विद्यालयाचे विशेष निमंत्रित सदस्य प्रकाश बोंडे, गावचे पोलीस पाटील चंद्रशेखर बोंडे, सोनाली जामठे, विनायकरावजी इंगळे,विनोद माहोरे,सुधीर नाचणकर



तसेच रतन ठाकरे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापकजावरकर होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कैलास मोहोड यांनी केले, तर संचालन नितीन गवई यांनी प्रभावीपणे केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक आर.एस.जावरकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ शिक्षक एस.पी.देशमुख,कैलास मोहोड, बर्डे, निलेश चाफलेकर, गंधे, नितीन गवई,ए.बी.डाबेराव तसेच शिक्षकेतर कर्मचारी विजय लव्हाळे (लिपिक), प्रकाश ठाकरे,संकेत बोंडे आणि सूर्यवंशी यांनी विशेष परिश्रम घेतले.शाळा प्रवेशोत्सवानिमित्त विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांची आर्थिक कोंडी

**बेलोरा -** श्रावणबाळ, संजय गांधी व राजीव गांधी निराधार योजनेंतर्गत मिळणारे अनुदान गेल्या तीन महिन्यांपासून न मिळाल्याने ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनुदानासाठी लाभार्थी बँका, पोस्ट कार्यालये आणि ऑनलाइन केंद्रांवर वारंवार चकरा मारत आहेत.दिव्यांग लाभार्थी आशाबाई सोळंके यांना तीन महिन्यांपासून अनुदान मिळाले नसल्याने उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक औषधोपचार आणि दैनंदिन खर्चासाठी या अनुदानावर अवलंबून असल्याने गैरसोय होत आहे.रखडलेले अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करून दिलासा द्यावा, अशी मागणी केली आहे.

# गाजीपूर 'क्रशर प्रकरणा'त आता कागदपत्रांची तपासणी

## महसूल-महावितरणची दुहेरी हालचाल ; वीजजोडणीवर टांगती तलवार?

### भूमी अभिलेख विभागाकडून मोजणीचे संकेत; ब्लास्टिंग बिलांच्या तपासामुळेही चर्चांना उधाण

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला** : गाजीपूर येथील कथित बेकायदेशीर गौण खनिज उत्खनन, ४८ कोटी रुपयांच्या दंडाची कारवाई आणि त्यानंतर त्याच परिसरात नव्याने स्टोन क्रशर सुरू झाल्याच्या प्रकरणाने आता निर्णायक वळण घेतल्याची माहिती समोर येत आहे. महसूल प्रशासन, महावितरण आणि भूमी अभिलेख विभागाने या प्रकरणातील विविध बाबींची पडताळणी सुरू केल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळत आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या या प्रकरणात पुढील काही दिवसांत महत्त्वपूर्ण प्रशासकीय निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, संबंधित स्टोन क्रशरला देण्यात आलेल्या विद्युत जोडणीसंदर्भातील संपूर्ण कागदपत्रांची तपासणी महावितरणकडून सुरू करण्यात आली आहे. उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या वैधानिक परवानग्या, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची संमती, महसूल विभागाचे आवश्यक दस्तऐवज तसेच इतर अटींची पूर्तता झाली होती का, याची छाननी करण्यात येत आहे. पडताळणीत कोणतीही गंभीर त्रुटी अथवा नियमभंग आढळल्यास संबंधित क्रशरचा विद्युत पुरवठा खंडित करण्याची कारवाई केली जाऊ शकते, अशी माहिती महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून मिळाल्याचे समजते. मात्र, याबाबतची अधिकृत भूमिका अद्याप जाहीर झालेली नाही.

या प्रकरणातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे संबंधित स्टोन क्रशर प्रत्यक्षात आदिवासी जमीनधारकाच्या जमिनीवर उभारण्यात आला आहे का, याचीही प्रशासनाने गंभीर दखल घेतल्याची माहिती आहे. महसूल विभागामार्फत भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष जागेची अधिकृत मोजणी करण्याबाबत निर्देश देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे समजते. मोजणीनंतर जमिनीची हद्द, मालकी आणि उद्योगाचे वास्तविक स्थान स्पष्ट होणार असल्याने या अहवालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जर अधिकृत मोजणीत संबंधित उद्योग आदिवासी बांधवाच्या जमिनीवरच उभारण्यात आल्याचे स्पष्ट झाले आणि आवश्यक सक्षम प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेतलेली नसल्याचे निष्पन्न झाले, तर संबंधित प्रकरणात लागू असलेल्या महसूल कायद्यांनुसार पुढील कारवाईचा मार्ग मोकळा होऊ शकतो. त्यामुळे भूमी अभिलेख विभागाचा अहवाल या संपूर्ण प्रकरणातील 'टर्निंग पॉइंट' ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, या प्रकरणात आता आणखी एक धक्कादायक मुद्दा चर्चेत आला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, ज्यांच्या नावावर कोणतीही अधिकृत गौण खनिज खदान नसल्याचे सांगितले जात आहे, त्यांच्याच नावावर ब्लास्टिंगची बिले कशी तयार झाली? या प्रश्नाचीही आता चौकशी होण्याची शक्यता आहे. या संदर्भातील काही ब्लास्टिंग बिलांच्या प्रती दैनिक जनमाध्यमच्या हाती लागल्याचा दावा करण्यात येत आहे. या कागदपत्रांच्या सत्यतेची खातरजमा संबंधित यंत्रणांकडून होणे अपेक्षित असले, तरी या घडामोडींमुळे प्रकरणातील संशय अधिक गडद झाला आहे.

खनिज उत्खननाशी संबंधित नियमांनुसार ब्लास्टिंगसाठी स्वतंत्र परवानग्या, नोंदी आणि वैधानिक प्रक्रिया आवश्यक असतात. त्यामुळे संबंधित व्यक्तीच्या नावावर खदान नसल्यास ब्लास्टिंगची बिले कोणत्या आधारावर तयार झाली, ती कोणत्या कामासाठी वापरण्यात आली आणि त्या व्यवहारांची नोंद अधिकृत अभिलेखांमध्ये आहे का, याबाबत चौकशी होणे आवश्यक असल्याची चर्चा प्रशासकीय वर्तुळात सुरू आहे.

एकीकडे ४८ कोटी रुपयांच्या दंडाची कारवाई, दुसरीकडे नव्याने उभा राहिलेला स्टोन क्रशर, त्यात आता वीजजोडणीची पडताळणी, भूमापन आणि ब्लास्टिंग बिलांचा तपास अशा घडामोडींमुळे हे प्रकरण केवळ महसूल विभागापुरते मर्यादित राहिलेले नाही. विविध विभागांच्या समन्वित चौकशीची गरज अधिक तीव्रतेने पुढे येत आहे.

दरम्यान, या सर्व बाबींवर संबंधित उद्योग, संबंधित व्यक्ती किंवा अन्य संबंधित विभागांची अधिकृत बाजू अद्याप सार्वजनिक झालेली नाही. त्यामुळे चौकशी पूर्ण होईपर्यंत कोणताही अंतिम निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नसल्याचे कायदे तज्ज्ञांचे मत आहे. मात्र, प्रशासनाच्या सुरू असलेल्या हालचालींमुळे गाजीपूर प्रकरणातील पुढील काही दिवस अत्यंत महत्त्वाचे ठरणार, अशी चर्चा जिल्ह्यात रंगली आहे.

#### ■ ब्लास्टिंग बिलांचा तपासही निर्णायक

चर्चेत असलेल्या व्यक्तीच्या नावावर अधिकृत खदान नसल्याचे सांगितले जात असताना त्यांच्या नावावरील कथित ब्लास्टिंग बिलांमुळे नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. या बिलांची सत्यता, त्यामागील व्यवहार आणि संबंधित परवानग्यांची चौकशी झाल्यास या प्रकरणातील अनेक बाबींवर प्रकाश पडू शकतो.

#### ■ वीजजोडणीवर 'रेड सिग्नल'?

महावितरणकडून संबंधित स्टोन क्रशरच्या विद्युत जोडणीसाठी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची पडताळणी सुरू असल्याची माहिती आहे. आवश्यक वैधानिक मंजुऱ्यांमध्ये त्रुटी आढळल्यास वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई होऊ शकते, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितल्याचे समजते.

#### ■ उद्याचे महत्त्वाचे प्रश्न...

**- महावितरणच्या पडताळणीत नेमके काय निष्पन्न होणार?**

**- भूमापन अहवालात क्रशरचे वास्तविक स्थान स्पष्ट होणार का?**

**- ब्लास्टिंग बिलांमागील व्यवहारांची चौकशी कोणती यंत्रणा करणार?**

**- नियमभंग आढळल्यास वीजजोडणी तातडीने तोडली जाणार का?**

**- विविध विभागांची संयुक्त चौकशी होणार की स्वतंत्र तपासावरच समाधान मानले जाणार?**

#### ■ भूमापन अहवालावरच ठरणार पुढील दिशा

महसूल विभागाकडून भूमी अभिलेख विभागामार्फत अधिकृत मोजणी झाल्यानंतर संबंधित क्रशर प्रत्यक्षात कोणत्या गटात आणि कोणत्या मालकीच्या जमिनीवर आहे, याचे स्पष्ट चित्र समोर येणार आहे. त्यानंतरच पुढील कायदेशीर कारवाईचा निर्णय होण्याची शक्यता आहे.


# भावाला घरी आणण्यासाठी गेलेल्या युवकावर हल्ला



**अमरावती/प्रतिनिधीः-** भावाला घरी परत घेऊन जाण्याच्या कारणावरून झालेला वाद हिंसक वळणावर पोहोचल्याची घटना नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शेंदोळा धस्कट येथे घडली. विटा आणि दगडांनी केलेल्या हल्ल्यात एक युवक गंभीर जखमी झाला असून या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नमन नवरंग भोसले (वय ३६, रा. शेंदोळा धस्कट) यांचा भाऊ सूरज शानबाबू भोसले हा काही दिवसांपासून सुदेश सुनील भोसले यांच्या घरी राहत होता. भावाला परत घरी घेऊन जाण्यासाठी नमन तेथे गेले असता दोन्ही बाजूंमध्ये शाब्दिक वाद झाला. त्यानंतर नमन आपल्या घरी परतले. मात्र काही वेळातच सुदेश सुनील भोसले (वय ३०), अमित भोसले (वय २२) आणि सुरेशा उमेश राठोड (वय २३) हे नमन यांच्या घरासमोर पोहोचले. त्यांनी नमन यांना घराबाहेर बोलावले. नमन बाहेर येताच सुदेश याने त्यांच्या डोक्यावर विटेने जोरदार वार केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात नमन ☞(पान २ वर)

# प्रसूतीनंतर प्रकृती बिघडल्याने विवाहितेचा मृत्यू



**अमरावती/प्रतिनिधीः-** नांदगाव पेठ पोलीस ठाणे हद्दीतील २२ वर्षीय विवाहितेचा सिझेरियन प्रसूतीनंतर प्रकृती खालावल्याने उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या प्रकरणी नांदगाव पेठ पोलिसांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) कलम १९४ अन्वये आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेला नौशाद खान (वय २२, रा. नांदगाव पेठ, ता. व जि. अमरावती) असे मृत विवाहितेचे नाव आहे. २३ मे रोजी शहरातील एका खासगी रुग्णालयात त्यांची सिझेरियन प्रसूती झाली होती. यावेळी त्यांनी एका गोंडस मुलीला जन्म दिला होता. यानंतर☞(पान २ वर)

# बडनेऱ्यात उड्डाणपुलासाठी वाहतूक बंद

**४ जुलैच्या मध्यरात्रीपासून ५ जुलै सकाळपर्यंत निर्बंध**

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा-अमरावती राज्य मार्गावरील अलमास गेट परिसरात उभारण्यात येत असलेल्या पादचारी उड्डाणपुलाच्या (फूट ओव्हर ब्रिज) महत्त्वाच्या टप्प्यातील कामासाठी ४ जुलैच्या रात्रीपासून ५ जुलैच्या पहाटेपर्यंत वाहतुकीवर तात्पुरते निर्बंध लागू करण्यात आले आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या कालावधीत अलमास गेट ते सावता मैदानदरम्यान सर्व प्रकारच्या वाहनांसह पादचाऱ्यांनाही प्रवेशबंदी राहणार आहे. सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र. २, अमरावती यांनी जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, बडनेरा-अमरावती राज्य मार्ग क्रमांक ३०४ वरील कि.मी. १६२/०५० येथे प्री-फॅब्रिकेटेड पादचारी उड्डाणपुलाचे स्टील स्ट्रक्चर उचलून निश्चित स्थळी बसविण्याचे काम करण्यात येणार आहे. हे काम अत्यंत तांत्रिक आणि जोखमीचे☞(पान २ वर)

# कृषी दिनी शेतकऱ्यांचा आसेगाव पूर्णा येथे रास्ता रोको

**-कर्जमाफी, पीक विमा व हमीभावासाठी आंदोलन**

### अमरावती-परतवाडा मार्गावरील वाहतूक ठप्प; सरकारविरोधात घोषणाबाजी

**आसेगाव पूर्णा/प्रतिनिधीः-** कृषी दिनाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी लोक विकास संघटनेच्या वतीने बुधवारी (दि.१) अमरावती-परतवाडा मार्गावरील आसेगाव पूर्णा येथे भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. शेतकरी नेते गोपाल भालेराव यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात शेकडो शेतकरी सहभागी झाले. सरसकट बिनशर्त




कर्जमाफी, सर्व पात्र शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ, शेतीमालाला उत्पादन खर्चाच्या दुप्पट हमीभाव, रासायनिक खतांच्या वाढलेल्या किमती कमी करणे, बियाणे व कृषी निविष्ठांचे दर नियंत्रणात आणणे तसेच शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

रास्ता रोकोमुळे अमरावती–परतवाडा मार्गावरील वाहतूक काही काळ ☞(पान २ वर)

# पतीच्या विश्वासघाताने उद्ध्वस्त झाले संसाराचे स्वप्न



**अमरावती/प्रतिनिधीः-** लग्नानंतर सुखी संसाराची स्वप्ने पाहणाऱ्या एका विवाहितेच्या आयुष्यात विश्वासघात, मानसिक छळ आणि अत्याचाराचे वादळ आल्याची धक्कादायक घटना अंजनगाव सुर्जी तालुक्यात उघडकीस आली आहे. ज्या पतीकडून संरक्षण आणि आधाराची अपेक्षा होती, त्याच पतीने आपल्या नातेवाईकासोबत राहण्यास भाग पाडल्याचा गंभीर आरोप पीडित महिलेने केला असून, या प्रकरणी दोघांविरुद्ध विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रहीमापूर पोलीस ठाण्यात दाखल तक्रारीनुसार, पीडित महिलेचा पती आणि त्यांचा नातेवाईक यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. महिलेच्या तक्रारीनुसार, मागील सुमारे वर्षभरापासून पतीनेच तिला एका नातेवाईकासोबत राहण्यास आणि ☞(पान २ वर)

# आ.गजानन लवटे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

### युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांचे आयोजन

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार गजानन लवटे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहपूर्ण आणि समाजहिताचा संदेश देणाऱ्या वातावरणात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त शिवसेना युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांच्या पुढाकाराने दिवसभर अनेक समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांमधून सामाजिक बांधिलकी जपत गरजू




नागरिक, रुग्ण आणि विद्यार्थ्यांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात आशा मनिषा माता मंदिरात महाआरतीने करण्यात आली. त्यानंतर उपजिल्हा रुग्णालयात दाखल रुग्णांना फळांचे वाटप करून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यात आली. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरपरिषद शाळा व ☞(पान २ वर)

# विवाहित महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

### कुटूंबियांचा घातापाताचा आरोप

खल्लार/प्रतिनिधीः- खल्लार पोलिस स्टेशन हद्दीतील उपराई येथील २७ वर्षीय विवाहीत महिलेने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवार (दि.१) रोजी उघडकिस आली आहे.



निकीता आकाश पेढेकर ( आखतकर ) (वय २७) असे गळफास घेऊन आत्महत्या करणाऱ्या विवाहीत महिलेचे नाव आहे. निकीताचा विवाह ४ जानेवारी २०२४ ला उपराई येथील आकाश पेढेकरशी झाला होता.घटनेच्या वेळी घरी ☞(पान २ वर)

# ट्युशनवरून परतणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीला धमकावले

### फोटो-व्हिडिओ व्हायरल करण्याची भीती दाखवत पाठलाग

**अमरावती/प्रतिनिधीः-** ट्युशन क्लासवरून घरी परतत असलेल्या एका मुलीचा पाठलाग करून तिच्यावर नजर ठेवत असल्याचा दावा करणाऱ्या युवकाने फोटो व व्हिडिओ व्हायरल करण्याची तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पोलिसांनी संबंधित युवकाविरुद्ध पोक्सो कायद्यासह विविध



कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. ही घटना नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, २९ जून रोजी सकाळी सुमारे सव्वानऊच्या सुमारास ही घटना घडली. पीडित अल्पवयीन मुलगी ट्युशन क्लास आटोपून घरी जात असताना आरोपी प्रफुल रमेश देशमुख (वय ३३, रा. नांदगाव खंडेश्वर तालुका) याने तिचा रस्त्यात पाठलाग केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तक्रारीनुसार, आरोपीने मुलीला अडवून ☞(पान २ वर)

